सत्यमेव जयते

# अल्पसंख्याक कल्याण समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**राज्यातील अल्पसंख्याकाच्या (मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) सर्वंकष विकासासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल.**

# पहिला अहवाल

**(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक १३ एप्रिल २०१६ रोजी सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई,
एप्रिल, २०१६.

# अल्पसंख्याक कल्याण समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

# पहिला अहवाल

**(सदर अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक १३ एप्रिल २०१६ रोजी सादर करण्यात आला.)**

एचबी ७५—१

## अल्पसंख्याक कल्याण समिती
## (२०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सरदार तारासिंह, वि.स.स.

**समिती सदस्य :**

* (२) श्री. चैनसुख संचेती, वि.स.स.
(३) कॅ. आर. तमिल सेल्वन, वि.स.स.
(४) श्री. उदेसिंग पाडवी, वि.स.स.
(५) श्री. किर्तीकुमार (बंटी) भांगडिया, वि.स.स.
(६) श्री. द्वारम मल्लिकार्जून रेड्डी, वि.स.स.
(७) श्री. अनिल कदम, वि.स.स.
(८) श्री. सुनिल शिंदे, वि.स.स.
(९) श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान, वि.स.स.
(१०) श्रीमती ज्योती कलानी, वि.स.स.
(११) श्री. अबू आसिम आजमी, वि.स.स.
(१२) श्री. गुरुमुख जगवानी, वि.प.स.
(१३) श्री. अब्दुला खान दुर्रानी, वि.प.स.
(१४) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.
(१५) श्रीमती हुस्नबानु खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.
(३) श्री. राजेश तारवी, उप सचिव.
(४) श्री. जयवंत राणे, अवर सचिव (समिती).

---

उपरोक्त समिती दिनांक २२ मे २०१५ रोजी नामनिर्देशित करण्यात आली.

* श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स.यांनी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. चैनसुख संचेती, वि.स.स यांची मा.अध्यक्षांनी समिती सदस्य म्हणून दिनांक १६ डिसेंबर २०१५ रोजी नामनियुक्ती केली.





## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| (१) | प्रस्तावना … … … | (सात) |
| (२) | अहवाल … … … | १ |
| (३) | **परिशिष्ट 'अ'** … … … <br>अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचे सादरीकरण व त्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती. | १९ |
| (४) | **परिशिष्ट 'ब'** … … … <br>मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून प्राप्त झालेली माहिती. | ६९ |
| (५) | **परिशिष्ट 'क'** … … … <br>समितीच्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त. | १०५ |

## प्रस्तावना

मी अल्पसंख्याक कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करणाचा अधिकार दिल्यावरून समितीचा पहिला अहवाल (सन २०१५-१६) सभागृहास सादर करीत आहे.

राज्यातील अल्पसंख्याकाच्या (मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) विकासासाठी राज्य शासन राबवीत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व परिणामकारकरित्या संनियंत्रण करून या समाजाचा सर्वांगीण विकास साधणे तसेच शासनाच्या विविध योजनांची संबंधित क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयामार्फत प्रभावी अंमलबजावणी होऊन या समाज घटकातील लोकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या योजनांचा लाभ झाला किंवा कसे याची तपासणी करणे, शासन राबवित असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या, निर्धारित उद्दिष्ट साध्य झाले किंवा कसे इत्यादी बाबींचा सर्वंकष आढावा घेऊन अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करण्याच्या दृष्टीने तसेच महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल विचारात घेऊन त्यावर शासनाला सुनियोजित अशी उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने अल्पसंख्याक कल्याण समिती गठीत करण्यात आली.

उपरोक्त नमूद उद्दीष्ट परिणामकारकरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने समितीची रचना करण्यात आली. त्यासाठी एकूण १५ सदस्यीय समितीमध्ये विधानसभेतील ११ सदस्यांपैकी ६ सदस्य अल्पसंख्याक समाजातील व उर्वरित सदस्यांपैकी एक महिला सदस्या अल्पसंख्याक समाजातील असतील व विधानपरिषदेतील ४ सदस्यांपैकी १ सदस्य अल्पसंख्याक महिला सदस्या असतील, महिला सदस्या नसल्यास खुल्या प्रवर्गातील महिला सदस्या असतील अशी तरतूद करण्यात आली.

अल्पसंख्याक कल्याण समितीने सर्वप्रथम अल्पसंख्याक प्रवर्गासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची तसेच राज्य शासन अंमलबजावणी करत असलेल्या केंद्र शासनाच्या योजनांची माहिती अल्पसंख्याक विभागाकडून मागविली. सदर योजनांचा समितीने साधकबाधक विचार केला. योजनांबाबतची अधिक माहिती व परिणामकारकता विचारात घेण्यासाठी व शासनास त्यात योग्य ते बदल सुचविण्याच्या दृष्टीने समितीने अनुक्रमे दिनांक १३ व २७ ऑगस्ट २०१५ रोजी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळा संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारविनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.



विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारुप अहवाल दिनांक ७ एप्रिल २०१६ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ७ एप्रिल २०१६.

**सरदार तारासिंह,**
समिती प्रमुख,
अल्पसंख्याक कल्याण समिती.

## अहवाल

महाराष्ट्राची तेरावी विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर सन २०१५-१६ या वर्षासाठी अल्पसंख्याक कल्याण समिती गठीत करण्यात आली. या समितीची प्रारंभिक बैठक दिनांक ४ जून २०१५ रोजी झाली. या बैठकीत समितीने अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती अल्पसंख्याक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.

### मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भातील माहिती घेण्यासाठी समितीने प्रश्नावली तयार करून विभागास पाठविली होती. विभागाने सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १३ व २७ ऑगस्ट २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. दिनांक १३ ऑगस्ट २०१५ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी समितीने सन २०१३-१४ आणि सन २०१४-१५ या वर्षात अल्पसंख्याक समाजातील किती लोकांना शैक्षणिक आणि व्यावसायिक कर्ज देण्यात आले अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी विदीत केले की, शासनाने महामंडळास ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल मंजूर केले असून आतापर्यंत रुपये ३००.१९ कोटी दिले आहेत. सन २०१५-१६ या वर्षासाठी ७५ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर केला आहे. मागील तीन वर्षात सन २०१२-१३ मध्ये ११८९ विद्यार्थ्यांना ७ कोटी ५० लाख रुपये, सन २०१३-१४ मध्ये २०१८ विद्यार्थ्यांना ३२ कोटी ०९ लाख रुपये व सन २०१४-१५ मध्ये २८६१ विद्यार्थ्यांना २० कोटी ४५ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. मागील तीन वर्षे फक्त शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत होती. सन २०१४-१५ मध्ये बाकीच्या योजना सुरू केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने थेट कर्ज योजनांतर्गत मुदत कर्ज योजना आणि सूक्ष्म पत पुरवठा योजनेसाठी अर्ज मागविण्यात आले.

सन २०१४-१५ या वर्षात अत्यंत कमी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्जाचा लाभ मिळालेला आहे. त्यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. काही जिल्ह्यामध्ये दोन-तीन लाभार्थ्यांची संख्या दिसत आहे. मुंबईसारख्या शहरामध्ये लाभार्थ्यांची संख्या दोन दाखविली आहे. लाभार्थ्यांची संख्या इतकी कमी का आहे, पात्रतेचे निकष काय आहेत, अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, जे पात्र विद्यार्थी आहेत त्यांना १०० टक्के कर्ज देण्यात येते. ज्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे त्यांना हे कर्ज मिळते. लाभार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी पाहिजे. आयकर भरणारी एक व्यक्ती हमीदार म्हणून पाहिजे. विद्यार्थ्याने जेवढे कर्ज मागितले आहे त्या प्रमाणात हमीदाराची मिळकत असली पाहिजे. जर हमीदार नसेल तर लाभार्थ्याने त्याची मालमत्ता गहाण ठेवली पाहिजे. बऱ्याच वेळा लाभार्थ्यांकडे हमीदार नसतो आणि गहाण ठेवण्यासाठी त्याच्याकडे काहीही नसते. अशी प्रकरणे प्रलंबित राहतात. तसेच ज्यांच्या कुटुबांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांचे अर्ज नामंजूर करण्यात येतात.

समितीने विचारणा केली की, वार्षिक उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात आली आहे काय, यावेळी विभागीय सचिवांनी विदीत केले की, ही मर्यादा शिष्यवृत्तीसाठी वाढविली आहे. व्यावसायिक शिक्षणासाठी २५ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते आणि उच्च शिक्षणासाठी ५ हजार रुपये देण्यात येते. या दोन्ही शिष्यवृत्तीसाठी कुटुंबाची मर्यादा अडीच लाख रुपयांवरून सहा लाख रुपये केली. परंतु कर्जाच्या बाबतीत कुटुंबाची उत्पन्न मर्यादा वाढविलेली नाही.

समितीने पुढे असेही स्पष्ट केले की, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या पात्रतेच्या संदर्भात महामंडळाने तात्त्विक बाबी बाजूला ठेऊन व्यवहारीक विचार करणे आवश्यक आहे. यामध्ये शैक्षणिक कर्ज देण्याची तारीख किंवा विद्यार्थ्याने प्रपत्र भरले परंतु त्याला हमीदार मिळाला किंवा मिळाला नाही, शैक्षणिक सत्र ज्या दिनांकाला सुरू होते, त्या शैक्षणिक सत्राच्या दिनांकाच्या ३० दिवस किंवा १५ दिवस अगोदर शेवटचा दिनांक निश्चित करणे, शैक्षणिक कर्जाची प्रकरणे निकाली काढण्यासाठी दिनांक ठरविणे. कर्ज मंजुरी संदर्भातील सर्व कार्यवाही पूर्ण होण्याची अंतिम दिनांक ठरविणे, शैक्षणिक सत्र सुरू झाल्यानंतर एक महिन्यामध्ये प्रवेश घेतला गेला नाही तर प्रवेश रद्द होतील, याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळात अधिकारी/कर्मचाऱ्यांची मान्य पदे, रिक्त पदे तसेच ही पदे का भरली गेली नाहीत यासंदर्भातील माहिती तसेच व्यवस्थापकीय संचालक पदाची काय वस्तुस्थिती आहे याची समितीला माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, महामंडळाच्या कर्मचारीवृंदाची संरचना आणि बिंदूनामावली अगोदर मंजूर झाली नव्हती, परंतु गेल्या वर्षी कर्मचारीवृंदाची संरचना आणि बिंदूनामावली सामान्य प्रशासन विभागाकडून मंजूर करून घेण्यात आली आहे. १५७ पदांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी ७६ पदांचे वेतन देण्याचे शासनाने मान्य केले आहे. महामंडळाच्या स्थापनेपासून अद्यापपर्यंत शासनाने एकाही पदाचे वेतन दिलेले नाही. यासंदर्भात वारंवार वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे, परंतु अद्यापही प्रस्तुत प्रकरणी मंजूर मिळालेली नाही. यासंदर्भात शासनाचे म्हणणे असे आहे की, महामंडळाला जो काही फायदा होईल त्या फायद्यातून उरलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन भागवावे. सद्या महामंडळाला कोणत्याही प्रकारचा फायदा होत नाही. महामंडळाची वसुली ज्यावेळेस १०० टक्के होईल त्याच वेळेस महामंडळ फायद्यामध्ये जाईल. सन २००७ मध्ये शासनाने कर्जमाफी दिली होती. त्यावेळेस लाभार्थ्यांना वाटले की, महामंडळाचेही कर्ज माफ केले जाईल असे असताना लाभार्थ्यांना फोन करून, पत्र देऊन हप्ते भरण्यास सांगण्यात आले होते. सद्य:स्थितीत महामंडळाची ३० टक्के वसुली आहे. वित्त विभागाचे म्हणणे आहे की, महामंडळाची वसुली १०० टक्के झाली तरच महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील अनुदान देण्यात येईल, इतर महामंडळातील १०० टक्के कर्मचाऱ्यांचे वेतन शासन देत असते. सामाजिक न्याय विभागाकडे जी ६-७ महामंडळे आहेत

त्यांना त्यांच्याकडील पदांचे वेतन व अनुदान शासनाकडून मिळते. परंतु मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला काहीही मिळालेले नाही. या कर्मचाऱ्यांचे वेतन भागभांडवलामधून भागवला जात असून ते नियमबाह्य आहे. भागभांडवलातून कर्मचाऱ्यांना वेतन देणे अपेक्षित नसून लाभार्थ्यांना भागभांडवलातून कर्ज देणे अपेक्षित आहे. महामंडळ चालावे यासाठी अशा प्रकारे ५० टक्के पदे कंत्राटी पद्धतीने भरली आहेत. शासनाने महामंडळाला जे ३०० कोटी भागभांडवल दिलेले आहे त्यातूनच कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात येते. महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासनामार्फत अनुदान मिळणेसाठी शासनाकडे महामंडळ वर्षातून ४-५ वेळेस पाठपुरावा करीत असते. परंतु वेगवेगळे आक्षेप काढून नस्ती परत येते. शासन ज्याप्रमाणे इतर महामंडळांना कोणत्याही अटी वा शर्ती न घालता अनुदान देते तसेच अनुदान या महामंडळाला देण्याची आवश्यकता आहे. शासनाने महामंडळाची वसुली १०० टक्के करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत व त्यातून उर्वरित कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करता येईल असे आदेशित केले आहे.

शासनाने महामंडळासाठी पदे मंजूर केलेली असताना सुद्धा कर्मचाऱ्यांना शासन वेतन देत नसल्यामुळे भागभांडवलातून त्यांचे वेतन अदा करावे लागत आहेत. हे नियमबाह्य काम होत असून ते योग्य नाही. तसेच भागभांडवलातून कर्मचाऱ्यांचे वेतन दिले जात असल्यामुळे भागभांडवल कमी होत आहे. शासनाने लाभार्थ्यांसाठी दिलेली रक्कम कमी होत आहे असे समितीने स्पष्ट करून पुढे अशी विचारणा केली की, यासंदर्भात लेखापरीक्षा आक्षेप आले नाही काय, हा प्रकार कधी पासून सुरू आहे खरे म्हणजे यामधून मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, महामंडळाच्या भागभांडवलातून कर्मचाऱ्यांचे वेतन देणे अयोग्य आहे. तथापी, लेखापरीक्षामध्ये अशा प्रकारचे आक्षेप अद्यापपर्यंत आलेले नाही.

समितीने विचारणा केली की, महामंडळ आतापर्यंत भागभांडवलातून कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन भागवित आहे. त्यामुळे दर वर्षी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन भागविण्यासाठी किती खर्च येतो, लाभार्थ्यांना भागभांडवलातून कर्ज देणे अपेक्षित आहे, परंतु त्या भागभांडवलातून कर्मचाऱ्यांचे वेतन दिले जात आहेत. विभागीय सचिवांनी सांगितले की, महामंडळाचा आकृतीबंध मंजूर होण्याच्या अगोदरपासून कार्यालयीन कामासाठी महामंडळाने कंत्राटी पद्धतीवर कर्मचारी नेमलेले आहेत. एका वर्षामध्ये सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर महामंडळाला ७० लाख रुपये खर्च येतो. महामंडळामध्ये सर्वच कर्मचारी कंत्राटी पद्धतीने नेमलेले आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांपेक्षा कमी वेतन दिले जाते. परंतु महामंडळामध्ये कर्मचारी योग्य पद्धतीने नेमणूक केली तर त्यांना योग्य पद्धतीने वेतन द्यावे लागेल. कंत्राटी कर्मचाऱ्यांवर जो खर्च होत आहे तो खर्च योग्य पद्धतीने नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रमाणात खूप कमी आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी वर्षाला ७० लाख रुपये खर्च येतो. त्याऐवजी योग्य पद्धतीने नियूक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा खर्च किती तरी पटीने जास्त होईल.



गेल्या ४-५ वर्षापासून कंत्राटी पद्धतीने काम करीत आहेत त्यांनाच सेवेत कायम करता येईल काय, त्यांना कामाचा अनुभव देखील आहे. भरतीसाठी शासनाची नियमावली आहे. कंत्राटी पद्धतीने होणारी नेमणूक कशा पद्धतीने होते, असे समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, यात दोन-तीन गोष्टी आहेत. यात शासनाचा निधी आहे. त्यामुळे सर्व पदे बिंदूनामावली नुसारच भरावी लागतील. त्याप्रमाणे पदे भरली नाहीत तर अनुदान देखील मिळणार नाही. सुरुवातीला सामान्य प्रशासन विभागाचा कंत्राटी पद्धतीने पदे भरण्यासंबंधातील शासन निर्णयाचा आधार घेऊन अमूक एवढी पदे भरावयाची आहेत अशा आशयाची जाहिरात दिली होती. त्यावेळी बिंदूनामावली मंजूर नव्हती. नियमाप्रमाणे पदे भरण्यात येतात तेव्हा बिंदूनामावली मंजूर होते व त्याप्रमाणे जाहिरात द्यावी लागते व बिंदूनामावली प्रमाणेच पदे भरावी लागतात. त्यासंबंधीचा शासन निर्णय देखील निर्गमित झालेला आहे. त्यावेळी नियुक्तीचे नियम मंजूर नव्हते. आता नियुक्तीचे नियम मंजूर झालेले आहेत. त्यामध्ये अशी तरतूद ठेवली आहे की, कंत्राटी पद्धतीवर जे उमेदवार कार्यरत आहेत त्यांना कमाल वयोमर्यादा लागू होणार नाही. त्यामुळे हे उमेदवार ज्यावेळी जाहिरात येईल त्यावेळी अर्ज करू शकतील. राखीव प्रवर्गातील उमेदवार असेल तर तो देखील अर्ज करू शकतो. यात वयाची शिथिलता दिलेली आहे. परंतु, कंत्राटी पद्धतीवर काम करीत असलेले उमेदवार न्यायालयात गेले. मध्यंतरी लिपिक तथा डाटा एन्ट्री टंकलेखक या पदाची जाहिरात दिली होती. पण न्यायालयाने त्यास स्थगिती दिली होती. आता न्यायालयाने असे सांगितले आहे की, ही पदे भरावयाची असतील तर जेवढी मुले कोर्टात गेली आहेत तेवढी पदे सोडून उर्वरित पदे भरू शकतात. हा निकाल आल्यामुळे पुढील कार्यवाही अजून केलेली नाही. कारण वेतनाचा देखील प्रश्न आहे. वेतन देऊ शकत नसल्यामुळे पदे कशी काय भरायची हा देखील एक प्रश्न आहे. ही पदे भरली तर त्यांना वेतन देऊ शकत नाही. त्यांना भागभांडवलातून वेतन दिले तर ती अनियमितता होते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकूण १५७ पदे मंजूर असून आता पर्यंत कुठलीही पदे भरलेली नाही. यावर विभागीय सचिवानी सांगितले की, त्यातील फक्त ५० पदे भरलेली आहेत. कमीतकमी जेवढी आवश्यकता आहे तेवढीच पदे आता भरलेली आहेत. गेल्या चार वर्षापासून कुठल्याही योजना राबविल्या गेल्या नव्हत्या. फक्त शैक्षणिक योजना सुरू होती. त्यासाठी तेवढी पदे पुरेशी होती. कारण कामाचा ताण नव्हता. एकूण अर्जाची संख्या बघितली तर तेवढे कर्मचारी येणारे अर्ज हाताळत होते. परंतु, गेल्या वर्षी सर्व योजना राबविल्या गेल्या आहेत. त्यामुळे कामाचा ताण वाढलेला आहे. वसुली वाढवावी असे शासनाचे एक सारखे म्हणणे आहे. कर्मचारी दिल्याशिवाय वसुली करू शकत नाही. शासनाचे म्हणणे आहे की, १०० टक्के वसुली केल्याशिवाय कर्मचारी देणार नाही. १०० टक्के वसुली कधीच होणार नाही. शासनाची जेवढी म्हणून महामंडळे आहेत त्यांची १०० टक्के वसुली नाही. शासनाच्या अन्य महामंडळाची वसुली १० ते २० टक्के आहे. या महामंडळाची वसुली ३० टक्के आहे. सद्या असलेल्या कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त वसुली करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. १०० टक्के वसुली करण्यात येईल तेव्हाच वेतनासाठी अनुदान देण्यात येईल, असे अभिप्राय शासनाने नस्तीवर दिलेले आहेत.

समितीने विचारणा केली की, महामंडळाच्या विद्यमान प्रशासनिक व्यवस्थेतील कर्मचारी वृंदाच्या कार्यपद्धतीमुळे महामंडळाच्या कामकाजावर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामामुळे परिणाम होतो काय, विभागीय सचिवांनी सांगितले की, इतर विभागांना ज्याप्रमाणे निधी व कार्यालयीन खर्चाकरिता रक्कम दिली जाते. त्याप्रमाणे अल्पसंख्याक विभागाला निधी व कार्यालयीन खर्चाकरिता रक्कम दिली जात नाही. विभागामध्ये दोन लेखा अधिकारी यांची मागणी केली होती. ती पदेही विभागाकरिता भरली जात नाहीत. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा दर्जा किंवा त्यांच्या कामाप्रती असलेल्या मानसिकतेमुळे काही प्रमाणात महामंडळाच्या कामकाजावर फरक पडतो. महामंडळाची वसुली इतर महामंडळांपेक्षा चांगली आहे.

समितीने विचारणा केली की, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक मंडळ सध्या कार्यरत आहे काय, विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००८ नंतर संचालक मंडळ कार्यरत नाही. संचालक मंडळ बरखास्त केले आहे. व्यवस्थापकीय संचालक व सह व्यवस्थापकीय संचालक ही पदे शासनाने अतिरिक्त कार्यभार देऊन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, पदे भरण्याकरिता शासनाला वारंवार विनंती करण्यात आली होती. यासंदर्भात अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनाही विनंती केली होती. पुन्हा एकदा सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांना विनंती करण्यात येईल.

समितीने स्पष्ट केले की, महामंडळाला लेखा अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. लेखा परीक्षण करताना काही आक्षेप येऊ शकतात. महामंडळातील पदे नियमित न भरल्यामुळे महामंडळाला जे भागभांडवल दिले आहे त्यामधून कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यात येत आहे. हे अयोग्य असून जे भागभांडवल कर्ज देण्यासाठी आहे त्याचा वापर वेतन देण्यासाठी होत असल्याने यामध्ये सुधारणा होणे आवश्यकता आहे. थेट कर्ज, मुदत कर्ज योजनांमध्ये अर्ज प्राप्त झाल्यानंतर कर्ज मंजूर करून ते प्रकरण जिल्हा पातळीवर पाठविले जाते. त्यावेळेस कर्ज प्रकरणातील त्रुटी अर्जदारास त्याचवेळेस निदर्शनास आणणे गरजेचे आहे. अन्यथा त्याच त्रुटींची पुर्तता करणेसाठी मोठ्या प्रमाणात वेळ लागण्याची शक्यता आहे. लाभार्थ्यांच्यादृष्टीने व महामंडळाच्या विश्वासार्हतेच्या दृष्टीने ते चुकीचे आहे. तसेच थेट कर्ज योजना, मुदत कर्ज योजना यांच्या ऐवजी जर मौलाना आझाद महामंडळ हे मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज देणारे महामंडळ म्हणून नावारूपास आले तर विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. थेट कर्ज योजनेंतर्गत ५० हजार, १ लाख रुपये कर्ज घेणारे व्यक्ती त्यातून व्यवसाय जरूर करतील. शैक्षणिक कर्ज घेणारा विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर झाला तर समाजाच्या दृष्टीने ते फार महत्त्वाचे आहे. त्यांच्यासाठी काही तरी करण्यात येत आहे व या दृष्टीने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. थेट कर्जाचे एखादे प्रकरण मंजूर झाल्यानंतर संबंधित व्यक्तीला ५० हजार किंवा १ लाख रुपये मिळतील. परंतु, शैक्षणिक कर्जाचे एक प्रकरण मंजूर झाले तर त्याचा फायदा त्याच्या संपूर्ण कुटुंबालाही होणार आहे. कर्जाच्या परतफेडीची आकडेवारी पाहिली तर, शैक्षणिक कर्जाची परतफेड जास्त प्रमाणात झालेली आहे. कारण कर्ज घेणाऱ्याला हे माहीत असते की, या महामंडळाकडून कर्ज मिळालेले आहे. त्यामुळे तो स्थिरस्थावर झाल्यानंतर कर्जाची परतफेड करतो.



विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर आपल्याकडे शैक्षणिक कर्जाकरिता अर्ज केला तर, त्याचा प्रवेश रद्द होईपर्यंतही जर त्यांचा कर्जाचा अर्ज मंजूर होत नसेल तर, याचे निकष आपल्याला बदलावे लागतील. याबाबत विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली आणि सांगितले की, मागच्या एक-दीड वर्षांपासून चेक देण्याची पद्धत बंद केली असून एनईएफटीद्वारे लाभार्थ्यांच्या बचत खात्यात रक्कम जमा केली जाते.

समितीने स्पष्ट केले की, गरीब व्यक्ती गहाण ठेवण्यासाठी मालमत्ता तसेच आयकर भरणारी एक व्यक्ती हमीदार म्हणून कुठून आणणार ? शैक्षणिक कर्ज देताना त्यात शिथिलता कसे देता येईल हे पाहिले पाहिजे. शैक्षणिक कर्जाची प्रकरणे जास्त मंजूर केली पाहिजेत. जे अर्जदार असतात त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असते, त्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर पाहून शैक्षणिक कर्ज घेण्यासाठी त्यांना हमीदार मिळत नाही. यावर विभागीय सचिवांनी माहिती दिली की, मंत्रिमंडळापुढे जाऊन कर्ज मंजूर करण्यासंबंधातील अटी व शर्ती मंजूर केल्या असून त्याप्रमाणे शासन निर्णय देखील निर्गमित झाला आहे.

महामंडळाचे संचालक मंडळ नसल्याने अधिकाऱ्यांच्या भरवशावरच महामंडळाचे काम सुरू आहे. अध्यक्ष किंवा संचालक असा हस्तक्षेप नसल्याने अधिकाऱ्यांनी चांगले काम करून महामंडळाचा कारभार व्यवस्थित करायला पाहिजे, असे समितीने स्पष्ट करून पुढे अशी विचारणा केली की, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकरिता शासनाने किती कोटी रुपये अनुदान दिलेले आहे, याची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी. महामंडळामध्ये काम करणाऱ्या अधिकारी -कर्मचारी यांच्या वेतनावर किती खर्च झालेला आहे, मागील व्यवस्थापकीय संचालकांनी याबाबत शासनाला काही सूचना केल्या होत्या. जाहिरात देऊन महामंडळामध्ये कायमस्वरूपी कर्मचारी का भरला जात नाही, यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाने मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकरिता ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल दिलेले आहे. त्यापैकी या महामंडळाला ३०० कोटी रुपये टप्प्याटप्प्याने दिलेले आहेत. महामंडळामध्ये कंत्राटी कामगारांची संख्या जास्त आहे, त्यांचे वेतन महामंडळाच्या अनुदानातूनच केले जाते. महामंडळावर ५० कर्मचारी कंत्राटी तत्त्वावर काम करीत आहेत. शासन निर्णयान्वये एकूण १५७ पदांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आलेला आहे.

समितीने विचारणा केली की, महामंडळामध्ये अनेक वर्षांपासून कंत्राटी तत्त्वावर काम करणारे कर्मचारी न्यायालयाच्या आदेशांवर अवलंबून आहेत. जर न्यायालयाचा आदेश त्यांच्या बाजूने आला नाही तर त्यांना कामावरून कमी केले जाईल. ज्या कर्मचाऱ्यांनी महामंडळाच्या पडत्या काळात व अडचणीच्या काळात महामंडळामध्ये काम केले, अशा कर्मचाऱ्यांवर हा अन्याय होणार नाही काय, याकरिता विभागाने काही विचार केलेला आहे काय, यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंबंधी न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत कंत्राटी कामगारासंदर्भात व भरतीसंदर्भात ठोस निर्णय घेणे शक्य होणार नाही. न्यायालयाचा निकाल जर कंत्राटी कामगारांच्या बाजूने लागला नाही तर त्यांना शासनाच्या इतर नोकरीकरिता असलेल्या परीक्षांना बसण्याकरिता वयाची अट शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.

समितीने विचारणा केली की, मिटकॉन ही नोडल एजन्सी होती. शासनाने त्यांच्या समवेत करार केला होता. त्यांनाच जास्त फायदा होत होता. त्यांच्या कामाबद्दल शासन समाधानी नव्हते. त्यामुळे शासनाने त्यांच्याकडून काम करून घेण्याचे बंद केले, तेव्हा त्यांना त्यासंबंधीचे पत्र दिले होते काय, त्यावेळी त्यांच्या समवेत केलेला करार संपला होता काय, कंत्राट पद्धतीने उमेदवारांची नेमणूक करण्यात आली होती काय, यावर विभागीय सचिवानी सांगितले की, त्यांची मुदत संपल्यामुळे त्यांना पत्र दिले होते. त्यांना मुदत वाढ देण्यात आलेली नाही. सन २०११ मध्ये कंत्राटी पद्धतीने उमेदवारांना नेमले होते. जास्तीत जास्त दहा हजार रुपये देऊन कंत्राटी पद्धतीने उमेदवार नेमू शकता अशा आशयाचा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय आहे. या शासन निर्णयानुसार जाहिरात देऊन या उमेदवारांची नियुक्ती केली. त्यावेळी आकृतीबंध व रोस्टर तयार नव्हते. त्यामुळे काम चालविण्याच्या दृष्टीने गरजेपुरती आवश्यक असलेली पदे भरण्यात आली. मिटकॉन पेक्षा आता महामंडळाची गती वाढलेली आहे. तक्रारींचे प्रमाण कमी झालेले आहे. महामंडळ मिटकॉनला प्रती अर्ज रक्कम देत होते. मिटकॉनकडे योग्य जबाबदारी नसल्यामुळे त्यांनी दस्तऐवज देखील नीट केले नाही. त्यांनी प्रकरणे देखील पूर्ण करून योग्यरित्या दाखल केली नाहीत. यात मिटकॉनचाच जास्त फायदा होत आहे. योग्य लाभार्थींना फायदा होत नाही हे लक्षात आल्यानंतर मिटकॉनची सेवा घेण्याचे बंद केले. मिटकॉनमुळे लोकांनादेखील कर्ज घेण्यामध्ये खूप अडचणी येत होत्या.

महामंडळाचे ७ विभाग आहेत. त्या त्या ठिकाणी कर्ज प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी मिटकॉन ही संस्था नोडल एजन्सी म्हणून काम करीत होती. प्रत्येक विभागामधून प्राप्त होणाऱ्या प्रकरणासाठी वेगवेगळ्या रंगाची नस्ती वापरण्यात यावी. जेणेकरून संबंधितांकडे नस्ती आल्यानंतर त्या नस्तीच्या रंगावरून ते प्रकरण कोणत्या विभागाचे आहे, त्याची सद्यःस्थिती काय आहे याची माहिती संगणकावर नोंदणी केल्याबरोबर कळली पाहिजे. महामंडळाच्या कार्यालयामध्ये फोन घेण्यासाठी सुद्धा सतत व्यक्ती बदलल्या जातात. एकाच व्यक्तीकडे ही जबाबदारी सोपविली पाहिजे. अशा सूचना महामंडळाचे तत्कालीन सदस्यांनी केल्या होत्या. तसेच मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळणे अत्यंत आवश्यक आहे. या महामंडळाचा नावलौकिक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देणारे महामंडळ आहे अशी जनमाणसांमध्ये प्रसिद्धी झाली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

मुस्लीम समाजाच्या लाभार्थ्यांसाठी घरकुल योजना राबविली जात होती. परंतु त्यांच्याकडे स्वतःची जागा नसल्यामुळे लाभ देता येत नाही, त्यामुळे योजना बंद केली गेली. जे आज दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत, झोपडपट्टीमध्ये राहतात, त्या जागेबद्दलचा कर महापालिकेला देतात, अशा मुस्लीम समाजाच्या लोकांना घरकुल योजनेचा लाभ देणार आहात काय अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, हा निर्णय संचालक मंडळ अस्तित्वात आल्यानंतरच होऊ शकतो. घरकुलाच्या दृष्टीने इतर साधने आहेत. बँकांकडून अल्पसंख्याक समाजाच्या लोकांना कर्ज मिळू शकते.



बँकांच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून कर्ज मिळत नाही म्हणून अल्पसंख्याक समाजाकरिता हे महामंडळ स्थापन करण्यात आले आहे असे समितीने स्पष्ट केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडे लेखाधिकारी नसल्यामुळे अनेकदा शासनाला लेखी स्वरूपात विनंती केली आहे किंबहुना लोन बेसवर तरी लेखाधिकारी उपलब्ध करून द्यावा असेही कळविले आहे.

शैक्षणिक कर्ज देण्यासंदर्भात महामंडळाच्या अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत विभागाने विचार करून त्यावर अवलंब करणे आवश्यक आहे. जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना महामंडळाच्या माध्यमातून शिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य मिळेल. व्यापारी कर्जापेक्षा महामंडळाने शैक्षणिक कर्जावर भर दिला तर संपूर्ण अल्पसंख्याक समाज अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे येईल. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होईल, असेही समितीने पुढे स्पष्ट केले. विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाने या शैक्षणिक कर्जाच्या अटी व शर्ती ठरविलेल्या असून त्या शिथिल करण्यासंदर्भात संचालक मंडळ व वित्त विभागाची परवानगी घेणे अत्यावश्यक आहे. जो निधी शासनाचा आहे त्याकरिता शासन हमीची मागणी करणारच आहे.

प्रस्तुत बाबीच्या अनुषंगाने विभागाचा हेतू सकारात्मक आहे. शैक्षणिक पात्रता हस्तगत करीत असताना या विद्यार्थ्यांना जाणीव राहील. कर्जाची परतफेड करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी शिक्षणामुळे जागरुक राहतील. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळण्याकरिता व त्यांच्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याकरिता आर्थिक सहाय्य प्राप्त होण्यास इतक्या अटी व शर्ती लादण्यात आल्या तर त्यांना मिळणारी शिक्षणाची संधी दुर्लभ होत जाईल. व्यवसाय व उद्योगाकरिता देण्यात येणाऱ्या कर्जासंबंधी व त्याच्या वसुलीचा विचार करता शैक्षणिक कर्जावर महामंडळाने अधिक भर देणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने विचारणा केली की, व्यापारी कर्जाची वसूली व शैक्षणिक कर्जाची वसूलीमध्ये फरक आहे काय, विभागीय सचिवानी सांगितले की, शैक्षणिक कर्जाची वसूली ६५-७० टक्के इतकी आहे. व्यापारी कर्जाच्या संदर्भातील वसूलीची परिस्थिती चांगली नाही. शैक्षणिक कर्जाबाबत विद्यार्थ्यांना फोन करण्यात येतात. त्याप्रमाणे ते येऊन कर्जाची परतफेड करून जातात. कर्जाच्या परतफेडीबाबत समुपदेशन करीत आहोत.

समितीने अशीही विचारणा केली की, व्यापारी हेतुकरिता थेट कर्ज व मुदत कर्जाकडे कल जास्त न ठेवता शैक्षणिक कर्जावर जास्तीत जास्त भर देण्यात यावा. अल्पसंख्यांकि विभागाकडे व वित्त विभागाकडे शैक्षणिक कर्जाची अधिक कोणती प्रकरणे प्रलंबित आहेत काय, विभागीय सचिवांनी सांगितले की, नवीन शैक्षणिक कर्ज प्रकरण प्रलंबित नाही. नूतनीकरणाची प्रकरणे यायला सुरूवात झाली आहेत. त्यापैकी पहिल्या ४० लोकांची यादी तयार झाली आहे. दोन दिवसांमध्ये त्यांची रक्कम जमा होईल. नवीन कर्जाकरिता ऑनलाईन अर्जाचा आराखडा केला आहे. एक-दोन दिवसांमध्ये ते सुरू होतील. मुलांनी

ऑनलाईन कर्जाकरिता अर्ज भरावयाचा आहे. जिल्हास्तरावरील कार्यालयाला याबाबत अवगत करणे आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक कर्जाकरिता ऑनलाईन अर्जाचा आराखडा तयार करण्याकरिता दिलेला आहे.

समितीने विचारणा केली की, वसूलीकरिता विभागाकडे कायदेशीर कक्ष आहे का, विभागीय सचिवानी सांगितले की, वसूलीकरिता विभागाकडे कायदेशीर कक्ष नाही. तीन चार वर्षांपूर्वी महामंडळाच्या माध्यमातून वसूलीकरिता प्रकरणपरत्वे वकिलांची नेमणूक करण्यात आली होती.

महामंडळाने शैक्षणिक कर्जाकरिता असलेल्या अटी व शर्तीमध्ये शिथिलता आणणे आवश्यक आहे. याशिवाय महामंडळ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मदत करु शकणार नाही. महामंडळाने नवीन शैक्षणिक कर्जाच्या शिथिल केलेल्या अटी व शर्ती वेगळया पद्धतीने डिझाईन करून इंटरनेटच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरजूंपर्यंत हा संदेश पोहोचला पाहिजे, अशी कार्यवाही विभागाने महामंडळाच्या माध्यमातून करणे आवश्यक आहे. ज्या समाजाकरिता मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती झालेली आहे त्या अल्पसंख्याक समाजाचा स्तर खरोखर या महामंडळाच्या कारभारामुळे शैक्षणिकदृष्ट्या व आर्थिकदृष्टया उंचावलेला आहे का, याचाही विचार विभागाने व शासनाने अंर्तमुख होऊन केला पाहिजे. खऱ्या अर्थाने भविष्यकाळात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य प्राप्त होऊ शकेल. हे महामंडळ नव्या अर्थाने नावारूपाला आले पाहिजे. या महामंडळाच्या कामकाजाची आखणी खरोखर गरजेप्रमाणे करण्यात आली तर बरे होईल. नव्याने निर्माण होणाऱ्या महामंडळाच्या कामकाजामध्ये कर्ज देण्याची व कर्ज वसूलीची पद्धत आवश्यकतेप्रमाणे सशक्त करण्यात आली तर महामंडळाचे काम अधिक प्रभावी व लोकाभिमुख होईल, असे समितीने स्पष्ट केले.

समितीने विचारणा केली की, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती संबंधी माहिती देण्यात यावी. विभागीय सचिवानी सांगितले की, केंद्र शासनाच्या तीन आणि राज्य शासनाच्या दोन अशा एकूण पाच शिष्यवृत्ती योजना आहेत. केंद्र शासनाच्या प्री-मॅट्रीक, पोस्ट मॅट्रीक आणि मेरीट-कम-मिन्स या तिन्ही शिष्यवृत्ती सध्या सुरू आहेत. पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीचे काम उच्च शिक्षण विभाग पाहते आणि मेरीट-कम-मिन्स शिष्यवृत्तीचे काम तंत्र शिक्षण विभाग पाहते. या विभागाकडे संचालनालय नसल्यामुळे योजना राबविण्यासाठी खूप अडचणी निर्माण होतात. संचालनालयासंदर्भातील नस्ती सादर केलेली आहे. संचालनालय मिळाल्यास योजना राबविणे सोपे होईल. वेगवेगळ्या नोडल अधिकाऱ्यामार्फत या योजना राबविता येतील. प्रि-मॅट्रीक शिष्यवृत्तीचे काम शालेय शिक्षण विभाग पाहते. मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी शिष्यवृत्ती जास्त आली आहे. यापूर्वी केंद्र शासनाचा ७५ टक्के आणि राज्य शासनाचा २५ टक्के हिस्सा होता. परंतु आता केंद्र शासन १०० टक्के हिस्सा देते. थेट कर्ज योजने अंतर्गत सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये किती अर्ज प्राप्त झाले, असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, एकूण ६३ हजार १५२ अर्ज प्राप्त झाले आहेत.





समितीने पुढे अशी विचारणा केली की, ६३ हजार २५१ अर्जांपैकी फक्त १३ हजार २५१ लाभार्थ्यांना कर्ज वितरित करण्यात आले, उर्वरित लाभार्थ्यांना कर्ज वितरित न करण्याची कारणे काय आहेत, यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, थेट कर्ज योजनेसाठी काही अटी शिथिल केलेल्या आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात उद्दिष्ट ठेवले होते. संगणकावर आज्ञावली तयार करून लॉटरी काढण्यात आली होती. प्रत्येक जिल्ह्याला लोकसंख्येच्या प्रमाणात उद्दिष्ट देऊन त्याप्रमाणे लाभार्थ्यांची निवड केली. एकूण १६ हजार ६८० लाभार्थ्यांना कर्जाचा लाभ द्यायचा होता, त्यापैकी १३ हजार २५१ लाभार्थ्यांना लाभ दिला आहे. उर्वरित लाभार्थ्यांना जो लाभ मिळाला नाही कारण त्यांच्या अर्जामध्ये त्रुटी आहेत. काहीजणांची वयोमर्यादा उलटून गेलेली आहे. काही निरक्षर आहेत, काही लोकांचे वार्षिक उत्पन्न जास्त आहे, असे काही अर्ज नामंजूर केले आहेत. कर्जासाठी जामीनदाराने प्रतिज्ञापत्र द्यावे लागते, ते त्यांनी दिलेले नाही असेही अर्ज नामंजूर केले जातात, विभागाकडे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, १३२५१ लोकाना प्रत्यक्ष कर्ज दिले आहे. ३५१९ लोकांना शैक्षणिक कर्ज दिले आहे. प्रत्यक्ष कर्ज वसूलीचे प्रमाण किती आहे. शिक्षणासाठी किती कर्ज देण्यात येत आहे. कर्ज देण्याच्या संबंधात नियमावली बनविणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती आणि कर्ज या दोन बाबींचे संनियंत्रण केले तरी चांगले परिणाम पहायला मिळतील. त्यामुळे समाजात एक चांगला संदेश जाऊन विद्यार्थ्यांना उत्तेजित करता येईल. शैक्षणिक कर्जाच्या अटी शिथील करता येणे शक्य आहे काय, यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, संचालक मंडळाने जागा निश्चित केलेल्या आहेत. १६६८० च्या जवळपास जागा निश्चित झालेल्या आहेत. थेट कर्जाची वसुली कमी प्रमाणात होत आहे. शिक्षणासाठी १०० टक्के कर्ज देण्यात येत आहे. जे अर्ज करतात आणि जे अर्ज पात्रतेचे निकष पूर्ण करतात त्या सर्वाना कर्ज मंजूर करण्यात आले आहे. कर्ज देण्याच्या संबंधातील नियमावली शासनाच्या मजुंरीशिवाय करता येत नाही.

समितीने स्पष्ट केले की, काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, लोकांना कर्ज मिळालेले नाही, परंतु त्यांनी जमानत म्हणून सात-बारा उताऱ्यावर कर्जाचा बोजा दाखविलेला आहे. तो बोजा अजून काढून टाकलेला नाही. त्यामुळे त्यांना दुसरीकडून कर्ज घेता येत नाही. तेव्हा अशी प्रकरणे असतील तर ती प्राधान्याने निकाली काढण्यात यावीत. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, पूर्वी अशा काही गोष्टी झाल्या होत्या, त्या निदर्शनास आल्या नव्हत्या. परंतु आता त्या गोष्टी निदर्शनास आल्यानंतर पहिल्या बोर्डाने जे ५० हजार अर्ज दफ्तरी दाखल करून ठेवले होते त्या सर्व अर्जांचे पृथक्करण सुरू आहे. ज्यांच्या सातबारा उताऱ्यावर कर्जाचा बोजा दाखविलेला आहे अशा नस्त्या बाजूला करण्यात येत आहेत. कर्ज न देता त्यांच्या सातबारा उताऱ्यावर कर्जाचा बोजा दाखविलेला आहे. अशा लोकांचे अर्ज आल्यानंतर ते ताबडतोब निकाली काढण्यात येत आहेत. एकूण ५० हजार नस्त्यांचे पृथक्करण करावयाचे आहे.

समितीने विचारणा केली की, थेट कर्जाची रक्कम कशा प्रकारे मिळते. त्याच्या वसुलीचे प्रमाण किती आहे. या कर्जाच्या वसुलीसाठी आतापर्यंत कोणाला पत्र पाठविले आहे काय, ज्यांना कर्ज दिले जाते त्यांच्या पत्रव्यवहाराचे पत्ते बरोबर घेतले आहे काय, विभागीय सचिवांनी सांगितले की, लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट रक्कम जमा होते. शैक्षणिक कर्जाच्या वसुलीचे प्रमाण चांगले आहे. कर्ज वसुलीसाठी पत्रे पाठविले आहे. सन २००९ मध्ये काही पत्रे परत आली आहेत. आता जी कर्जे दिलेली आहेत त्यांचे पत्रव्यवहाराचे पत्ते बरोबर घेतले असून त्याना दूरध्वनी केला तरी ते रक्कम भरतात.

समितीने स्पष्ट केले की, योजना राबवायची म्हणून राबवायची नाही. या समाजाला महामंडळाची गरज असून या समाजाला महामंडळाच्या माध्यमातून न्याय देऊ शकतो. आपल्या माध्यमातून चुकीच्या लोकांचा स्वीकार करण्यात येऊ नये तसेच नंतर याचे दोष आपल्यावर येता कामा नये. याकडे सुद्धा लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

विभागीय सचिवांनी सांगितले की, राष्ट्रीय अल्पसंख्याक वित्तीय विकास महामंडळाची एक एजन्सी म्हणून आपले महामंडळ काम करते. केंद्र सरकार १०० कोटी देण्यास तयार आहे, परंतु त्यासाठी शासनास हमी द्यावी लागेल. हमी देण्यास शासन तयार नाही. मा. मंत्री महोदयानी अनेक वेळा ही बाब वित्त विभागाच्या निदर्शनास आणली. तथापि, वित्त विभाग त्यास मान्यता देण्यास तयार नाही. १०० कोटीचा फंड आहे त्यामधून शैक्षणिक कर्ज, व्यावसायासाठी कर्ज, महिला बचत गटाना मदत इत्यादीकरीता हा निधी वापरता येऊ शकतो. परंतु त्यासाठी शासनाची हमी मिळणे आवश्यक आहे. हा केंद्र सरकारचा निधी आहे. केंद्र सरकारकडून निधी मिळाला तर राज्य शासनाच्या निधीत बचत होईल व त्याद्वारे शिष्यवृत्तीसाठी निधी वाढविता येऊ शकतो. सद्यःस्थितीत शिष्यवृत्तीची रक्कम वाढविण्यासाठी निधी उपलब्ध नाही. केवळ २५ हजार रूपये देण्यात येत आहे. सामाजिक न्याय विभागाने २ लाख रूपये केले असून ते ती देत आहे. या विभागाकडे त्याप्रकारची तरतूद नाही त्यामुळे शिष्यवृत्तीची रक्कम वाढविता येत नाही. केंद्र सरकार निधी देत आहे. राज्य शासन महामंडळाला ७५ कोटी देणार आहे. ही रक्कम शिष्यवृत्तीसाठी वापरण्यात येणार आहे.

समितीने स्पष्ट केले की, शैक्षणिक कर्जाच्या बाबतीत जी अपेक्षा व्यक्त झाली त्याबाबत जी काही नवीन नियमावली आहे त्या नियमावलीतील अटी व शर्थी शिथील करता येईल काय, विद्यार्थ्यांना कर्ज प्रक्रियेमध्ये जामिनदार मिळत नाहीत. सीडमनीच्या शैक्षणिक कर्जाच्या संदर्भात सद्यःस्थिती काय आहे, यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सीडमनी योजनेचा या वर्षी आरंभ केला जाणार आहे. यामध्ये ५० टक्के निधी बँक देणार असून त्याला १२-१३ टक्के व्याज असणार आहे. ४५ टक्के निधी महामंडळ ६ टक्के दराने देणार असून यामध्ये ५ टक्के रक्कम लाभार्थ्याची असणार आहेत. यामध्ये जास्तीत जास्त ५ लाख रुपये कर्ज मिळणार आहे.





समितीने असे सूचविले की, अर्जदाराने अर्ज करण्याची तारीख, अर्ज तपासणीची तारीख, तपासणी अंती प्रकरणांची यादी जाहीर करण्याची तारीख असा निश्चित कार्यक्रम असला पाहिजे. प्रवेश प्रक्रियेचा ठराविक कालावधी असतो, या वर्षीची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे, ती साधारणतः दोन महिने चालते, जे व्यावसायिक पाठ्यक्रम आहेत जसे वैद्यकीय, अभियांत्रिकी इत्यादीमध्ये प्रवेश घेतलेल्यांकडून दोन महिन्याच्या आत रक्कमेचा धनादेश जमा झाला नाही तर त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द होऊ शकतो. विद्यार्थ्यांना कर्ज मिळते याबाबतची माहिती त्याना देण्यात येते काय? तसेच याची माहिती उर्दू वर्तमानपत्रात देण्यात येते काय, विभागीय सचिवांनी सांगितले की, अशी निश्चित तारिख दिलेली नाही कारण महाविद्यालयांच्या प्रवेशाचे वेळापत्रक वेगवेगळे असते. जसजसे अर्ज प्राप्त होतील, तशी त्यांची तपासणी होत जाते. विद्यमान वर्षी एप्रिल पासून आता पर्यंत ३५१९ विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज दिले आहे. विद्यार्थ्यांना अर्जासंदर्भातील माहिती विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच याबाबतची माहिती उर्दू वर्तमानपत्रात देण्यात येईल.

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून गत ३ वर्षात कोणत्या योजनेखाली किती अर्ज प्राप्त झाले होते व त्यापैकी किती विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला. त्यासाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला. लाभापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांची योजनानिहाय संख्या व कारणे काय आहेत, निधी अनुलब्धतेमुळे किती लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत, महामंडळास जास्तीत जास्त लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी किती वाढीव निधीची आवश्यकता आहे. तसेच वेबसाईट बरोबरच वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन थेट शैक्षणिक कर्जाच्या योजनेची माहिती देणे आवश्यक आहे, असे समितीने स्पष्ट केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आताच शैक्षणिक वर्ष सुरू झालेले आहे. सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता बोनाफाईड सर्टिफिकेटची आवश्यकता असते. हळू हळू लाभार्थ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. सन २०१२-२०१५ पर्यंत एकूण ६७१८ विद्यार्थ्यांना ६४.७६ कोटी रुपयांचे शैक्षणिक कर्ज वाटप केले गेले आहे. ज्या लाभार्थ्यांच्या कर्ज प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत अशा लाभार्थ्यांना त्रुटींची पुर्तता करण्यासाठी कळविण्यात आले होते. त्रुटींची पुर्तता केल्यानंतर सदरील लाभार्थ्यांना कर्ज मंजूर करून वितरित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. निधीअभावी कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव प्रलंबित राहिले नाहीत. महामंडळासाठी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये भाग भांडवलातील अंशदान म्हणून शासनामार्फत ७५.०० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. विभागाच्या माध्यमातून थेट शैक्षणिक कर्ज योजनेची माहिती देणारी जाहिरात हिंदी, उर्दू, इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

शैक्षणिक कर्जाची मर्यादा किती आहे? एका जिल्ह्यामध्ये किती अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना कर्ज देण्यात येऊ शकते. कर्ज देण्याचे केव्हापासून सुरू करण्यात आले. शैक्षणिक कर्जासाठी जेवढे अर्ज प्राप्त होतात त्या सर्वांना कर्ज देण्यात येते की, काही जणाना कर्ज देण्यात येते असे समितीने विचारले असता, विभागीय

सचिवांनी सांगितले की, पाच लाखापर्यंत कर्ज देण्यात येते. कर्ज जिल्हानिहाय देण्याचे निकष नाही. शैक्षणिक वर्षापासून कर्ज देण्यास सुरुवात करण्यात येते. जो पात्र आहे त्या सर्वांना कर्ज देण्यात येते. त्यासंदर्भातील जी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे ती देणे आवश्यक आहे.

कर्ज देण्यासाठी दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक हमीदार आणि दुसरा मालमत्ता गहाण ठेवणे. गरीब विद्यार्थी हमीदार किंवा मालमत्ता गहाण ठेऊ शकत नसल्याने ते कर्ज मागतात अन्यथा ते कर्जासाठी आले नसते. याबाबत विचार होणे आवश्यक आहे. गरीब विद्यार्थी शैक्षणिक कर्ज घेतात तेव्हा त्यांना हमीदार मिळत नाही किंवा मालमत्ता नसल्याने ती गहाण ठेवण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे समितीने स्पष्ट करून पुढे अशी विचारणा केली की, यासंदर्भात काही सुविधा आहे काय, आतापर्यंत महामंडळाकडे शैक्षणिक कर्जाकरिता किती अर्ज आले आहेत, त्यापैकी किती विद्यार्थ्यांना कर्ज देण्यात आले, विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून दि. ६ ऑगस्ट पर्यंत ६४८ अर्ज आले आहेत. आणखी काही अर्ज येऊ शकतात. सध्या या संदर्भातील कार्यवाही सुरू आहे. ६४८ लाभार्थ्यांना कर्ज देण्यात आले आहे. शैक्षणिक कर्जाकरिता जेवढे अर्ज येतात, त्यांना महामंडळाकडून कर्ज दिले जाते. आता पर्यंत एकूण ४ कोटी ७२ लाख रुपयांचे कर्ज दिलेले आहे.

विद्यार्थ्यांना महामंडळाकडून पहिल्या वर्षीच्या फी करिता कर्ज मंजूर केले जाते. मात्र दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी त्यांच्या फी ची रक्कम महामंडळाकडून मंजूर केली जात नाही. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होते. त्यांच्या अर्जात काही त्रुटी राहिल्या असल्यास त्याबाबत सुरुवातीलाच तपासणी केली पाहिजे असे समितीने स्पष्ट केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या विद्यार्थ्यांनी फी करिता महामंडळाकडून कर्ज घेतलेले आहे, त्यांची महामंडळाला माहिती देणे ही महाविद्यालयाची देखील जबाबदारी आहे. तरीही या संदर्भात एक स्वतंत्र बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल.

ज्यांना ५० हजार रुपयांच्या कर्जाची आवश्यकता आहे, त्यांना ते कोठूनही मिळू शकेल. मात्र शैक्षणिक कर्ज कोठूनही मिळणार नाही. शैक्षणिक कर्जाचा विषय महत्त्वाचा मुद्दा म्हणून पुढे नेला पाहिजे. ज्यांनी महामंडळाकडून कर्ज घेतले, त्यातील किती लोक यशस्वी झाले, त्यांची किती उन्नती झाली, याची माहिती महामंडळाकडे आहे काय, या १३२५१ लाभार्थ्यांमध्ये कोणत्या जिल्ह्यातील किती लोकांना कर्ज दिले, त्यापैकी किती लोकांकडून त्याची परतफेड होण्याची शक्यता आहे, ज्या कारणासाठी, उद्योगासाठी कर्ज दिले आहे, त्या कारणासाठीच त्याचा उपयोग झाला आहे काय, याची माहितीही घेतली पाहिजे असे समितीने स्पष्ट केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, थेट कर्ज योजनेचे मुल्यमापन करण्याकरिता यशदा, पुणे यांना पत्र पाठविले आहे. त्यांच्याकडून याचे अंदाजपत्रक प्राप्त व्हावयाचे आहे. त्यांच्या संपर्कात आहे. अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर त्यास मान्यता प्राप्त करून घेऊन थेट कर्ज योजनेचे मुल्यमापन करून घेतले जाईल. मागच्या वर्षी जे कर्ज दिले होते, त्याची प्रतिपूर्ती या वर्षी झाली पाहिजे होती. अशा प्रकरणांमध्ये केसेस दाखल करण्याकरिता वकिलांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. जिल्हा



कार्यालयाकडून नोटिस पाठवायला सुरुवात झाली आहे. सर्वसाधारणपणे सर्व प्रकारची वसुली ३१.४३ टक्के आहे.

समितीने विचारणा केली की, मुदत कर्ज योजनेंतर्गत प्राप्त झालेले अर्ज व त्यांना वितरित करण्यात आलेली रक्कम किती आहे, लाभार्थ्यांची संख्या किती आहे. सुक्ष्म पतपुरवठा योजनेंतर्गत प्राप्त झालेले अर्ज व त्यांना कर्ज म्हणून वितरित करण्यात आलेली रक्कम किती आहे, यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, मुदत कर्ज योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या १३६४ इतकी होती. ८०९ अर्जदारांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट होते. परंतु लाभार्थ्यांची संख्या केवळ २७० इतकी होती. सुक्ष्म पतपुरवठा योजनेंतर्गत ७७० अर्ज प्राप्त झाले असून केवळ ४०२ पात्र लाभार्थ्यांना महामंडळाने ७.६२ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. यामध्ये महिला बचत गटांनीही अर्ज केलेले आहेत. ३६८ अर्जदारांना कर्ज नाकारण्यात आलेले आहे. अर्जदारांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना सुक्ष्म पतपुरवठा तत्त्वावर कर्ज पुरवठा केला जातो.

काही प्रकरणांमध्ये अर्जदाराने कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर त्याचे प्रकरण मंजूरीच्या टप्प्यावर पोहोचते. त्याच टप्प्यावर ऐनवेळी हमीदार बदलण्याकरिता सांगण्यात येते. ऐनवेळी अर्जदार कोठून हमीदार आणणार, अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, कधी कधी एक व्यक्ती चार ते पाच कर्ज प्रकरणात हमीदार म्हणून राहिलेला असतो. अशा प्रकारचे हमीदार ग्राह्य धरले जाऊ शकत नाहीत. काही प्रकरणात खोटे हमीदार असल्याचेही आढळून आलेले आहेत. कर्ज प्रकरण मान्यतेच्या पातळीवर येतात, त्यावेळी त्यामधील त्रुटी अंतिमतः दुरूस्त केल्या जातात. या पातळीवर हमीदारासंदर्भातील गोंधळ लक्षात आला असता, त्याबद्दल आक्षेप नोंदवून अर्जदारांना त्याबाबत कळविले गेले होते. अर्जदाराने नियमाप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता व हमीदाराची नेमणूक केल्यानंतर त्यांचे कर्ज प्रकरण नाकारण्याचे कारणच राहत नाही.

महामंडळामार्फत केलेल्या कर्ज वसुलीचा कालावधी कर्ज दिल्याच्या पुढील वर्षापासून पाच वर्षांपर्यंत अभिप्रेत असतो. कर्ज वसुलीची प्रक्रिया सुरू असून काही प्रकरणात वसुली झालेली आहे. काही प्रकरणात कर्ज वसुली होणे बाकी आहे. मुदत कर्जापेक्षा शैक्षणिक कर्जाची वसुली चांगली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

**अभिप्राय :**

**(१)** मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकरिता शासनाने ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल उपलब्ध करून दिले आहे. त्याअनुषंगाने महामंडळाला ३०० कोटी रुपये टप्पाटप्प्याने उपलब्ध करून दिले आहे. सन २०१५-१६ यावर्षासाठी ७५ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर केला आहे. मागील तीन वर्षात फक्त शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात आली. सन २०१४-१५ मध्ये बाकीच्या योजना सुरू केल्या. त्याअनुषंगाने थेट कर्ज योजनांतर्गत मुदत कर्ज योजना आणि सूक्ष्म पत पुरवठा या योजनेसाठी अर्ज मागविण्यात आले. लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्ज योजनांच्या अनुषंगाने ज्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे त्यांना कर्ज उपलब्ध होते. तसेच आयकर भरणारी एक व्यक्ती हमीदार व हमीदार नसेल तर मालमत्ता गहाण ठेवावी लागते. त्याशिवाय कर्ज उपलब्ध होत नाही. अनेक लाभार्थी गरीब असल्याने त्यांना हमीदार उपलब्ध होत नाही तसेच गहाण ठेवण्यासाठी मालमत्ता नसते, परिणामी अर्जदारांना शैक्षणिक कर्जाचा लाभ मिळू शकत नाही. विद्यार्थ्यांना महामंडळाकडून पहिल्या वर्षीच्या फी करिता कर्ज मंजूर केले जाते. मात्र दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी फीची रक्कम महामंडळाकडून मंजूर केली जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होते असे समितीच्या निदर्शनास आले. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळणे अत्यंत आवश्यक आहे. या महामंडळाचा नावलौकिक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देणारे महामंडळ आहे, अशी जनमानसामध्ये प्रसिद्धी झाली पाहिजे. महामंडळाने शैक्षणिक कर्जाकरिता असलेल्या अटी व शर्तीमध्ये शिथिलता आणणे आवश्यक आहे. तसेच इंटरनेटच्या माध्यमातून जास्तीतजास्त गरजूंना माहिती मिळाली पाहिजे. महामंडळाच्या कामकाजामध्ये कर्ज देण्याची, कर्ज वसुलीची पद्धत आवश्यकतेप्रमाणे सशक्त करण्यात आली पाहिजे. शैक्षणिक कर्जावर अधिक भर देणे आवश्यक आहे. शैक्षणिक कर्ज मंजुरी संदर्भातील सर्व कार्यवाही बाबतची माहिती विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे, असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**(२)** मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कर्मचारी वृंदाची संरचना आणि बिंदूनामावली सामान्य प्रशासन विभागाकडून मंजूर करून घेण्यात आली आहे. १५७ पदांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी ७६ पदांचे वेतन देण्याचे शासनाने मान्य केले आहे. परंतु अद्याप शासनाने एकाही पदाचे वेतन दिलेले नाही. यासंदर्भात वारंवार वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु अद्याप मंजुरी मिळालेली नाही. लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या कर्जाची १००% वसुली झाली तरच महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा वेतनावरील अनुदान देण्यात येईल असे वित्त विभागाचे अभिप्राय आहे, महामंडळाला सध्या कोणत्याही प्रकारचा फायदा होत नाही. महामंडळाची वसुली ज्यावेळेस १००% होईल त्याच वेळेस



महामंडळ फायद्यामध्ये जाईल. मात्र सद्यःस्थितीत महामंडळाची ३०% वसुली आहे. शासनाच्या अन्य विभागाच्या अखत्यारितील महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासन १००% अनुदान देते. तथापि, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी अनुदान देण्यात येत नाही. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची जेव्हापासून स्थापना झाली तेव्हापासून आजतागायत महामंडळातील एकाही पदाचे वेतन शासनाकडून मिळालेले नाही.

महामंडळातील ७६ कर्मचाऱ्यांचे वेतन भाग भांडवलातून भागविले जाते ते नियमबाह्य असून ते योग्य नाही. लाभार्थ्यांना भाग भांडवलातून कर्ज देणे अपेक्षित आहे. भाग भांडवलातून कर्मचाऱ्यांना वेतन दिले जात असल्यामुळे भागभांडवल कमी होत आहे. लाभार्थ्यांना मिळणाऱ्या कर्जाची रक्कम कमी होत असून यात लाभार्थ्यांचे नुकसान होत आहे. महामंडळ चालावे म्हणून ५०% पदे कंत्राटी पद्धतीने भरली आहेत. शासनाने जे ३०० कोटी भागभांडवल दिलेले आहे त्यातूनच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन खर्च भागविला जातो. सामान्य प्रशासन विभागाच्या कंत्राटी पद्धतीने पदे भरण्यासंबंधातील शासन निर्णयाचा आधार घेऊन पदे भरण्याकरिता जाहिरात दिली होती. त्यावेळी बिंदू नामावली व नियुक्तीचे नियम मंजूर नव्हते. आता नियुक्तीचे नियम मंजूर झालेले आहेत. त्यामध्ये कंत्राटी पद्धतीने जे उमेदवार कार्यरत आहे त्यांना कमाल वयोमर्यादा लागू होणार नाही. त्यामुळे ज्यावेळी जाहिरात येईल त्यावेळी अर्ज करू शकतील. राखीव प्रवर्गातील उमेदवार असेल तर तो देखील अर्ज करू शकतो. यात वयाची शिथिलता दिलेली आहे. कंत्राटी पद्धतीवर काम करीत असलेले उमेदवार न्यायालयात गेले. लिपिक तथा डाटा एन्ट्री टंकलेखक पदाच्या जाहिरातीस न्यायालयाने स्थगिती दिली, ही पदे भरावयाची असतील तर जेवढे उमेदवार न्यायालयात गेले तेवढी पदे सोडून उर्वरित पदे भरू शकतात असा न्यायालयाने निर्णय दिला. तथापि, पुढील कार्यवाही अद्याप केलेली नाही. कारण वेतनाचा प्रश्न आहे. वेतन देऊ शकत नसल्याने पदे भरणे योग्य होणार नाही. तसेच न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत कंत्राटी कामगारांसंदर्भात व भरतीसंदर्भात ठोस निर्णय घेणे शक्य नाही. जर न्यायालयाचा निकाल कंत्राटी कामगारांच्या बाजूने लागला नाही तर त्यांना शासनाच्या इतर नोकरीकरिता असलेल्या परीक्षांना बसण्याकरिता वयाची अट शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या १५७ पदांना सामान्य प्रशासन विभागाने मंजुरी देऊनही तसेच ७६ पदांचे वेतन देण्याचे मान्य करूनही लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाची १००% वसुली होत नाही तोपर्यंत वित्त विभाग अनुदान देण्यास तयार नाही. व्यवस्थापकीय संचालक नसल्याने महामंडळाच्या दैनंदिन कामकाजावर तथा योजनांच्या अंमलबजावणीवर परिणाम होत आहे. अल्पसंख्याक विभागाकडे संचालनालय नसल्यामुळे योजना राबविण्यासाठी खूप अडचणी निर्माण होतात. संचालनालयासंदर्भातील नस्ती सादर केलेली असून संचालनालय मिळाल्यास योजना राबविणे सोपे होईल. तसेच राष्ट्रीय अल्पसंख्याक वित्तीय विकास महामंडळाची एक एजन्सी म्हणून राज्याचे महामंडळ काम करते. केंद्र शासन

१०० कोटी रुपये देण्यास तयार आहे. परंतु त्यासाठी शासनाला हमी द्यावी लागले. शासन हमी देण्यास तयार नाही. मा.मंत्री महोदयांनी अनेक वेळा ही बाब वित्त विभागाच्या निदर्शनास आणली. तथापि, वित्त विभाग त्यास मान्यता देण्यास तयार नाही, असेही समितीच्या निदर्शनास आले आहे.

**शिफारशी :**

**(१)** मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जासाठीच्या वार्षिक उत्पन्नात वाढ करणे, शैक्षणिक कर्जाच्या अटी व शर्ती शिथिल करण्यासंदर्भात संचालक मंडळाची व वित्त विभागाची परवानगी घेणे तथा निकष बदलणे, इंटरनेटच्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध होण्यासाठी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये म्हणून कार्यवाही करणे, यास्तव अल्पसंख्याक समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळणे सुलभ करण्यात येऊन हे महामंडळ “विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देणारे महामंडळ” म्हणून नावारुपास यावे. याकरिता शासनाने तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

**(२) (अ)** मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळास पूर्ण वेळ व्यवस्थापकीय संचालक व सह व्यवस्थापकीय संचालक ही पदे भरण्यात यावीत. सामान्य प्रशासन विभागाने १५७ पदांना दिलेल्या मंजुरीपैकी ७६ पदांचे वेतन देण्याचे शासनाने मान्य केले आहे. तथापि, वित्त विभागाने मंजुरी दिली नसल्याने भागभांडवलाकडून वेतन देण्यात येत असल्याने लाभार्थ्यांच्या निधीत घट होते. त्यामुळे लाभार्थ्यांवर अन्याय होतो. त्याचप्रमाणे महामंडळाच्या भाग भांडवलातून कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणे नियमबाह्य असून ते योग्य नाही. सबब, इतर महामंडळाला ज्याप्रमाणे शासन वेतनासाठी व कार्यालयीन खर्चाकरिता अनुदान देते त्याप्रमाणे या महामंडळास अनुदान देण्यात यावे. यासंदर्भात शासनाच्या वित्त विभागाने पुढाकार घेऊन अनुदान मंजूर करण्याच्या दृष्टीने तात्काळ निर्णय करण्याची कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत असून यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

**(ब)** तसेच कंत्राटी पद्धतीने भरलेल्या ५०% उमेदवारांपैकी काही उमेदवार न्यायालयात गेल्याने न्यायालयाचा निर्णय कामगारांच्या बाजूने लागला नाही तर त्यांना शासनाच्या इतर नोकरीत असलेल्या परीक्षांना बसण्याकरिता वयाची अट शिथिल करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा अथवा त्यांनी एवढी वर्षे सेवा केल्याने त्याना या महामंडळातच घेणेबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.



**(३)** राज्यात अल्पसंख्याक संचालनालय स्थापन करण्याबाबत समितीने सन २०१३-१४ च्या पहिल्या अहवालात शिफारस केलेली असतानाही गत दोन वर्षात याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून राज्यात अल्पसंख्याक संचालनालय स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने सत्वर कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीला सादर करावा, अशी समिती पुनश्च शिफारस करीत आहे.

**(४)** मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ हे राष्ट्रीय अल्पसंख्याक वित्तीय विकास महामंडळाचे राज्यस्तरावर एजन्सी म्हणून काम करीत असल्याने केंद्र शासन १०० कोटी रुपये देण्यास तयार असल्याने यासाठी राज्य शासनाने द्यावयाच्या हमी संदर्भात गांभीर्यपूर्वक विचार करून सदरहू निधी शंभर टक्के महामंडळास मिळवून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. जेणेकरून महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारेल व शासनावरील भार कमी होण्यास मदत होईल असे समितीला वाटते. त्या दृष्टीने शासनाने तात्काळ कार्यवाही सुरू करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

## परिशिष्ट "अ"

**(अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचे सादरीकरण व त्याअनुषंगाने प्राप्त झालेली माहिती )**



अल्पसंख्याक विभागाच्या अधिकाऱ्यांनी समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांची सविस्तर माहिती देताना स्पष्ट केले की, अल्पसंख्याक समाजातील लोकांच्या विकासासाठी शासनाने विविध योजना राबविल्या आहेत. त्या सर्व योजनांची माहिती समितीस देण्याची विभागाची तयारी असून त्याचे सादरीकरण करावे लागणार आहे. समितीने प्रस्तुत सादरीकरण करण्यास अनुमती दिल्यावर समितीच्या दिनांक १७ जून २०१५ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांच्या माहितीचे पुढीलप्रमाणे सादरीकरण केले.

### डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

राज्यातील धर्मादाय आयुक्त व वक्फ बोर्डाकडे नोंदणी असणारे मदरसे आहेत. तसेच, या योजनेचे उद्दिष्ट मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी, उर्दू या विषयांचे आधुनिक शिक्षण देणे. त्यामुळे योजनेंतर्गत मदरशांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण दिले जाते. शिक्षकांच्या मानधनाकरिता अनुदान दिले जाते. मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इयत्ता नववी, दहावी, अकरावी व बारावीतील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालय इत्यादिंसाठी अनुदान दिले जाते. मदरशांमध्ये विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षणाबरोबर इतर विद्यार्थ्यांप्रमाणे क्रमिक पुस्तकांमधील शिक्षणही देणे महत्त्वाचे आहे. माननीय मंत्री महोदयांनी ज्याप्रमाणे मदरशामध्ये गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, इंग्रजी शिकविण्याचे आदेश दिलेले आहेत, त्याप्रमाणे खरोखर या विद्यार्थ्यांना उक्त विषयांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. याशिवाय या समाजाची शैक्षणिक व आर्थिक उन्नती होऊ शकत नाही.

"मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इयत्ता नववी, दहावी, अकरावी व बारावीतील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत आतापर्यंत मुस्लिम समाजातील वा अन्य अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीकरिता मागणी आली आहे काय व त्याप्रमाणे शिष्यवृत्ती वेळेवर दिली जाते काय, अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, अजूनही या योजनेचा प्रसार आवश्यक त्या प्रमाणात न झाल्यामुळे अल्पसंख्याक समाजाला या योजनेबाबत माहिती नाही. कालातीत ज्याप्रमाणे या योजनेचा प्रसार होईल, त्याप्रमाणे अधिकाधिक ही योजना लोकांना माहिती झाल्यानंतर शिष्यवृत्तीकरिता मागणी येईल.

## अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्याकरिता अनुदान उपलब्ध करणे

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या महाराष्ट्रातील ४३ अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांसाठी प्राधान्याने तसेच ज्या शहरांच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याकांची लोकसंख्या किमान १० टक्के पेक्षा जास्त आहे, अशा महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायती या योजनेचा लक्ष्यगट आहे. या योजनेचे उद्दिष्ट अल्पसंख्याक बहूल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे. महानगरपालिका / नगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात पुढील नागरी सोयीसुविधांसाठी अनुदान देणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेची सदरहू योजनेंतर्गत महानगरपालिकांना रुपये २० लाख, “अ” वर्ग नगरपालिकांना रुपये १५ लाख तसेच “ब” व “क” वर्ग नगरपालिकांना रुपये १० लाखापर्यंत अनुदान देण्यात येते.

## मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनांपैकी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना आहे. शैक्षणिक कर्ज योजनेंतर्गत केंद्र शासन व राज्य शासनामार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देण्यात येते तसेच या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना सरकारी जामीनदार मिळत नाही, त्यामुळे ते शैक्षणिक कर्ज घेऊ शकत नाही. म्हणून उच्च शिक्षण घेण्यापासून अल्पसंख्याक विद्यार्थी वंचित राहत आहेत. सदर योजनेसाठी केंद्र शासनाने १० लाखापर्यंत कर्ज मर्यादा केली असून राज्य शासनाने केंद्र शासनाप्रमाणे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मर्यादा १० लाख करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या वित्त विभागाकडे सादर करण्यात आला होता. परंतु वित्त विभागाने महामंडळामार्फत वाटप करण्यात आलेल्या कर्जाची वसुली ३० टक्के असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जाची मर्यादा वाढविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली नाही. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचा कर्मचारी वर्ग कमी असल्याने कर्जाची वसुली करणे शक्य होत नाही. महामंडळासाठी केवळ १५७ पदे मंजूर करण्यात आलेली असून वित्त विभागाने त्यांच्या वेतनासाठीचे अनुदान मंजूर केले नाही. इतर महामंडळांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येते. शासनाने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी अनुदान उपलब्ध करून दिले तर महामंडळाच्या कर्मचारी वर्गामध्ये वाढ करणे व पदभर्ती करणे शक्य होईल, योजना चांगल्या प्रकारे राबविणे शक्य होईल.

वेतन अनुदानाबाबत शासनाचे म्हणणे आहे की, विभागामार्फत नवीन राबवावयाच्या महिलांच्या योजनांसाठी ७५ कोटी रुपये आगाऊ निधी मंजूर करण्यात आला आहे. परंतु महिलांसाठी कर्ज योजना तयार करून लाभार्थ्यांना या निधीचा लाभ द्यावयाचा आहे. इतर विभागामार्फत मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या कर्ज योजनामध्ये लाभार्थ्यांना अनुदान दिले जाते. परंतु मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडील कर्ज लाभार्थ्यांना १०० टक्के व्याजासह परत करावे लागते. शैक्षणिक कर्जासाठीचा व्याज दर हा ३ टक्के व इतर योजनांसाठी ६ टक्के दर सध्या महामंडळाकडून आकारण्यात येत आहे.



## राज्यातील अल्पसंख्याक बहूल क्षेत्रात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नवीन तंत्रनिकेतन सुरू करणे

राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नवीन तंत्रनिकेतन सुरू करणे या योजनेच्या उद्दिष्ट असून लक्ष्यगट राज्यातील अल्पसंख्याक समाजातील उमेदवार आहेत. या योजनेचे उद्दिष्ट अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांमधील होतकरु उमेदवारांचे तांत्रिक कौशल्य वाढविणे. या योजनेच्या माध्यमातून मुक्ताई नगर, जि.जळगाव येथे ३०० प्रवेश क्षमतेचे ( एकूण १०२० विद्यार्थी क्षमता असलेले ) नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. अद्याप या तंत्रनिकेतनला एआयसीटीईची परवानगी मिळणे बाकी आहे. तत्पूर्वी या तंत्रनिकेतनची इमारत बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

## अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतीगृह योजना

अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृह योजनेचा लक्ष्यगट राज्यातील अल्पसंख्याक समाजातील ( मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन ) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी आहेत. या योजनेचे उद्दिष्ट अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध करून मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढविणे हे होय. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींसाठी वसतिगृहे बांधणे व नजिकच्या शासकीय शैक्षणिक संस्थेमार्फत वसतिगृहांचे व्यवस्थापन करणे, असे या योजनेचे स्वरुप आहे. तसेच, या योजनेच्या माध्यमातून कोल्हापूर, चंद्रपूर, पनवेल व घनसावंगी येथे वसतिगृहे सुरू झाली आहेत. औरंगाबाद, परभणी येथे तीन, अमरावती व हिंगोली येथे दोन व वाशिम येथे दोन अशी एकूण ९ वसतिगृहे विद्यमान शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार आहेत. उर्वरित जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारे वसतिगृहे सुरू करण्याकरिता जागा उपलब्ध करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा सुरू आहे. या वसतिगृहांमध्ये अल्पसंख्याक समाजातील मुलांकडून नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे. मुंबई येथील वसतिगृहांमध्ये रु.४१५० अन्यत्र रु.२,८५० प्रति सत्र असे शुल्क अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकडून आकारले जाणार आहे. रुपये २.५० लाख वार्षिक उत्पन्न असणाया पालकांच्या मुलींना विनाशुल्क प्रवेश दिला जाणार आहे. या वसतिगृहांमध्ये सत्तर टक्के जागा अल्पसंख्याकाकरिता राखीव ठेवण्यात येणार आहेत. उर्वरित ३० टक्के जागा इतर समाजातील विद्यार्थीनींकरिता ठेवल्या जाणार आहेत. परंतू, जर अल्पसंख्याकांचेच जास्त विद्यार्थी आले तर त्यांनाच प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे.

### राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळास भाग भांडवल या योजनेची वैशिष्ट्ये

राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली या महामंडळाला देशातील अल्पसंख्यांकांच्या विकासाकरिता राबवावयाच्या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाचा वाटा म्हणून राज्यातील अल्पसंख्याक लोकसंख्येच्या आधारावर रुपये ३५७८.६२ लाख एवढे भाग भांडवली अंशदान द्यावयाचे आहे. सन २००२-२००३ ते २०१४-२०१५ पर्यंत रुपये २३५८.०० लाख रुपये भाग भांडवल वितरीत करण्यात आले आहे.

राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास सन २००२ पासून आतापर्यंत रुपये ७२.३४ कोटी इतके कर्ज प्राप्त झाले आहे.

### राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत अनुदान उपलब्ध करण्याबाबतच्या योजनेची वैशिष्ट्ये

राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक समुहाची लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायती हे या योजनेचा लक्ष्यगट आहे. अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या योजनेंतर्गत पात्र ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात पुढील मुलभूत/पायाभूत सोयीसुविधांसाठी सन २०१४-२०१५ या वर्षापासून अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. कब्रस्तान/स्मशान/अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षक भिंतीसह सर्व सुविधा, सार्वजनिक सभागृह, लग्न हॉल, सर्व नागरी/पायाभूत सुविधा उदा. पिण्याच्या पाण्याची सुविधा, विद्यूत पुरवठा, इदगाह, सांडपाण्याची व्यवस्था, रस्ते, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, अंगणवाडी, बालवाडी केंद्र इत्यादि. सदरहू योजनेंतर्गत अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना प्रति ग्रामपंचायत कमाल रुपये दहा लाखापर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

### राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवारांकरिता मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबंधीत योजना

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवारांकरिता मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबंधीत योजनेचा मूळ उद्देश अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांचे शासकीय नोकरीतील प्रमाण वाढविणे. गरीबी आणि अशिक्षितपणा यामुळे ते स्पर्धा परीक्षांना बसू शकत नाही. त्यामुळे त्यांना शासकीय नोकऱ्या मिळत नाहीत. राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील उमेदवारांना शासकीय, निमशासकीय सेवेत रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देण्याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँकिंग सेवा



इत्यादि स्पर्धा परिक्षांसाठी प्रशिक्षण तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमामधील प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण आणि इयत्ता दहावी व बारावी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक उमेदवारांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरू करण्यासाठी दिनांक २५ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबंधीत योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील मुंबई, ठाणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, पुणे व नाशिक या शहरांमध्ये प्रशिक्षण केंद्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तत्पूर्वी अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण केंद्रांना शासनातर्फे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना नाममात्र शुल्कामध्ये प्रशिक्षण देण्याची विनंती केली जाणार आहे. अंजुमन इस्लाम कॉलेजमध्ये अशा प्रकारच्या शिकवणी वर्गांची सुरुवात झाली आहे.

### पोलीस भरती पूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्ग

पोलीस वर्गामध्ये अल्पसंख्याक समाजाचे प्रमाण वाढविण्याकरिता प्रयत्न करण्याकरिता पोलीस भरती पूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्ग ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेचा लक्षगट राज्यातील अल्पसंख्याक समुहातील इच्छुक अल्पसंख्याक उमेदवार आहे. सन २००९-२०१० पासून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत सदर योजना राबविण्यात येत आहे. अल्पसंख्याक समुहातील इच्छुक प्रशिक्षणार्थी उमेदवाराला प्रति माह रुपये १,५०० विद्यावेतन, गणवेशाकरिता रुपये १,००० तसेच, दोन प्रशिक्षकांना रुपये ३०,००० प्रति महिना मानधन देण्यात येते.

### मराठी भाषा फाऊंडेशन वर्ग

राज्यातील अल्पसंख्याक समुहातील अमराठी शाळेतील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे ज्ञान व्हावे याकरिता मराठी भाषा फाऊंडेशन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. शासकीय सेवेतील अल्पसंख्याक उमेदवारांचे प्रमाण वाढविणे व मराठी भाषेवर प्रभुत्व निर्माण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. सदर योजना महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी (निरंतर) यांच्या मदतीने राबविण्यात येते. शिक्षकांना रुपये ५,००० प्रति माह मानधन देण्यात येते.

अल्पसंख्याक संवर्गातील व्यक्तींसाठी शासनाची घरकुल योजना होती. परंतु अल्पसंख्याक समाजातील व्यक्तीकडे स्वतःची जमीन नसल्यामुळे त्यांना या योजनेचा फायदा घेता आला नाही. सदर योजनेचा निधी खर्च न झाल्याने तो स्थानिक स्तरावरून इतर योजनासाठी वळविण्यात आला. अल्पसंख्याक समाजातील व्यक्तीकडे जर जमीन नसेल तर त्यांना घरकुले उपलब्ध करून देण्यासाठी बहुमजली इमारतीचा पर्याय उपलब्ध करून देणे शक्य आहे. तसेच, अल्पसंख्याक समाजामध्ये मोठ्या प्रमाणात दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याने त्यांची मुले चांगल्या शाळेत प्रवेश घेऊ शकत नाहीत, कारण त्या शाळांची फी त्यांना परवडत नाही.

यावर्षी अल्पसंख्याक विभागास २२९ कोटी रुपये आर्थिक तरतूद शासनाने मंजूर केली आहे. परंतु ही तरतूद विभागाच्या योजना राबविण्यासाठी अल्प असल्याने ती ७०० कोटी रुपयापर्यंत वाढवून मिळणेबाबत विभागामार्फत पुरवणी मागणी सादर करण्यात येणार आहे. विभागाचे बजेट अल्प असल्याने बऱ्याच योजनांना मंजुरी देणे शक्य होत नाही.

अल्पसंख्याक समाजातील लोक शिक्षित नसल्याने त्यांना नोकरी मिळू शकत नाही, त्यामुळे त्यांची प्रगती होऊ शकत नाही. या समाजातील लोकांनी शिक्षण घ्यावे व त्यांची प्रगती व्हावी, यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या निधीमध्ये वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या अल्पसंख्याक विभागाकडे ८ लाख विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केला असून त्यापैकी अडीच लाख विद्यार्थ्यांना विभागामार्फत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात या समाजातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहतात. त्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता वर्षाला एक हजार ते दीड हजार इतकी शिष्यवृत्ती दिल्यास जास्तीत जास्त पालक मुलांना शाळेत पाठवतील. अल्पसंख्याक समाजातील मुलांचे शाळेतील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याकरिता शालेय शिक्षण विभागास विनंती करण्यात आली आहे. अल्पसंख्याक समाजातील केवळ २ ते ३ टक्के मुले उच्च शिक्षण घेत आहेत व हे प्रमाण अतिशय नगण्य आहे.

# राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी अल्पसंख्याक विकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना.



## १) अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना :-



(अ) योजनेचा लक्ष्यगट :- ७०% अल्पसंख्याकविद्यार्थी असलेल्या शासनमान्य खाजगी शाळा/कनिष्ठ महाविद्यालये /औद्योगिक प्रशिक्षण संस्था
५०% पेक्षा जास्त अल्पसंख्याक विद्यार्थी असलेल्या अपंग शाळा.

(ब) योजनेचे उद्दिष्ट :- उपरोक्त शाळांमध्ये /औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देवून शिक्षणाचा दर्जा उंचावणे.

(क) योजना :- शाळांच्या इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी, शुध्द पेयजलाची व्यवस्था, ग्रंथालय अद्ययावत करणे, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, प्रसाधनगृह/ स्वच्छतागृह उभारणे/ डागडुजी करणे, बेंचेस, पंखे, इन्व्हर्टर या सुविधा पुरविणे व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य इ.साठी अनुदान.

(ड) अनुदानाची रक्कम :- कमाल रुपये २.०० लक्ष

# २. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**अ) योजनेचा लक्ष्यगट** :- उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थी.

**ब) योजनेचे उद्दिष्ट** :- अल्पसंख्याक समाजातील होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षण घेण्यास प्रेरीत करणे.

**क) योजनेचे स्वरुप** :- (१) वैद्यकीय व अर्धवैद्यकिय अभ्यासक्रम /तांत्रिक व व्यावयिक शैक्षणिक अभ्यासक्रम यासाठी आकारण्यात आलेले वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु.२५,००० /

(२) इयत्ता १२ वी नंतरचे अभ्यासक्रम उदा.कला, वाणिज्य व विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु.५०००/-

उपरोक्तपैकी जी रक्कम कमी असेल तेवढ्या रकमेची शिष्यवृत्ती.

(ड) पात्रता :- विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे सर्व स्तोत्राद्वारे मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. २,५०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक
विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

या योजनेतंर्गत ऑन लाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येतात व शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये ईसीएस पध्दतीद्वारे थेट जमा करण्यात येते.



# ३) <u>डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना</u>

(अ) **योजनेचा लक्ष्यगट**:-राज्यातील धर्मादाय आयुक्त व वक्फ बोर्डाकडे नोंदणी असणारे मदरसे.

ब) योजनेचे उद्दिष्ट :- मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे आधुनिक शिक्षण देणे.

क) योजना :- मदरशांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण

शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान,

मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, इ. १० वी, ११ वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती,

मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालय इत्यादीसाठी अनुदान.

## ४) अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान उपलब्ध करण्याबाबत.

अ) **योजनेचा लक्ष्यगट :-** केंद्र शासनाने निश्चित केलेल्या महाराष्ट्रातील ४३ अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रांसाठी प्राधान्याने तसेच ज्या शहरांच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्यांकांची लोकसंख्या किमान १०% पेक्षा जास्त आहे, अशा महानगरपालिका/नगरपालिका/ नगर पंचायती.

ब) **योजनेचे उद्दिष्ट :-** अल्पसंख्याक बहूल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे.

क) **योजना :-** महानगरपालिका/नगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात पुढील मूलभूत नागरी सोयीसुविधांसाठी अनुदान.

(१) कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती,
(२) पिण्याच्या पाण्याची सुविधा,
(३) विद्युत पुरवठा,
(४) सांडपाण्याची व्यवस्था,
(५) रस्ते / पथदिवे,
(६) सार्वजनिक स्वच्छतागृहे,
(७) अंगणवाडी, बालवाडी केंद्रे इत्यादी.
(८) समाज मंदिर / सामाजिक सभागृह
(९) ) इदगाह विकास

सदरहू योजनेअंतर्गत महानगरपालिकांना रु.२० लाख, "अ" वर्ग नगरपालिकांना रु.१५ लाख तर "ब" व "क" वर्ग नगरपालिकांना रु.१० लाखापर्यंत अनुदान.



## ५) अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान उपलब्ध करण्याबाबत

अ) **योजनेचा लक्ष्यगट :-** राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकुण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक समुहाची लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा ग्रामपंचायती.

ब) **योजनेचे उद्दिष्ट :-** अल्पसंख्याक बहूल ग्रामिण क्षेत्रात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

क) **योजना :-** अल्पसंख्याक बहूल ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील पुढील मूलभूत सोयीसुविधांसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(१) कब्रस्तान/स्मशानभूमी/अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षक भींतीसह सर्व सुविधा.
(२) पिण्याच्या पाण्याची सुविधा,
(३) विद्युत पुरवठा,
(४) सांडपाण्याची व्यवस्था,
(५) रस्ते / पथदिवे,
(६) सार्वजनिक स्वच्छतागृहे,
(७) अंगणवाडी, बालवाडी केंद्रे इत्यादी.
(८) समाज मंदिर / सामाजिक सभागृह
(९) ) इदगाह विकास

सदरहू योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना रु.१० लाख, अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर योजना संबधीत जिल्ह्यातील जिल्हाधीकारी यांचेमार्फत राबविण्यात येते.

## ६) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मांडवी (मुंबई शहर) व चांदिवली (मुंबई उपनगर) येथे नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था व विद्यमान ४२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसऱ्या/तिसऱ्या पाळीमध्ये अभ्यासक्रम सुरु करणे

(अ) **योजनेचा लक्ष्यगट** :- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी

(ब) **योजनेचे उद्दिष्ट** :- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व्यवसायिक शिक्षण.

(क) **योजना** :- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व्यवसायिक शिक्षण देण्यासाठी मांडवी (मुंबई शहर) व चांदिवली (मुंबई उपनगर) येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची उभारणी

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ४२ विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या / तिसऱ्या पाळीमध्ये सप्टेंबर,२०१० पासून अभ्यासक्रम सुरु.



## ७) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी विद्यमान तंत्रनिकेतनामध्ये दुसऱ्या पाळीमध्ये अभ्यासक्रम सुरु करणे

- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि.१३.०९.२०११, दि.१९.७.२०१२ व दि.०८.०७.२०१४ रोजी निर्गमित केले आहेत. त्यानुसार खालील १५ तंत्रनिकेतनामध्ये दुसरी पाळी सुरु करण्यात आलेली आहे -
- सन २०११-१२ :- ठाणे, सोलापूर, जळगाव, नांदेड, यवतमाळ, मुंबई शहर व मुंबई उपनगर (एकूण ७).
- सन २०१२-१३ :- रत्नागिरी, जालना, अंबड, ब्रह्मपूरी, कराड (एकूण ५)
- सन २०१४-१५ :- पुणे, लातूर व हिंगोली (एकूण ३)
- प्रवेश क्षमता एकूण १९२० विद्यार्थी.

## ८) राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे सुरु करणे

अ)**योजनेचा लक्ष्यगट** :- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील बेरोजगार उमेदवार.

ब)**योजनेचे उद्दिष्ट** :- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांमधील बेरोजगार उमेदवारास रोजगार मिळण्यास मदत करणे.

क)योजना :- अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांना व्यवसायिक शिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने राज्यातील औरंगाबाद, नागपूर, नाशिक, नांदेड, पुणे व वाशिम येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या कायम विनाअनुदान तत्वावर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्याच्या धोरणानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे सहा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात येतील. याकरिता कायम विनाअनुदानित तत्वावर औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणाऱ्या व चालवू इच्छिणाऱ्या नामांकित अशासकीय अल्पसंख्याक (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) शैक्षणिक संस्थांची विहित निकषांच्या आधारे निवड करून अशा संस्थांना प्रत्येकी रु. ३ कोटी इतके अनुदान अल्पसंख्याक विकास विभागाकडून उपलब्ध करुन दिले जाईल.



## ९) मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थीक विकास महामंडळ

- मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रू. २५०.०० कोटीवरून दि.०६.०६.२०१३ च्या शासन निर्णयान्वये रू.५०० कोटीपर्यंत वाढविण्यात आले आहे.
- आतापर्यंत महामंडळास रू. ३००.६९१० कोटी भाग भांडवल देण्यात आले आहे.
- महामंडळाने सन २००१ पासून आतापर्यत विविध कर्ज योजनेंतर्गत ८५५५२ लाभार्थ्यांना रू.४१९.५९ कोटी कर्ज मंजूर केले असून त्यापैकी ६५२३३ लाभार्थ्यांना रू.२८७.३४ कोटी कर्ज वितरीत केले आहे.

## १०) राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नविन तंत्रनिकेतन सुरु करणे.

अ)योजनेचा लक्ष्यगट :- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील उमेदवार.

ब)योजनेचे उद्दिष्ट :- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांमधील होतकरु उमेदवारांचे तांत्रिक कौशल्य वाढविणे.

क)योजना :- मुक्ताईनगर, जि.जळगाव येथे ३०० प्रवेश क्षमतेचे (एकूण १०२० विद्यार्थी) नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्याचा निर्णय.



## ११) अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतीगृह योजना

(अ) योजनेचा लक्ष्यगट :- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी.

(ब) योजनेचे उद्दिष्ट :- अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतीगृहाची सोय उपलब्ध करुन मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवणे.

(क) योजना :- राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी वसतीगृहे बांधणे व नजिकच्या शासकीय शैक्षणीक संस्थेमार्फत वसततिगृहाचे व्यवस्थापन

कोल्हापूर, चंद्रपूर, पनवेल, घनसावंगी येथे वसतीगृहे सुरु.

औरंगाबाद, परभणी (३), अमरावती, हिंगोली (२) व वाशीम (२) अशी एकूण ९ वसतीगृहे चालू शैक्षणीक वर्षापासून सुरु होणार आहेत.

उर्वरित जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध करण्याबाबत जिल्हाधीकाऱ्यांकडे पाठपुरावा सुरु.

नाममात्र शुल्क (मुंबई येथे रु. ४,१५०/-, अन्यत्र रु. २,८५०/- प्रति सत्र)

रुपये २.५० लाख वार्षीक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलींना विनाशुल्क प्रवेश

## १२) राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळास भाग भांडवल (NMDFC)

- राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली या महामंडळाला देशातील अल्पसंख्यांकांच्या विकासाकरीता राबवावयाच्या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाचा वाटा म्हणून राज्यातील अल्पसंख्यांक लोकसंख्येच्या आधारावर रू. ३५७८.६२ लाख एवढे भाग भांडवली अंशदान द्यावयाचे आहे.
- सन २००२-२००३ ते सन २०१४-१५ पर्यंत रू. २३५८.०० लाख भाग भांडवल वितरीत करण्यात आले आहे.
- राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली कडून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास सन २००२ पासून आतापर्यंत रु.७२.३४ कोटी इतके कर्ज प्राप्त झाले आहे.



## १३) राज्यातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामिण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रमातंर्गत अनुदान उपलब्ध करण्याबाबत

**अ) योजनेचा लक्ष्यगट** :-राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकुण लोकसंख्येपैकी अल्पसंख्यांक समुहाची (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायती.

**ब) योजनेचे उद्दिष्ट** :- अल्पसंख्याक बहूल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत /पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

**क) योजना** :- या योजनेंतर्गत पात्र ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात पुढील मूलभूत/पायाभूत सोयीसुविधांसाठी सन २०१४-१५ या वर्षापासून अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

(अ) कब्रस्तान/स्मशान/अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षक भिंतीसह सर्व सुविधा,

(ब) सार्वजनिक सभागृह/शादीखाना हॉल.

(क) सर्व नागरी/पायाभूत सुविधा उदा.पिण्याच्या पाण्याची सुविधा/ विद्यूत पुरवठा/इदगाह/ सांडपाण्याची व्यवस्था/ रस्ते / पथदिवे/सार्वजनिक स्वच्छतागृहे , अंगणवाडी, बालवाडी केंद्रे इत्यादी

सदरहू योजनेअंतर्गत अल्पसंख्यांक बहूल ग्रामपंचायतींना प्रतिग्रामपंचायत कमाल रू. १० लाखापर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## १४) राज्यातील अल्पसंख्यांक लोकसमुहातील उमेदवाराकरीता मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना

- राज्यातील अल्पसंख्यांक लोकसमूहातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत रोजगारांच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देण्याकरीता केंद्रीय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/बँकिग सेवा इत्यादी स्पर्धा परिक्षांसाठी प्रशिक्षण तसेच व्यवसायिक अभ्यासक्रमामधील प्रवेशाकरीता घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परिक्षांच्या पुर्वतयारीसाठी प्रशिक्षण आणि इयत्ता १० वी १२ अनुत्तीर्ण अल्पसंख्यांक उमेदवारांकरीता विशेष शिकवणी वर्ग सुरू करण्यासाठी दि २५.०६.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबंध्द योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.
- या योजनेंतर्गत राज्यातील मुंबई, ठाणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, पुणे व नाशिक या शहरांमध्ये प्रशिक्षण केंद्रांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे



## १५) पोलीस भरती पूर्व परिक्षा प्रशिक्षण वर्ग

अ) **योजनेचा लक्ष्यगट** :-राज्यातील अल्पसंख्यांक समुहातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) इच्छुक अल्पसंख्यांक उमेदवार.

ब) **योजनेची सुरुवात** :- सन २००९-१० पासून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत सदर योजना राबविण्यात येत आहे.

क) योजनेचे स्वरुप :-
अल्पसंख्याक समुहातील इच्छुक प्रशीक्षणार्थी उमेदवाराला प्रति माह रु.१,५००/- विद्यावेतन.
गणवेषासाठी रु.१,०००/- तसेच,
दोन प्रशीक्षकांना रु.३०,०००/- प्रति महिना मानधन

# १६) मराठी भाषा फौंडेशन वर्ग

**अ) योजनेचा लक्ष्यगट** :-राज्यातील अल्पसंख्यांक समुहातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) अमराठी शाळेतील इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी चे विद्यार्थी

**ब) योजनेचे उददिष्ट** :- शासकीय सेवेतील अल्पसंख्याक उमेदवारांचे प्रमाण वाढविणे व मराठी भाषेवर प्रभुत्व निर्माण करणे.

**क) योजनेचे स्वरुप** :- सदर योजना महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत संबंधीत जिल्ह्यातील जिल्हाधीकारी व शीक्षणाधीकारी (निरंतर) यांच्या मदतीने राबविण्यात येते. शीक्षकांना रु. ५,०००/- प्रति माह इतके मानधन देण्यात येते.



# १७) केंद्र पुरस्कृत बहूक्षेत्रीय विकास कार्यक्रम (MsDP)

**(अ) योजनेचे उद्दिष्ट** :- अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.

**(ब) योजनेचे स्वरुप** :-

(I) ११ वी पंचवार्षीक योजना - बुलढाणा, वाशीम, हींगोली व परभणी या चार अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यांचा समावेश.

जिल्ह्यांमध्ये MsDP अंतर्गत घरकुल योजना, अंगणवाडी बांधकाम आणी मुलींचे वसतीगृह बांधकाम योजना राबविण्यात येत आहे.

(II) १२ व्या पंचवार्षीक योजनेत केंद्र पुरस्कृत बहूक्षेत्रीय विकास कार्यक्रमा अंतर्गत राज्यातील बुलढाणा, वाशीम, हींगोली व परभणी या चार अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यामध्ये एकूण ८ मुला-मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम करण्यात येत आहे.

(III) १२ व्या पंचवार्षीक योजनेत (सुधारित) केंद्र पुरस्कृत बहूक्षेत्रीय विकास कार्यक्रमा अंतर्गत राज्यातील बुलढाणा, वाशीम, हींगोली, यवतमाळ, जालना, लातूर, बीड, जळगाव व परभणी या ९ अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यातील आठ गट व सहा शहरांचा समावेश केला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार या आठ गट व सहा शहरांमध्ये पायाभूत सुविधांचे किमान रु. १० कोटी इतक्या रकमेचे सुयोग्य प्रस्ताव संबंधीतांकडून प्राप्त करुन घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

## अल्पसंख्याकांसाठी विविध योजना :-

१) राज्यातील अल्पसंख्यांक लोकसमूहातील महिलांसाठी स्वयंसहाय्यता बचतगट :-

(सन २०१५-१६) करीता मंजूर नियतव्यय २ कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय १.४० कोटी इतका आहे.)

अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करुन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांमध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौद्ध, जैन व पारशी या लोकसमूहातील महिलांचे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्यास शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि.२८/०२/२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात मुंबई महानगर क्षेत्र (मुंबई शहर व मुंबई उपनगर), नांदेड, मालेगांव (जि.नाशिक), कारंजा (जि. वाशिम), परभणी, पुणे, नागपूर, औरंगाबाद, भिंवडी, मुंब्रा-कौसा(जि. ठाणे) आणि मिरज (जि.सांगली) या ११ शहरांमध्ये अल्पसंख्यांक महिलांचे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेची अंमलबजावणी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी रु. १.४० कोटी एवढी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

२) मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबद्ध योजना :-

(सन २०१५-१६ करीता मंजूर नियतव्यय ५ कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय ३.५० कोटी इतका आहे.)

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करुन देण्याकरिता केंद्रिय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/बँकीग सेवा इ. स्पर्धा परिक्षांसाठी प्रशिक्षण तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण आणि इ. १० वी व १२ वी अनुर्त्तीर्ण अल्पसंख्याक उमेदवारांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करण्यासाठी राज्यातील विश्वसनीय अशा नामांकित बिगर शासकीय खाजगी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबंध्द योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील मुंबई, ठाणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर नाशिक व पुणे या शहरांमध्ये प्रशिक्षण केंद्रांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(अ) या योजनेंतर्गत नागरी सेवा परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार रु.२५,०००/- किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.

(ब) राज्य नागरी सेवा परिक्षांच्या (राजपत्रित) परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार रु.२०,०००/- किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.



(क) राज्य नागरी सेवा परिक्षांच्या (अराजपत्रित) परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार रु.१५,०००/- किंवा संस्थेमार्फत आकरण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.

(ड) बँकिंग सेवा परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार रु.८,०००/- किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.

(इ) तांत्रिक /व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रवेशांकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना प्रति उमेदवार प्रति वर्ष रु.२०,०००/- किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल. वर्षासाठी कमाल मर्यादा रु. ४०,०००/-.

(ई) इ. १० वी व १२ वी अनुर्त्तीर्ण अल्पसंख्याक विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी विशेष शिकवणी वर्ग परिक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षणांतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना इ. १० वी साठी प्रति उमेदवार रु.४,०००/- व इ. १२ वी साठी प्रति उमेदवार रु. ५,०००/- एवढी रक्कम किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारे शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.

सदर योजनेंतर्गत खालीलप्रमाणे उमेदवारांना विविध प्रशिक्षण वर्गामध्ये प्रशिक्षण अनुज्ञेय आहे :-

| प्रशिक्षण वर्ग | | | |
|---|---|---|---|
| लोकसेवा आयोग स्पर्धा परिक्षा | UPSC | | २५० |
| | MPSC | राजपत्रित | २५० |
| | | अराजपत्रित | ५०० |
| | एकूण | | १००० |
| बँकिंग सेवा परिक्षा | ४०० | | |
| तांत्रिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम | अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र | | २०० |
| | वैद्यकिय | | २०० |
| | सनदी लेखापाल,व्यवस्थापन, विधी व तत्सम | | २०० |
| | एकूण | | ६०० |
| माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेमध्ये अनुर्त्तीण विद्यार्थ्यांसाठी विशेष शिकवणी वर्ग | १० वी | १००० | |
| | १२ वी | १००० | |

३) अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, अपंग शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांमध्ये पायाभूत सोयी - सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना :-

(सन २०१५-१६) करीता मंजूर नियतव्यय ३० कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय २१.०० कोटी इतका आहे.)

अ) **योजनेचा लक्ष्यगट** - राज्यातील ज्या शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांमध्ये ७० % व अपंग शाळांमध्ये ५० % पेक्षा जास्त अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत अशा शाळा/ औद्योगिक प्रशिक्षण संस्था

ब) **योजनेचे उद्दीष्ट** :- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्राबल्य असलेल्या राज्यातील शाळांमध्ये /औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये पायाभूत सोयी - सुविधा उपलब्ध करुन देवून शिक्षणाचा दर्जा उंचावणे.

क) योजना :-या योजनेंतर्गत राज्यातील ज्या शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये ७०% व अपंग शाळांमध्ये ५०% पेक्षा जास्त अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत अशा शाळांच्या इमारतीची नुतनीकरण व डागडुजी, शुध्द पेयजलाची व्यवस्था करणे, ग्रंथालय अद्ययावत करणे,प्रयोगशाळा उभारणे/ अद्ययावत करणे, संगणक कक्ष उभारणे/अद्ययावत करणे,प्रसाधनगृह/स्वच्छतागृह उभारणे/डागडुजी करणे, बेंचेस , पंख्याची व्यवस्था करणे, इन्व्हर्टरची सुविधा निर्माण करणे व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य इ.साठी कमाल रु.२.०० लक्ष पर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

या योजनेंतर्गत मागील ५ आर्थिक वर्षामध्ये वितरीत करण्यात आलेला निधी व लाभार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | वर्ष | वितरीत निधी | लाभार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २००८-०९ | २१.९९ कोटी | ११०७ शाळा |
| २ | २००९-१० | २४.६४ कोटी | १२३२ शाळा |
| ३ | २०१०-११ | ३७.२६ कोटी | १८६३ शाळा |
| ४ | २०११-१२ | ४१.९० कोटी | २१११ शाळा |
| ५ | २०१२-१३ | ३४.७२ कोटी | १८७२ शाळा |
| ६ | २०१३-१४ | ३९.८७ कोटी | २००१ शाळा |
| | एकूण | २००.३८ कोटी | १०१८६ शाळा |

ड) योजनेकरिता आर्थिक तरतूद (सन २०१५-१६)- रु. ३०.०० कोटी

इ) भौतिक उद्दिष्ट :-

ई) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- जिल्हाधिकारी कार्यालय/अल्पसंख्याक विकास विभाग

४) <u>झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना :-</u>

(सन २०१५-१६) करीता मंजूर नियतव्यय १० कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय ७ कोटी आहे.)

अ) योजनेचा लक्ष्यगट :- १राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेले मदरसे

ब) योजनेचे उद्दीष्ट :- मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे आधुनिक शिक्षण देणे

क) योजना :- मदरशांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयाचे शिक्षण देणे त्याकरीता शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, इ. १० वी, इ. ११वी व इ. १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे, यादृष्टीने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सविधा, ग्रंथालय,इ. साठी अनुदान देणे.



शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे :-

| अ.क्र. | इयत्ता | एकूण विद्यार्थी | शिष्यवृत्तीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ९ वी व १० वी | ६०० | रु.४,०००/- |
| २ | ११ वी, १२ वी व ITI | ४०० | रु.५,०००/- |

ड) योजनेकरीता आर्थिक तरतूद :- सन २०१५-१६ करीता रु. १०.०० कोटी

इ) भौतिक उद्दिष्टे :

इ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- जिल्हाधिकारी कार्यालय व अल्पसंख्याक विकास विभाग

५) <u>उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना</u> -

(सन २०१५-१६ करीता मंजूर नियतव्यय ८० कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय ५६ कोटी आहे.)

अ) योजनेचा लक्ष्यगट :- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील उच्च व तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेत असलेले विद्यार्थी.

ब) योजनेचे उद्दिष्ट :-अल्पसंख्याक समाजातील होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षण घेण्यास प्रेरीत करणे.

क) योजना :- या योजनेतंर्गत अल्पसंख्याक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात आलेल्या वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु.२५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. तसेच संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व स्त्रोतांव्दारे मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत मागील ५ आर्थिक वर्षामध्ये वितरीत करण्यात आलेला निधी व लाभार्थ्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | वर्ष | वितरीत निधी | लाभार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २००८-०९ | ११.८५ कोटी | ६२९० |
| २ | २००९-१० | ३४.७९ कोटी | १५६४८ |
| ३ | २०१०-११ | ५६.०४ कोटी | २४३५१ |
| ४ | २०११-१२ | ७०.१८ कोटी | २७६६९ |
| ५ | २०१२-१३ | ७५.८३कोटी | ३०६८६ |
| ६ | २०१३-१४ | ८९.३० कोटी | ३६३४१ |
| एकूण | | ३३७.९९ कोटी | १,४०,९८५ |

ड) योजनेकरिता आर्थिक तरतूद (सन २०१५-१६) - रु. ८० कोटी

इ) भौतिक उद्दिष्ट :-

ई) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- संचालक (वैद्यकिय शिक्षण), वैद्यकिय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६) **राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांत मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम योजना :-**

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सन २००८ - ०९ या वर्षापासून राज्यातील अल्पसंख्याक संकेंद्रीत नागरी क्षेत्रांत मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला असून, केंद्र शासनाने निश्चित केलेल्या महाराष्ट्रातील ४३ अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांसाठी प्राध्यान्याने तसेच ज्या शहरांच्या एकूण लोकसंख्येपैकी किमान १० % लोकसंख्या अल्पसंख्याकांची आहे, अशा शहरातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील मुलभूत नागरी सोयी-सुविधांसाठी अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. या योजनेंतर्गत महानगरपालिकांना कमाल रु. २० लाख, "अ" वर्ग नगरपालिकांना कमाल रु. १५ लाख तर "ब" व "क" वर्ग नगरपालिकांना कमाल रु. १० लाख इतके अनूदान उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. या योजनेंतर्गत अनुज्ञेय मुलभूत नागरी सुविधांचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| (१) कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती, | (२) पिण्याच्या पाण्याची सुविधा, |
| (३) विद्युत पुरवठा, | (४) सांडपाण्याची व्यवस्था, |
| (५) रस्ते / पथदिवे, | (६) सार्वजनिक स्वच्छतागृहे, |
| (७) अंगणवाडी, बालवाडी केंद्रे इ., | (८) समाजमंदिर / सामाजिक सभागृह इ. (९) इदगाह |

सदर योजनेंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात १७५ महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषदा यांना एकूण रु.१९,३०,४५,०००/- इतके अनुदान मंजूर करुन वितरीत करण्यात आले आहे. शासन निर्णय, दि.२१/०६/२०१४ अन्वये नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०१४-१५ या वर्षातदेखील राबविण्यात येणार असून, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१४-१५ या वर्षात रु.१५.०० कोटी इतका नियतव्यय मान्य आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१५-१६ या वर्षात रु.२५.०० कोटी इतका नियतव्यय मान्य आहे या योजनेची अंमलबजावणी संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

७) **राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रमीण क्षेत्रांत मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम योजना :-**

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रांत मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक लोकसमूहातील नागरीकांच्या जीवनानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि.१४/५/२०१३ अन्वये सन २०१३-१४ या वर्षापासून ग्रामीण क्षेत्रविकास कार्यकम नव्याने कार्यान्वित केला आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक लोकसमुहाची (मुस्लिम, ख्रिश्चन,शीख, बौद्ध, जैन व पारसी) लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा ग्रामपंचायतींना अनुज्ञेय पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेसाठी योजनेच्या विहीत कार्यपद्धती व निकषांनुसार प्रति ग्रामपंचायत कमाल रु. १० लक्ष एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत अनुज्ञेय पायाभूत सुविधांचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :-

(१) कब्रस्तान/स्मशान/अत्यंविधीच्या जागेसाठी सरंक्षक भिंतीसह सर्व सुविधा

(२) सार्वजनिक सभागृह/शादीखाना हॉल,

(३) सर्व नागरी/पायाभूत सुविधा. उदा:- पिण्याच्या पाण्याची सुविधा/ विद्युत पुरवठा/ सांडपाण्याची व्यवस्था/ इदगाह/रस्ते /पथदिवे/सार्वजनिक स्वच्छतागृहे/ अंगणवाडी, बालवाडी केंद्रे इ.



सदर योजनेंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात २८० अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना एकूण रु.२१.७०, कोटी इतके अनुदान मंजूर करुन वितरीत करण्यात आले आहे. शासन निर्णय, दि.२१/०६/२०१४ अन्वये ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०१४-१५ या वर्षातदेखील राबविण्यात येणार असून, या योजनेंच्या अंमलबजावणीसाठी सन २०१४-१५ या वर्षात रु.४०.०० कोटी इतका नियतव्यय मान्य आहे. या योजनेंच्या अंमलबजावणीसाठी सन २०१५-१६ या वर्षात रु.२५.०० कोटी इतका नियतव्यय मान्य आहे या योजनेची अंमलबजावणी संबंधित जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

८) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांसाठी केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्रीय विकास कार्यकम :- (MsDP)

(अ) केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कामकाज मंत्रालयाने लोकसंख्या, सामाजिक व आर्थिक स्थिती आणि मूलभूत सुविधांची उपलब्धता या मानकाच्या आधारे महाराष्ट्रातील परभणी, बुलढाणा, वाशिम व हिंगोली हे चार जिल्हे मागासलेले अल्पसंख्याक बहुल जिल्हे म्हणून घोषित केले असून या जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत बहुक्षेत्रीय विकास कार्यकम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत विहित मार्गदर्शक सुचनांच्या आधारे राज्यातील अल्पसंख्याक बहुल ४ जिल्हयात इंदिरा आवास योजनेखाली ११६७० घरकुले, अंगणवाडी योजनेंतर्गत ६२६ अंगणवाडी केंद्रे आणि अल्पसंख्याक मुलींसाठी ०६ वसतीगृहे उभारण्यात येत आहेत.

(ब) केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाने ११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत अल्पसंख्याक बहुल क्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) विहित मार्गदर्शक सूचनांच्या आधारे परभणी व वाशिम येथील मुलींची प्रत्येकी ०३ आणि हिंगोली येथे ०२ मुलांची वसतीगृहे बांधकामासाठी रु.२१.७० कोटी इतक्या रकमेच्या प्रस्तावास नव्याने मान्यता दिली असून त्यापैकी रु.१०.८५ कोटी इतका निधी पहिल्या टप्प्यामध्ये वितरित केला आहे.

(क) १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाने अल्पसंख्याक बहुल गट व शहरांसाठी बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम (MsDP) सुधारित रित्या कार्यान्वित केला असून, या योजनेंतर्गत राज्यातील ९ जिल्हयातील ०८ गट व ०६ शहरांची सुनिश्चिती केली आहे. या संदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन संबंधित ८ गट व ६ शहरांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच या कार्यक्रमांतर्गत संबंधित ९ जिल्हयातील अल्पसंख्याक बहुल गावांची निश्चिती करण्याबाबतची कार्यवाही सध्या विचाराधीन आहे. संबंधित ९ जिल्हे व यामधील ८ गट व ६ शहरांचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :-

जिल्हे (०९) :-यवतमाळ, वाशिम, जालना, परभणी, बीड, लातूर, बुलढाणा, हिंगोली व जळगाव

तालुके (०८) :- नेर नवाबपूर, कारंजा, मंगरुळपीर, चिखली, शेगाव, खामगाव, बुलढाणा, हिंगोली.

शहरे (०६) :- जालना, परभणी, परळी वैजनाथ, लातूर, उदगीर, चोपडा

१२ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत वरील ८ गट व ६ शहरांमधील पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेसाठी प्रत्येकी रु.१०.०० कोटी इतक्या रकमेचे विकास कामांचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयास पाठविण्याच्या दृष्टीने कार्यवाही सध्या विचाराधीन आहे.

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सन २०१५-१६ या वर्षात (राज्याचा हिस्सा) रु. ६.९ कोटी आणि (केंद्राचा हिस्सा) रु.१०.०० कोटी इतका नियतव्यय मान्य आहे. खालील विकास क्षेत्रातील कामे हाती घेणे अपेक्षित आहे :-

(१) शिक्षण :-

(अ) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मान्य निकषानुसार नवीन प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या इमारतीचे बांधकाम,

(ब) शाळांचे उन्नतीकरण,

(क) सर्व शिक्षा अभियांतर्गत मान्य निकषानुसार प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील एसीआर सेंटरचे बांधकाम

(ड) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील प्रयोगशाळांचे बांधकाम

(इ) मुलांकरिता व मुलींकरिता वसतीगृहाचे बांधकाम (Dormytory tipe)

(ई) शासकीय महाविद्यालयांचे बांधकाम

(उ) शाळांमध्ये स्वच्छतागृहांची बांधकामे

(२) आरोग्य :-

(अ) प्राथमिक व उप प्राथमिक आरोग्य केंद्राची बांधकामे (NRHM) च्या निकषानुसार

(ब) आंगणवाडी केंद्राची बांधकामे

(३) कौशल्य विकास कार्यक्रमाकरिता पायाभूत सुविधा :-

(अ) NCVT व AICTE च्या निकषानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची बांधकामे (केंद्र शासनाचा हिस्सा ५ कोटी) आणि तंत्रनिकेतन संस्थांची बांधकामे (केंद्र शासनाचा हिस्सा १२.३० कोटी)

(४) अल्पसंख्याक युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण :-

मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थांमार्फत अल्पसंख्याक युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात यावे अशा कौशल्य विकास प्रशिक्षणाची निवड करावी की ज्याद्वारे ७५% युवकांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.

९) <u>मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ :-</u>

(सन २०१५-१६ करीता मंजूर नियतव्यय ७५.०० कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय ५२.५० कोटी आहे.)

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. २५०.०० कोटींवरून दि.०६/०६/२०१३ च्या शासन निणयान्वये रु.५००.०० कोटींपर्यंत वाढविण्यात आले आहे. आतापर्यंत महामंडळास रु.२६८.१९१० कोटी भागभांडवल देण्यात आले असून सन २०१५-१६ मध्ये महामंडळास भागभांडवल देण्यासाठी रु. ५२.५० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

**आर्थिक तरतूद व वितरीत भाग भांडवल :-**

| अ.क्र. | वर्ष | एकुण अर्थसंकल्पीत तरतूद (रु. कोटीत) | | | प्रत्यक्षात वितरीत करण्यात आलेले भागभांडवल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भागभांडवल | अनुदान | एकूण | भागभांडवल | अनुदान | एकूण |
| १ | २०००-०१ | ४.५० | ०.५० | ५.०० | ४.५० | ०.५० | ५.०० |
| २ | २००१-०२ | ५.०० | ०.०० | ५.०० | १.०० | ०.०० | १.०० |
| ३ | २००२-०३ | १.५० | ०.०० | १.५० | १.५० | ०.०० | १.५० |



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २००३-०४ | ७.०० | ०.०० | ७.०० | ६.५० | ०.०० | ६.५० |
| ५ | २००४-०५ | २४.२० | ०.०० | २४.२० | २४.२० | ०.०० | २४.२० |
| ६ | २००५-०६ | १.०० | ०.०० | १.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | २००६-०७ | १.४० | ०.०० | १.४० | १.४० | ०.०० | १.४० |
| ८ | २००७-०८ | १.५४ | ०.०० | १.५४ | १.५४ | ०.०० | १.५४ |
| ९ | २००८-०९ | ५१.५० | ०.०० | ५१.५० | ५१.५० | ०.०० | ५१.५० |
| १० | २००९-१० | ५८.९९५० | ०.०० | ५८.९९५० | ५८.९९५० | ०.०० | ५८.९९५० |
| ११ | २०१०-११ | १८.३६५० | ०.०० | १८.३६५० | १८.३६५० | ०.०० | १८.३६५० |
| १२ | २०११-१२ | १०.०००० | ०.०० | १०.०००० | ९.३९१० | ०.०० | ९.३९१० |
| १३ | २०१२-१३ | ३६.०००० | ०.०० | ३६.०००० | २८.८००० | ०.०० | २८.८००० |
| १४ | २०१३-१४ | ७५.०००० | ०.०० | ७५.०००० | ६०.०००० | ०.०० | ६०.०००० |
| १५ | २०१४-१५ | ३२.५० | ०.०० | ३२.५० | ३२.५ | ०.०० | ३२.५ |
| | एकुण | ३२८.५० | ०.५० | ३२९ | ३००.१९१० | ०.५० | ३००.६९१० |

कर्जवाटप :- महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमधून महामंडळाने आतापर्यंत खालीलप्रमाणे कर्ज मंजूर वाटप केले आहे :-

| अ.क्र. | वर्ष | कर्ज मंजूर करण्यात आलेली प्रकरणे | | कर्ज वितरीत करण्यात आलेली प्रकरणे | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थींची संख्या | मंजूर रक्कम रु. लाख | लाभार्थींची संख्या | कर्ज वाटप रक्कम रु. लाख |
| १ | २०००-०१ | - | - | - | - |
| २ | २००१-०२ | २०१ | ७४.०० | २०१ | ७४.०० |
| ३ | २००२-०३ | १०९४ | ८२६.०० | १०९४ | ८२६.०० |
| ४ | २००३-०४ | ९१९ | ४६२.०० | ९१९ | ४६२.०० |
| ५ | २००४-०५ | ४४० | २३३.०० | ४४० | २३३.०० |
| ६ | २००५-०६ | ८३५ | ४६४.०० | ८३५ | ४६४.०० |
| ७ | २००६-०७ | ५२९ | ३६०.०० | ५२९ | ३६०.०० |
| ८ | २००७-०८ | २३१९ | १३७८.६२ | ७४१ | ५२७.०० |
| ९ | २००८-०९ | १०११७ | ३४१५.५९ | २३८४ | १२१४.५३ |
| १० | २००९-१० | २५४३५ | १०७३५.६२ | २२४४४ | ७८३५.९६ |
| ११ | २०१०-११ | २९५६२ | १३०५६.६९ | १२४२६ | ४७२७.९२ |
| १२ | २०११-१२ | १६३३ | २४६०.४१ | ८६८४ | ३५७९.३८ |
| १३ | २०१२-१३ | ८६८ | १३०३.२८ | ११८१ | ७४९.८९ |
| १४ | २०१३-१४ | १२०१ | १९१९.९१ | २०१८ | २३०९.३५ |
| | २०१४-१५ (५ मार्च २०१५ अखेर) | १०३९९ | ५२७०.४० | ११४३७ | ५३७१.९० |
| | एकूण | ८५५५२ | ४१९५९.५२ | ६५३३३ | २८७३४.९३ |

महामंडळाने सन २००१ पासून ५ मार्च, २०१५ अखेरपर्यंत विविध कर्ज योजनेंतर्गत ८५५५२ लाभार्थ्यांना रु. ४१९.५९ कोटी कर्ज मंजूर केले असून त्यापैकी ६५३३३ लाभार्थ्यांना रु. २८७.३५ कोटी कर्ज वितरीत केले आहे.

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचा सुधारीत आकृतिबंध :-

दिनांक १२ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये महामंडळासाठी सुधारीत कर्मचारी आकृतिबंध लागू करण्यात आला आहे. त्यानुसार महामंडळाच्या मुख्य कार्यालयासाठी २५ पदे, विभागीय कार्यालयांसाठी १२ पदे व जिल्हा कार्यालयांसाठी १२० पदे याप्रमाणे एकूण १५७ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

१०) राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळास भाग भांडवल देणे (केंद्र पुरस्कृत):-

(सन २०१५-१६ करीता मंजूर नियतव्यय ०.५० कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय ०.३५ कोटी आहे.)

राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली या महामंडळाला देशातील अल्पसंख्याकांच्या विकासाकरीता राबवावयाच्या कार्यक्रमातर्गत महाराष्ट्र शासनाचा वाटा म्हणून राज्यातील अल्पसंख्याक लोकसंख्येच्या आधारावर रु.३५७८.६२ लाख एवढे भागभांडवली अंशदान द्यावयाचे आहे. त्यापैकी सन २००२ - ०३ ते सन २०१२-१३ पर्यंत रु. २२४४.०० लाख भागभांडवल वितरीत करण्यात आले आहे.

(रु. कोटींत)

| अ.क्र. | वर्ष | राज्य शासनाने NMDFC ला दिलेले भागभांडवल | | NMDFC कडून मौलाना आझाद महामंडळास प्राप्त झालेले कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| | | तरतूद | वितरीत भाग भांडवल | दिनांक | रक्कम |
| १ | २००१-०२ | - | - | ५.४.२००२ | ६.०० |
| २ | २००२-०३ | १.५० | १.५० | २३.१२.२००२ | १.०० |
| | | | | ४.४.२००३ | १.०० |
| ३ | २००३-०४ | ३.०० | ३.०० | ९.२.२००४ | ३.०० |
| | | | | ७.४.२००४ | २.०० |
| ४ | २००४-०५ | ३.०० | ३.०० | २९.३.२००५ | १०.०० |
| ५ | २००५-०६ | ०.९० | ०.९० | - | - |
| ६ | २००६-०७ | १.०० | १.०० | १६.३.२००७ | ०.७५ |
| ७ | २००७-०८ | १.५० | १.५० | ३.१०.२००७ | २.०० |
| | | | | १.१.२००८ | २.०० |
| ८ | २००८-०९ | ३.५० | ३.५० | ५.४.२००८ | ४.०० |
| | | | | ६.६.२००८ | ५.०० |
| ९ | २००९-१० | ०.३० | ०.३० | ६.६.२००९ | ५.०० |
| | | | | २५.६.२०१० | ६.९० |
| १० | २०१०-११ | ०.३० | ०.३० | ३१.१२.२०१० | ३.५० |
| ११ | २०११-१२ | ८.८६ | ६.६४ | १७.९.२०११ | २.६९ |
| | | | | २३.९.२०११ | १.५० |
| १२ | २०१२-१३ | १.०० | ०.८० | २८.३.२०१३ | ६.०० |
| १३ | २०१३-१४ | १.०० | ०.८ | | ०.०० |
| १४ | २०१४-१५ | ०.४५ | ०.०० | | ०.०० |
| | एकूण | २६.३१ | २३.२४ | | ६२.३४ |

NMDFC कडून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास रु.६२.३४ कोटी कर्ज प्राप्त झाले आहे.



११) अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृहे :-

(सन २०१५-१६ करीता मंजूर नियतव्यय १० कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय ७ कोटी आहे.)

अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतीगृह बांधण्यास दि.२.३.२०१० च्या शासना निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यातील विद्यापीठांच्या जागेवर अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह सुरु करण्यासंदर्भात शासन निर्णय दि.२०.१२.२०११ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. ज्यानुसार सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ मध्ये जागा उपलब्ध झालेल्या खालील जिल्ह्यात वसतीगृह बांधण्यास मान्यता देण्यात आली आहे.

अल्पसंख्याक मुलींसाठी बांधण्यात येत असलेली वसतीगृहे

| अ. क्र. | जिल्हा | वसतीगृहाच्या बांधकामासाठी | उपलब्ध करुन दिलेला निधी (रु. कोटीत) |
|---|---|---|---|
| सन २००९-१० मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे | | | |
| १ | चंद्रपूर | नझूल मोहल्ला सिव्हील लाईन येथील शिट नं. ३, ब्लॉक ३, प्लॉट नं.४, नगर भूमापन क्र.८४,८५ पैकी आराजी २७१६ चौ.मी. जागा | २.०७ |
| २ | नंदुरबार | मौजे टोकरतलाव, ता. जि. नंदुरबार येथील सरकारी ग. नं. ६५ मधील २ एकर जागा | १.०० |
| ३ | औरंगाबाद | शासकीय विज्ञान संस्था परीसरात अर्धा एकर | ३.०० |
| ४ | पूर्णा (परभणी) | मौजे आडगाव, ता. पूर्णा येथील गट नं. ६० मधील २ हेक्टर जमीन | २.०० |
| सन २०१०-११ मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे | | | |
| ५ | भंडारा | भंडारा नगरपरिषदेने दिलेली गांधी विद्यालयाच्या परिसरातील २१०० चौमी. | १.२५ |
| ६ | कोल्हापूर | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ४.२२ |
| ७ | पनवेल (रायगड) | शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल | ४.७७ |
| ८ | अमरावती | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | २.५० |
| सन २०११-१२ मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे | | | |
| ९ | घनसावंगी (जालना) | मौजे घनसावंगी, ता. घनसावंगी येथील ग. नं. ४० मधेन .४० आर जमीन | ४.३४ |
| १० | पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | विद्यापीठ आवार | १.०० |
| ११ | रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड | विद्यापीठ आवार | २.०० |
| १२ | मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | विद्यापीठ आवार | ३.५० |
| १३ | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | विद्यापीठ आवार | १.५० |
| १४ | कळमनुरी (हिंगोली) | कळमनुरी येथे स. नं. १४ येथील ८० आर जागा | १.०० |
| १५ | जेव्हीपीडी, अंधेरी, मुंबई | (महिला आर्थिक विकास महामंडळ) | ०.७० |

| सन २०१३-१४ मध्ये मान्यता दिलेली वसतीगृहे | | | |
|---|---|---|---|
| १६ | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे. | तंत्रनिकेतनाचे आवार | १.०० |
| १७ | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर. | तंत्रनिकेतनाचे आवार | १.०० |
| १८ | पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, | तंत्रनिकेतनाचे आवार | ००० |
| | | एकूण | ३६.८५ |

राज्यातील अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत उभारण्यात येणाऱ्या वसतीगृहांचा तपशील -

११ वी पंचवार्षिक योजना

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव / वसतीगृहाचे ठिकाण | केंद / राज्य वाटा | परिमाण | एकक किंमत | केंद्राचा वाटा | राज्याचा वाटा | एकूण किंमत | पहिला हप्ता | दुसरा हप्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम वाशिम/ मंगरुळपीर | १००:०० | २ महिला वसती गृहे | १६६.०० | ३३२.०० | -- | ३३२.०० | १६६.०० | १६६.०० |
| २ | परभणी परभणी/ गंगाखेड | १००:०० | २ महिला वसती गृहे | १५९.५४ | २६७.४८ | ५१.६० | ३१९.०८ | १३३.७४ | १३३.७४ |
| ३ | हिंगोली हिंगोली/वसमत | १००:०० | २ महिला वसती गृहे | १५९.५५ | ३१९.१० | -- | ३१९.१० | १५९.५५ | १५४.५५ |
| | एकूण | | ६ | ४८५.०९ | ९१८.५८ | ५१.६० | ९७०.१८ | ४५९.२९ | ४५९.२९ |

१२ वी पंचवार्षिक योजना

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम कारंजा/ मनोरा/ मालेगांव | १००:०० | ३ महिला वसतीगृहे | ३१०.०० | ९३०.०० | -- | ९३०.०० | ४६५.०० | -- |
| २ | परभणी सेलू/पाथरी/ जिंतूर | १००:०० | ३ महिला वसतीगृहे | ३१०.०० | ९३०.०० | -- | ९३०.०० | ४६५.०० | -- |
| ३ | हिंगोली हिंगोली / कळमनुरी | ५०:५० | २ मुलांची वसतीगृहे | ३१०.०० | ३१०.०० | ३१०.०० | ६२०.०० | १५५.०० | -- |
| | एकूण | | ८ | ९३०.०० | २१७०.०० | ३१०.०० | २४८०.०० | १०८५.०० | -- |



१२) <u>औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दूसरी / तिसरी पाळी सुरु करणे :-</u>

(सन २०१५-१६ करीता मंजूर नियतव्यय १३ कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय ९.१० कोटी आहे.)

मांडवी, मुंबई शहर व चांदिवली, मुंबई उपनगर अशा २ नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि विद्यमान ४२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दूसरी / तिसरी पाळी सुरु करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.२९/८/२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. मंजूर तुकडया, प्रवेश क्षमता व आतापर्यंत वितरित निधी याची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | ठिकाण | तुकडया | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था मांडवी, मुंबई | १८ | २८८ |
| २ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था चांदिवली, मुंबई उपनगर | १० | १६० |
| ३ | राज्यातील विद्यमान ४२ ITI मध्ये दूसरी/तिसरी पाळी | २४८ | ३९६८ |
| | एकूण | २७६ | ४४१६ |

ऑगस्ट/सप्टेंबर, २०१० पासून सदर ठिकाणी अभ्यासक्रमास सुरुवात झाली आहे. त्यापैकी १४५ व्यवसाय तुकडयांना संलग्नता प्राप्त झाली आहे. त्याकरिता वितरित करण्यात आलेले वर्षनिहाय तरतूद पुढीलप्रमाणे आहे :-

| सन | अर्थसंकल्पीय तरतूद रु.कोटी | वितरीत निधी रु.कोटी |
|---|---|---|
| २००९-१० | ०.०० | ०.०० |
| २०१०-११ | ३.८० | ३.८० |
| २०११-१२ | १८.०० | १३.५० |
| २०१२-१३ | १०.०० | ८.०० |
| २०१३-१४ | १३.०० | ११.८६ |
| २०१४-१५ | ११.७० | ५.४६ |
| एकूण | ५६.२० | ४२.६२ |

मांडवी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वर्ग सद्या एलफिस्टन तांत्रिक विद्यालय, मुंबई येथे व चांदिवली येथील ITI चे वर्ग मुलुंड येथे सुरु करण्यात आलेले आहेत. मांडवी संस्थेने नवीन इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ दि.२७/५/२०११ रोजी करण्यात आला असून त्यासाठी अंदाजे रु.८,१४,३८,५५४/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी सन २०१०-११ मध्ये रु.२ कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सन २०१४-१५ मध्ये सदर योजनेसाठी रु.११.७० कोटी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी रु.५.४६ कोटी तदतूद संचालक, व्यवसाय शिक्षण संचालनालय यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१३) <u>विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दूसरी पाळी सुरु करणे :-</u>

(सन २०१५-१६ करीता मंजूर नियतव्यय १२.०० कोटी इतका असून अर्थसंकल्पीत नियतव्यय ८.४० आहे.)

सन २०११-१२ पासून ठाणे, सोलापूर, जळगांव, नांदेड, यवतमाळ, मुंबई शहर व मुंबई उपनगर या ७ व सन २०१२-१३ पासून रत्नागिरी, जालना, अंबड (जालना), ब्रम्हपूरी (चंद्रपूर), कराड (सातारा) या ५ प्रमाणे एकूण १२ विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्यात आली असून त्याबाबतचे शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अनुक्रमे दि.१३/९/२०११ व दि.१९/७/२०१२

रोजी निर्गमित केले आहेत. तसेच शासकीय तंत्रनिकेतन पुणे, लातूर व हिंगोली येथे दि.८ जुलै, २०१४ च्या शासन निणयाद्वारे दुसरी पाळी सुरु करण्यात आली आहे.

| अ.क्र. | तंत्रनिकेतनाचे नांव | सुरु केलेले अभ्यासक्रम | प्रत्येक अभ्यासक्रमांक प्रवेश क्षमता | एकूण प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| (१) | शासकीय तंत्रनिकेतन ठाणे, सोलापूर, नांदेड, जळगांव व यवतमाळ | स्थापत्य अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स | प्रत्येकी ६० | ६०० |
| (२) | शासकीय तंत्रनिकेतन मुंबई उपनगर | संगणक अभियांत्रिकी व इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी | प्रत्येकी ६० | १२० |
| (३) | शासकीय मुद्रण संस्था, मुंबई | प्रिंटींग टेक्नोलॉजी | प्रत्येकी ६० | ६० |
| (४) | शासकीय तंत्रनिकेतन रत्नागिरी, कराड (जि.सातारा) व ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) | स्थापत्य अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन | प्रत्येकी ६० | ५४० |
| (५) | शासकीय तंत्रनिकेतन, जालना | स्थापत्य अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी व इलेक्ट्रीकल अभियांत्रिकी | प्रत्येकी ६० | १८० |
| (६) | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड (जि.जालना) | यंत्र अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स | प्रत्येकी ६० | १२० |
| (७) | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | इलेक्ट्रीकल इंजि., इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन | प्रत्येकी ६० | १२० |
| (८) | पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | सिव्हिल इंजि., मेकॅनिकल इंजि. | प्रत्येकी ६० | १२० |
| (९) | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली | मेकॅनिकल इंजि. | प्रत्येकी ६० | ६० |
| | एकूण | | | १९२० |

सन २०११-१२ मध्ये दुसरी पाळी सुरु केलेल्या ७ शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसऱ्या पाळीत सन २०११-१२ मध्ये ७८० व सन २०१२-१३ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून वाढीव अभ्यासक्रमांना मान्यता मिळाल्यानंतर ११४० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

| सन | अर्थसंकल्पीय तरतूद रु.कोटी | वितरीत निधी रु.कोटी |
|---|---|---|
| २०११-१२ | ९.५८ | ७.१८ |
| २०१२-१३ | १०.०० | ८.०० |
| २०१३-१४ | १२.०० | ७.०१ |
| २०१४-१५ | १०.८० | ५.०४ |
| एकूण | ४२.३८ | २७.२३ |

१४) <u>अल्पसंख्याक यंत्रमागधारकांना यंत्रमाग आधुनिकीकरणासाठी अनुदान :-</u>

अल्पसंख्याक यंत्रमागधारकांना यंत्रमाग आधुनिकीकरणासाठी अनुदान देण्याच्या योजनेस वस्त्रोद्योग धोरणात शासनाची मान्यता मिळाली असून याबाबतचा शासन निर्णय वस्त्रोद्योग विभागाने दि.२/१/२०१२ रोजी निर्गमित केला आहे. यामध्ये खालीलप्रमाणे ३ योजना आहेत :-

अ) अल्पसंख्याक समाजाच्या अस्तित्वातील यंत्रमाग घटकांचे TUF योजनेंतर्गत आधुनिकीकरणासाठी पात्र दिर्घ मुदती कर्जाच्या १० टक्के भांडवल अनुदान देणे. (यंत्रमाग घटकाच्या आधुनिकीकरणाचे प्रकल्प पूर्ण होऊन प्रकल्प उत्पादनाखाली आल्यानंतर)

पात्रता : अल्पसंख्याक समाजाचे खाजगी व सहकारी तत्वावरील प्रकल्प, खाजगी प्रकल्प असल्यास प्रकल्पातील किमान ८० टक्के भाग (Share) अल्पसंख्याक समाजाच्या सभासदांचे असावेत,





प्रकल्प सहकारी तत्वावरील असल्यास प्रकल्पातील किमान ८० टक्के सभासद अल्पसंख्याक समाजातील असावेत. (शा.नि.दि.१५/३/२०१२)

ब) अल्पसंख्याक समाजाच्या यंत्रमागधारकांना TUF योजनेंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी प्रकल्प तयार करुन बँकेकडे सादर करणे व या प्रकल्पास मान्यता मिळविण्यात यशस्वी ठरणाऱ्या व्यावसायिक संस्थेस Success Fee देणे. व्यावसायिक संस्थेचे पॅनेल तयार करुन फी निश्चित करण्यासाठी संचालक, वस्त्रोद्योग यांचेकडून निविदा मागवून कार्यवाही करण्यात येत आहे.

क) अल्पसंख्याक समाजाच्या नवीन सहकारी यंत्रमाग संस्थांना राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेंतर्गत स्वभागभांडवल, शासकीय भाग भांडवल व कर्ज याबाबतच्या आकृतीबंधामध्ये १०:४०:५० ऐवजी ५:४५:५० अशी सुधारणा करण्याबाबतचा शासन निर्णय वस्त्रोद्योग विभागाचे दि.१६/३/२०१२ रोजी निर्गमित केला आहे. त्यानुसार शासकीय भांडवलाचा हिस्सा ४० टक्के ऐवजी ४५ टक्के इतका करण्यात आला असल्याने ५ टक्के वाढीव हिश्श्यांची रक्कम अल्पसंख्याक विकास विभागाच्या नियत व्ययामधून द्यावयाची आहे.

पात्रता : अल्पसंख्यसाक समाजाचे सहकारी तत्वारील यंत्रमाग घटक, संस्थेतील किमान ८० % भाग सभासद अल्पसंख्याक समाजातील असावेत. संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष अल्पसंख्यांक समाजाचे असावेत.

उपरोक्त तिन्ही योजनांचे शासन निर्णय वस्त्रोद्योग विभागाने निर्गमित केले आहेत. सदर योजनांसाठी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यासाठी वस्त्रोद्योग विभागाकडून नवीन लेखाशिर्ष उघडण्यात येत असून त्यास या विभागाची सहमती दर्शविण्यात आली आहे. वस्त्रोद्योग विभागाच्या मागणीनंतर यासाठी पुरवणी मागणीव्दारे तरतूद अर्थसंकल्पीत करण्यासाठी या विभागाकडून नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

१५) <u>नागपूर हज हाऊसची उभारणी :-</u>

१. राज्य शासनाने नागपूर येथे हज यात्रेकरुंसाठी हज हाऊस बांधण्याचा निर्णय घेतला होता. हज हाऊस बांधकामासाठी शासनाने मुखंड क्र.१, सिटी सर्व्हे क्रमांक ४२२/२ एम्प्रेस मिल, गंजीपेठ, नागपूर येथील ३४०४.६७५ चौ.मि. जागा महाराष्ट्र राज्य हज समितीला उपलब्ध करुन दिली. हज हाऊसच्या बांधकामाकरीता १.५ इतका एफ.एस.आय. मंजूर मंजूर करण्यात आला.

२. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या शुभहस्ते दि. ८ ऑक्टोबर, २०११ रोजी दुपारी ३.०० वा. गंजीपेठ, नागपूर येथील हज हाऊसचे उद्घाटन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी श्री. सलमान खुर्शिद, मा. केंद्रीयमंत्री, अल्पसंख्यांक कार्य, भारत सरकार, हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.

३. महानगर पालिका, नागपुर यांनी दिनांक ४.१०.२०११ रोजी नागपुर येथील हज हाऊसच्या इमारत बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. या जागेवर नागपूर सुधार प्रन्यास मार्फत एजन्सी तत्वावर नागपुर येथील हज हाऊसचे बांधकाम करुन घेण्यात आले आहे. हज हाऊस इमारती अंतर्गत तळमजला अधिक ६ मजले मिळून ९४,००० चौ.फुट इतके सुपर बिल्ट अप बांधकाम करण्यात आले आहे. सदर बांधकामाकरीता राज्य शासन रु.१३२९ लक्ष व केंद्रिय हज समितीमार्फत रु.१५० लक्ष असे मिळूण आतापर्यंत एकूण रु.१४७९ लाख इतके अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. या इमारतीत प्रत्येक मजल्यावर १० डॉरमेंटरी हॉल असून, यामधील चार मजल्यावर ५०० हज यात्रेकरु एका वेळेस निवास करु शकतील, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. हज हाऊसमध्ये हज यात्रेकरु तसेच त्यांच्या सोबत येणा-या नातेवाईकांकरीता निवास व्यवस्था, स्वच्छतागृहे, प्रार्थना हॉल इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य हज समिती मार्फत हज यात्रेकरुंना पासपोर्ट, व्हीसा इ. करीता मार्गदर्शन व हज हाऊस ते विमान तळापर्यंत वाहतुक सुविधा पुरविण्यात येते. नागपूर येथून हज यात्रेकरीता जाणा-या यात्रेकरुंना यात्रेपूर्वी व यात्रेनंतर थांबण्याची व्यवस्था व इतर बाबींकरीता हज हाऊसचा उपयोग

होत आहे. हज हाऊसचा लाभ महाराष्ट्रातील विदर्भ तसेच मराठवाडयासह शेजारील छत्तीसगड व मध्यप्रदेश राज्यामधील हज यात्रेकरुंना देखील होत आहे. नागपूर येथून सौदी अरेबिया (जेद्दाह) येथे जाण्यासाठी सन २०११ मध्ये २०९८ हज यात्रेकरु, सन २०१२मध्ये २५५७ हज यात्रेकरुंनी व सन २०१३ मध्ये २४६२ यात्रेकरुंनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.

४. महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई यांच्या आस्थापनेवर ०८ पदे कार्यरत असून त्याचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

(१) कक्ष अधिकारी-१, (२) लेखाधिकारी-०१, (३) सहायक -०२, (४) लघुलेखक-०१, (५)लघुटंकलेखक-०१, (६) लिपीक-टंकलेखक-०१, (७) शिपाई-०१

महाराष्ट्र राज्य हज समिती विभागीय कार्यालय, नागपूर यांच्या आस्थापनेवर एकूण २ पदे मंजूर असून त्याचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :-

(१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी गट-ब :-०१ (२) वरीष्ठ लिपीक-०१

१६) <u>औरंगाबाद हज हाऊसची उभारणी :-</u>

- दिनांक २५.०८. २००९ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत औरंगाबाद येथून हज यात्रेस प्रयाण करणा-या यात्रेकरुंना निवास व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी "सिडको" मार्फत हज हाऊस बांधणेबाबत निर्णय घेण्यात आला. याकरीता सन २००९-१० या आर्थिक वर्षात रु. ४.०० कोटी इतक्या निधीच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.
- मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शासन निर्णय, दि.३१/०३/२०१० अन्वये सन २००९-१० या वित्तीय वर्षात (०१)(१९) हज कमिटीला सहायक अनुदान (२२३५ ए-२७६) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध एकूण तरतुदीमधून रु.४.०० कोटी इतका निधी औरंगाबाद येथील हज हाऊस बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य हज समितीमार्फत सिडकोस वितरीत करण्यात आला आहे.
- औरंगाबाद येथे हज हाऊसच्या बांधकामाकरीता होत असलेला विलंब, लोकप्रतिनिधींची हज हाऊसची इमारत बांधणेबाबत होत असलेली मागणी विचारात घेता औरंगाबाद येथे हज हाऊस आणि वंदे मातरम सभागृह बांधण्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९ डिसेंबर २०१२ रोजी विधानभवन, नागपूर येथे बैठक संपन्न झाली.
- सदर बैठकीमधील निर्णयानुसार औरंगाबाद येथे हज हाऊस आणि वंदे मातरम सभागृह बांधण्यासंदर्भातील कार्यवाही कालमर्यादेत व्हावी, याकरिता मा. मंत्री महसूल तथा पालकमंत्री, औरंगाबाद, मा. मंत्री अल्पसंख्यांक विकास, मा. मंत्री, शालेय शिक्षण, विभागीय आयुक्त, पोलीस आयुक्त, व जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांची समिती गठीत करण्यात आली.
- सदर आढावा समितीची दि.५.२.२०१३ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.
- हज हाऊससाठी प्रस्तावित जागेवरील अतिक्रमाणधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी सी.टी.एस/ भुखंड क्र.११४८४ शिवाय इतर जागांचाही महसूल प्रशासनाकडून शोध घेण्यात आला. त्यानुसार मौजे पडेगांव व मौजे मिटमिटा या औरंगाबाद शहरालगत मनपा हद्दीत जागा उपलब्ध असल्याचे निर्दशनास आले. याबाबत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी नकाशासह जागा उपलब्ध असल्याबाबत बैठकीत सभाध्यक्षांना माहिती दिली. यावर सभाध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार अतिक्रमणधारकांना दोन्ही पर्यायी जागा प्रत्यक्ष दाखवून त्यानुसार मौजे पडेगांव येथील जागा पूर्नवसनासाठी निश्चित करण्यात आली.
- सी.टी.एस.६६५६ या जागेवर वंदे मातरम सभागृह व हज हाऊस दोन्ही बांधकामे करावयाची आहेत. यामध्ये सी.टी.एस.६६५६ च्या पुर्वेकडील बाजूस (लेडिस हॉस्टेल व प्राचार्य निवासस्थान या इमारतीस) लागून असलेल्या जागेत १९८४ साली वंदे मातरम सभागृहासाठी कोनशिला बसविण्यात आली. होती.





त्यामुळे उपलब्ध ४ एकर जागेपैकी सी.टी.एस.६६५६ च्या पुर्वेकडील भाग अंदाजे २ एकर हा वंदे मातरम सभागृहासाठी व पश्चिमेकडील अंदाजे २ एकर जमीन हज हाऊससाठी देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

- या प्रकरणी सिडकोने वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती करणेबाबत Expression of Interest बाबत वर्तमानपत्रात जाहिरात दिली आहे.औरंगाबाद येथे हज हाऊस व वंदे मातरम सभागृह बांधण्याकरीता शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक - जमिन ३९१२/ प्र.क्र.५३/ज-७ दिनांक २७/८/२०१३नुसार औरंगाबाद येथील सी.टी.एस.६६५६ या शासकिय जमिनीवर वंदे मातरम सभागृह व हज हाऊस एकाच वेळी बांधण्यासाठी मंजूर देण्यात आली.
- मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते दि.१७/८/२०१४ रोजी औरंगाबाद हज हाऊसची कोनशीला बसविण्यात आली.

१७) <u>महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार :-</u>

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ अंतर्गत कलम १० नुसार आयोगास नेमून देण्यात आलेली कार्ये अधिक परिणामकारकरित्या पार पाडून राज्य शासनास सुयोग्य शिफारशी करणे शक्य व्हावे याकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग (सुधारणा) अधिनियम, २०१२ अन्वये आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. हे अधिकार मुख्यत्वे पुढील बार्बीसंबंधात आहेत :-

(क) राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे,

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्मावणे,

(ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे,

(घ) कोणत्याही कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत मागवणे, आणि

(ङ) साक्षीदारांची आणि दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या आस्थापनेवर मंजूर असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

१) सचिव-१ पद, (२) अवर सचिव-१ पद, (३) लघुलेखक (उच्चश्रेणी) -१ पद, (४) रोखपाल-नि-उपलेखापाल-१ पद, (५) लघुलेखक (निम्नश्रेणी)-१ पद, (६) सहायक-२ पदे, (७) लिपीक-टंकलेखक-२ पदे, (८) वाहन चालक-२ पदे, (९) शिपाई-३ पदे.

१८) <u>राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी तंत्रनिकेतन संस्था सुरु करणे :-</u>

अ) **योजनेचा लक्ष्यगट :-** राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) बेरोजगार उमेदवार.

ब) **योजनेचे उद्दिष्ट :-** अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांमधील बेरोजगार उमेदवारास रोजगार मिळण्यास मदत करणे.

क) **योजना :-** अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांना तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने राज्यातील मालेगांव (जि. नाशिक), भिवंडी (जि. ठाणे) व मुंबई येथे प्रत्येकी एक याप्रमाणे तीन नवीन खाजगी तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्यासाठी अशासकीय शैक्षणिक संस्थांना

आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याकरिता कायम विनाअनुदानित तत्वावर तंत्रनिकेतन स्थापन करणाऱ्या व चालवू इच्छिणाऱ्या नामांकित अशासकीय अल्पसंख्याक (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) शैक्षणिक संस्थांची विहित निकषांच्या आधारे निवड करुन अशा संस्थांना प्रत्येकी रु. ३ कोटी इतके अनुदान अल्पसंख्याक विकास विभागाकडून उपलब्ध करुन दिले जाईल.

ड) योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०१५-१६) :- रु.१.४० कोटी

ई) भौतिक उद्दिष्ट :

फ) योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :- अल्पसंख्याक विकास विभाग व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय , मुंबई.

१९) राज्य अल्पसंख्याक आयोगाला सहायक अनुदान :-

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ अंतर्गत सामान्य प्रशासन विभाग, शासन आदेश, दि.९ ऑक्टोबर, २००६ अन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात राहणाऱ्या मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, झोराष्ट्रीयन (पारसी) व जैन या लोकसमूहांना अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केले आहे. शासन अधिसूचना दिनांक १६ एप्रिल,२०१२ अन्वये महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास दिवाणी अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील अल्पसंख्याकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी तसेच भारतीय संविधानाद्वारे अल्पसंख्याकाकरिता विहित करण्यात आलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याकरिता केंद्र शासनाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ अन्वये वैधानिक दर्जा प्रदान केला असून सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.४ ऑगस्ट, २००६ अन्वये आयोगाचे गठन केले आहे. या आयोगाची कार्यकक्षा संपूर्ण राज्यभर आहे. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची कार्यकक्षा पुढील प्रमाणे आहे.

१) संविधान आणि संसदेने तसेच राज्य विधानमंडळाने अधिनियमित केलेले कायदे यात तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजना आणि अल्पसंख्याकासाठी असलेली राज्य शासनाची धोरणे आणि योजना यांच्या कामकाजावर संनियत्रण ठेवणे.

२) अल्पसंख्याकांच्या बाबतीत होणारा भेदभाव टाळण्याच्या प्रश्नाबाबत अभ्यास, संशोधन, विकास व विश्लेषण करणे.

३) शासकीय उपक्रम, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या सेवेतील अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधीत्वाचे वास्तविक निर्धारण करणे आणि प्रतिनिधीत्व अपुरे असल्यास त्याबाबतीत इच्छित पातळी गाठण्यासाठी उपाय सुचविणे.

४) राज्यात जातीय ऐक्याची सुनिश्चिती करण्यासाठी, ते राखण्यासाठी आणि त्याला उत्तेजन देण्यासाठी शिफारशी करणे.

५) अल्पसंख्याकांचे कल्याण आणि विकास यांच्या दृष्टीने, आयोगाच्या मते महत्वाची असेल, अशा इतर कोणत्याही बाबीचा अभ्यास करणे आणि समुचित शिफारशी करणे.

६) अल्पसंख्याकांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यासंबंधीच्या तक्रारीमध्ये लक्ष घालणे, अल्पसंख्याकांच्या गाऱ्हाण्यांचा विचार करुन त्यावर वेळोवेळी यथोचित उपाय सुचविणे.

७) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी असलेल्या पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे समन्वयन व पर्यवेक्षण करणे.



राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या रचनेत एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व नऊ सदस्य तसेच एक सचिव यांचा समावेश आहे. राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयासाठी १४ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राज्यातील अल्पसंख्याकांकरिता खालील कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत :-**

अ) **अल्पसंख्याक उमेदवारांसाठी शासकीय सेवा भरती पूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्ग :-** या योजनेंतर्गत पोलीस भरती प्रशिक्षण वर्ग व राज्य नागरी पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आली आहेत.

**ब) पोलीस भरती पूर्व परिक्षा प्रशिक्षण वर्ग :-**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांकरिता सन २००९-१० या वर्षापासून पोलिस शिपाई भरतीकरिता नव्याने सुधारित केलेली प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रतिमाह रु. १५००/- इतके विद्यावेतन, प्रत्येक प्रशिक्षणार्थीला गणवेशाकरिता रु. १०००/-, दोन प्रशिक्षकांना रु. ३०,०००/- प्रतिमाह मानधन उपलब्ध करुन दिले जाते. सदर कार्यक्रमांतर्गत राज्यातील सुमारे १२००० उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले असून त्यापैकी ७२३ उमेदवारांची अंतिम निवड झाली आहे.

**क) स्पर्धा परिक्षा पूर्व मार्गदर्शन केंद्र:-**

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्ये अल्पसंख्याक समुदायातील उमेदवारांचे प्रतिनिधीत्व वाढावे यासाठी सन २००९-१० पासून राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांच्या ४ केंद्रांमधून मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर प्रत्येकी १० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच सन २०१०-११ पासून यशदा, पुणे येथील डॉ.आंबेडकर स्पर्धा केंद्रामार्फत १० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी प्रशिक्षण देण्यात येते.

**ड) नागरी सेवा (पूर्व) परिक्षा मार्गदर्शन केंद्र:-**

संघ लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणा-या स्पर्धा परिक्षांकरिता अल्पसंख्याक लोकसमूहातील निवडक १० होतकरू उमेदवारांना यशदा, पुणे यांच्यामार्फत प्रशिक्षण देण्यात येते.

**इ)मराठी भाषा फौंडेशन वर्ग :-**

स्पर्धा परीक्षांमध्ये अल्पसंख्याक उमदेवार उमेदवार मराठी भाषेमध्ये मागे पडतात. यासाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मराठी भाषेवर प्रभुत्व प्राप्त व्हावे याकरिता व त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी अमराठी शाळेत शिकणाऱ्या ८ वी ९ वी आणि १० वी च्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत मराठी भाषेचे फौंडेशन वर्ग सुरु करण्यात आले आहेत. या मराठी भाषा फौंडेशन वर्गाचे आयोजन अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये करण्यात येत आहे. यासाठी मानसेवी तत्वावरील शिक्षकांना सन २००६ पासून रु.३०००/- मानधन दिले जात आहे. त्यात सुधारणा करावी (रु.५०००/-) असा विभागाचा प्रस्ताव आहे.

**उपरोक्त योजनाखेरीज खालील उपक्रम महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडून राबविले जात आहेत:-**

**अ) महात्मा गांधी शांतता पुरस्कार :-**

जातीय सलोखा व शांतता राखण्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच जातीय दंगलीत धर्म व जात न पाहता स्वतःचे प्राण धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचविणाऱ्या व राष्ट्रीय एकात्मता व बंधुभाव वाढविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पोलीस अधिकारी/शासकीय अधिकारी व जागृत नागरिकांना महाराष्ट्र राज्य अलपसंख्याक आयोगामार्फत महात्मा गांधी शांतता पुरस्कार देण्यात येतो.

**ब) कौमी एकता सप्ताह :-**

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार दरवर्षी दिनांक १९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर या कालावधीत कौमी एकता सप्ताह साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने दि.२० नोव्हेंबर हा दिवस अल्पसंख्याक कल्याण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने आयोगामार्फत तरूण पिढीच्या मनात राष्ट्रीय एकात्मता व बंधुभाव

वृध्दिंगत करण्यासाठी आंतर शालेय निबंधलेखन, चित्रकला स्पर्धा व आंतर महाविद्यालयीन वादविवाद व नाटयस्पर्धा आयोजित करण्यात येतात. स्पर्धेतील विजेत्यांना आयोगातर्फे प्रथम बक्षीस रु.१०००/- , द्वितीय रु.५००/- व तृतीय रु.३००/- अशी रोख रक्कम देण्यात येते.

क) अल्पसंख्याक हक्क दिन :-

संयुक्त राष्ट्र संघटनेने दिनांक १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्र, धार्मिक, भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांसंबंधी केलेल्या घोषणेनुसार दरवर्षी १८ डिसेंबर हा दिन अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. सदर दिवशी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगातर्फे चर्चासत्र, कार्यशाळा इ. कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

२०) स्वयंसहायक गटाकरिता सहायक अनुदाने :- राज्यातील अल्पसंख्याक महिलांचे मागासलेपण व त्यांची कमकुवत आर्थिक स्थिती विचारात घेवून त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील अल्पसंख्याक बहूल भागातील महिलांसाठी २२०० बचत गट व १३ लोकसंचालित साधन केंद्र उभारण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर योजना ही ८ वर्षासाठी असून याकरिता एकुण रु.२७.५४ कोटी तरतूद करण्यात येणार आहे. सन २०१५-१६ मध्ये यासाठी २ कोटी नियतव्यय उपलब्ध आहे.

२१) अल्पसंख्याक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहायक अनुदान :-

अ) **योजनेचा लक्ष्यगट** :- राज्यातील अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) बेरोजगार उमेदवार.

ब) **योजनेचे उद्दिष्ट** :- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांमधील बेरोजगार उमेदवारास रोजगार मिळण्यास मदत करणे.

क) योजना :- अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांना व्यवसायिक शिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने राज्यातील औरंगाबाद, नागपूर, नाशिक, नांदेड, पुणे व वाशिम येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या कायम विनाअनुदान तत्वावर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्याच्या धोरणानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे सहा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात येतील. याकरिता कायम विनाअनुदानित तत्वावर औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणाऱ्या व चालवू इच्छिणाऱ्या नामांकित अशासकीय अल्पसंख्याक (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) शैक्षणिक संस्थांची विहित निकषांच्या आधारे निवड करून अशा संस्थांना प्रत्येकी रु. ३ कोटी इतके अनुदान अल्पसंख्याक विकास विभागाकडून उपलब्ध करुन दिले जाईल.

ड) **योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद** (सन २०१५-१६):- रुपये २.१० कोटी

ई) **भौतिक उद्दिष्ट** :

फ) **योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा** :- अल्पसंख्याक विकास विभाग व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय , मुंबई.

२२) **संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिद्धी :-**

अ) **योजनेचा लक्ष्यगट** :- राज्यातील अल्पसंख्याक समाज.

ब) **योजनेचे उद्दिष्ट** :- राज्यातील अल्पसंख्याकांना शिक्षण, आरोग्य, निवाससुविधा, रोजगार, पतपुरवठा व इतर मुलभूत सुविधा प्राप्त करण्यासाठी सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या विविध प्रश्नांबाबत संशोधन करून त्यावर उपाययोजना करणे, "अल्पसंख्याकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे" या विषयावर राज्य प्रशासनातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे व राज्य शासनाने अल्पसंख्याकांसाठी जाहीर केलेल्या योजनांना विस्तृत प्रसिध्दी देणे.



क) **योजना** :- या योजनेंतर्गत राज्यातील अल्पसंख्याकांच्या विविध समस्यांविषयक यशदा, पुणे यांच्यामार्फत संशोधन करण्यात येवून त्यावर उपाययोजना सूचविण्यात येतील तसेच "अल्पसंख्याकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे" या विषयावर राज्य प्रशासनातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना यशदा, पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे. राज्य शासन राज्यातील अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांबाबतची माहिती राज्यातील जनसामान्यापर्यंत पोहोचावी या उद्देशाने या सर्व योजनांना महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत दुरदर्शन व राज्यातील सर्व भाषांमधील प्रमुख वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात येत आहे.

ड) **योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा** :- महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग मुंबई आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे

इ) **योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद** (सन २०१५-१६) :- रु.२.८०कोटी

२३) हेल्पलाईनकरीता सहायक अनुदान :-

अ) **योजनेचा लक्ष्यगट** :- राज्यातील अल्पसंख्याक समाज.

ब) **योजनेचे उद्दिष्ट** :- राज्य शासनाने अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लिम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख व पारसी या समाजाच्या लोकांना शासकीय कामकाजाबाबत वेळोवेळी उद्भवणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन व राज्य शासनाने राज्यातील अल्पसंख्याक समाजासाठी सुरु केलेल्या विविध योजनांबाबत संबंधित लोकांच्या शंकाचे निरसन करणे.

क) योजना :- राज्यातील अल्पसंख्याकांना शासनाच्या अल्पसंख्याक विषयक विविध धोरणात्मक निर्णयाबाबत अवगत करण्याकरिता, त्यांना दैनंदिन जीवनात सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या अडचणींच्या दृष्टीने त्यांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्याकरिता तसेच राज्य शासन राज्यातील अल्पसंख्याकांकरिता राबवित असलेल्या विविध विकास योजनांबाबत अचूक माहिती देण्यासाठी व त्याअनुषंगाने त्यांच्या शंकांचे निरसन करण्याकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयात एक हेल्पलाईन सुविधा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

ड) **योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा** :- महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई.

इ) **योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद** (सन २०१५-१६) :- रु.७.०० लक्ष

२४) अल्प कालावधीत व्यवसायावर आधारित पाठयक्रमाकरिता सहायक अनुदान :-

राज्यातील अल्पसंख्याक उमेदवारांकरीता रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम सन २००८-०९ पासून राबविण्यात येत असून, या कार्यक्रमातंर्गत (अ) निरंतर प्रशिक्षण योजना/ तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ/मुक्त विद्यापीठ यांच्यामार्फत राबविण्यात येणा-या अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणा-या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण योजना त्याचप्रमाणे (ब) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून अल्प मुदतीच्या व्यवसायिक प्रशिक्षणाकरिता अनुदान, या योजनांची अनुक्रमे संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय अणि संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्यामार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. याबाबतचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

I) निरंतर प्रशिक्षण योजना / तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ / मुक्त विद्यापीठ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण योजना :-

अ) **योजनेचा लक्ष्यगट** :- तंत्र निकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये यांमधून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या मान्यतेने निरंतर प्रशिक्षण योजनेंतर्गत राबविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य

तंत्रशिक्षण मंडळ यांच्या मान्यतेने चालविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम व मुक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त विविध अभ्यासक्रम यामध्ये सन २०१५-१६ या वर्षात प्रशिक्षण घेत असलेले निवडक अल्पसंख्याक विद्यार्थी.

ब) **योजनेचे उद्दिष्ट** :- राज्य शासनाने अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, पारसी, बौध्द व जैन या समाजातील उमेदवारांमधील बेरोजगारीची समस्या लक्षात घेवून त्यांना रोजगारक्षम बनविणे व त्यांच्याकरिता नियमित उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे.

क) **योजना** :- या योजनेंतर्गत उपरोल्लिखित अभ्यासक्रमामध्ये तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून प्रति विद्यार्थी प्रशिक्षण शुल्काची प्रत्यक्ष रक्कम किंवा रु.४०००/- यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम अदा करण्यात येत आहे.

ड) **योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा** :- संचालक (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**II) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून अल्पमुदतीच्या व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता अनुदान:-**

अ) **योजनेचा लक्ष्यगट** :- राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून अल्पमुदतीचे व्यावसायिक प्रशिक्षण (मॉड्यूलर एम्प्लॉएबल स्कील कोर्सेस उदा. मोटार वाईंडिंग, इलेक्ट्रीकल रिपेअर्स, इ.) घेणारे निवडक अल्पसंख्याक उमेदवार.

ब) **योजनेचे उद्दिष्ट** :- राज्य शासनाने अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, पारसी, बौध्द व जैन या समाजातील उमेदवारांमधील बेरोजगारीची समस्या लक्षात घेवून त्यांना रोजगारक्षम बनविणे व त्यांच्याकरिता नियमित उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे.

क) **योजना** :- या योजनेंतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून अल्पमुदतीचे व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या निवडक अलपसंख्याक उमेदवारांना प्रशिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क अनुदान म्हणून प्रतिविद्यार्थी कमाल रु. १५००/- व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्रति उमेदवार रु.२०००/- पर्यंत किंमतीचे टूल किटस् उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

ड) **योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा** :- संचालक (व्यवसाय प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद (सन २०१५-१६):- रु.७.०० कोटी.

मा. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकास परिषदेने सन २०२२ पर्यंत ५० कोटी कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट ठरविले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांच्या दि.११ ऑक्टोबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत अल्पसंख्याक विकास विभागास ६०,००० कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करुन दिले आहे.

कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत निश्चित करुन देण्यात आलेले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी त्यांना आवश्यक ती तरतुद करुन घेऊन व वेळापत्रक आखून उद्दिष्टाची पूर्तता करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.

शासन निर्णय, दि.११/१०/२०१२ ला अनुसरुन राज्यातील अल्पसंख्याक समाजातील बेरोजगार व होतकरु युवक युवतींना रोजगाराभिमुख कौशल्य शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देऊन त्यांना रोजगार /स्वयंरोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम सुधारित स्वरुपात कार्यान्वित करण्याबाबतचा प्रस्ताव सध्या विचाराधीन आहे.



२५) महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी :-

महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीची स्थापना शासन निर्णय साप्रवि ईयुए-१०७५/एलजेले, दि. १६ एप्रिल, १९७५ अन्वये करण्यात आली. तद्नंतर वेळोवेळी राज्य उर्दु अकादमीची पुर्नरचना करण्यात आली.

उर्दु भाषेचे जतन संवर्धन व प्रसार होण्याच्या दृष्टीने इतर भाषिकांसाठी उर्दु वर्ग सुरु करणे, इम्कान या त्रैमासिकाचे प्रकाशन, चर्चासत्रे, मैफिले-मुशायराचे आयोजन करणे. उर्दुशाळा व महाविद्यालयांना वाङ:मयीन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सहायक अनुदान मंजूर करणे, उर्दु ग्रंथालये/वाचनालये स्थापन करणे, उर्दु ग्रंथालयांना मासिके व पुस्तकांच्या स्वरुपात सहायक अनुदान मंजूर करणे, उर्दु पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करणे, उर्दु नाटके-एकांकिका स्पर्धा/ नाटय कार्यशाळा आयोजित करणे, नाट-एकाकिका उत्तेजनपर पारितोषिक देणे, उर्दु हस्तलिखितांचे प्रकाशन व मराठी उर्दु अनुवादकांना आर्थिक अनुदान देणे, उर्दु पुस्तकांना पारितोषिक देणे, पदवी/पदव्युत्तर परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देणे, आजारी अवस्थेतील प्रसिध्द उर्दु लेखक, कवी यांना मदत करणे, विद्यापीठांना उर्दु विभाग सुरु करण्यासाठी अनुदान देणे, उर्दु पत्रकारांसाठी कार्यशाळांचे आयोजन करणे इत्यादी कार्ये महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत पार पाडली जातात.

महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीकरिता सन २०१५-१६ करिता योजनांतर्गत रु.०.७ कोटी व योजनेंतर रु.२० लक्ष अर्थसंकल्पिय तरतुद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीकरिता अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी -०१, सहायक-०२, लघुलेखक (उर्दु)-०१, लघुलेखक-०१, लिपीक-०१, देयक लिपीक-०१, मराठी टंकलेखक-०१, आणि शिपाई ०२ अशी एकूण १० पदे मंजूर आहेत.

२६) राज्यात उर्दु घरांची उभारणी :-

राज्यामध्ये उर्दु भाषेची वाङ:मयीन प्रगती, मराठी व उर्दु भाषेमधील लेखक,कवी, विचारवंत इत्यादीमध्ये सृजनशील विचारांची देवाण-घेवाण होऊन उर्दु भाषेचावाङ:मयीन विचार व्हावा उर्दु भाषेच्या समृध्दीसाठी एक ठिकाणी असावे या उद्देशाने उर्दु घरे उभारण्यात येत असून त्यानुसार नांदेड येथील उर्दु घर बांधण्यास रु.६.१६ कोटी, सोलापूर येथील उर्दु घर बांधण्यास रु.४.९९ कोटी आणि मुंबई येथील उर्दु घरासाठी ४.९५ कोटीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. नांदेड व सोलापूर येथील उर्दु घरांकरिता २२.३३ कोटी इतके अनुदान वितरित करण्यात आले असून सन २०१५-१६ मध्ये उर्दु घरासाठी रु.०.७० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.

२७) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ :-

केंद्र शासनाने संपूर्ण देशासाठी वक्फ अधिनियम, १९९५ हा कायदा पारीत करुन दि.१.१.१९९६ पासून राज्याकरिता लागू केला आहे. या कायदयाच्या कलम १३ व १४ च्या शासन अधिसूचना महसूल व वन विभाग क्र. वक्फ -१०/२००१/प्र.क्र. १५४/ल-३, दि.४ जानेवारी, २००२ अन्वये पनचक्की, औरंगाबाद येथे मुख्यालय असलेल्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची स्थापना करण्यात आली.

राज्य वक्फ मंडळाचे प्रमुख कार्य वक्फ मालमत्तेचे सर्वेक्षण, संरक्षण व संवर्धन करणे हे आहे. राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्याखाली मोठया प्रमाणावर जमिनी असून त्यापैकी बहुतांश जमिनीवर अतिक्रमणे करण्यात आलेली आहेत. सदर अतिक्रमणे दूर करुन मंडळाच्या महसुली उत्पन्नात भरीव वाढ करुन मंडळाला स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने मंडळातील कर्मचारी वर्ग वाढविणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत राज्य वक्फ मंडळाकडील कर्मचारी वर्गाची संख्या ५१ असून त्यात वाढ करुन १०६ इतकी करण्याच्या वक्फ मंडळाच्या प्रस्तावास दि.१२.८.२०१० च्या शासन पत्रान्वये संम्मती प्रदान करुन सदर आस्थापनेवर आवश्यकतेनुसार काही पदे नव्याने निर्माण करण्याचा तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या काही पदांची दर्जोन्नती करण्यासाठी व अनावश्यक पदे वगळण्याचा तसेच मुख्यालयाच्या अधिपत्याखालील प्रस्तावित ५ प्रादेशिक विभागीय

कार्यालयांसाठी सुधारित आस्थापना मंजूर करण्याच्या प्रस्तावास दि.७ जून, २०११ च्या शासन पत्रान्वये सहमती प्रदान करण्यात आली आहे.

वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम १४ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर सदस्य नियुक्ती करण्याकरिता तरतुदी विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर कलमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर विविध संवर्गातून १२ सदस्यांची निवडणुकीद्वारे / नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्याची तरतुद आहे. सद्य:स्थितीत वक्फ मंडळावर ९ सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी रु.१५.०० कोटी अनुदान देण्याचे शासनाने मान्य केले आहे. त्यानुसार सन २०११-१२ या आर्थिक वर्षात रु.३.८६ कोटी इतका निधी वक्फ मंडळास उपलब्ध करुन देण्यात आला असून चालू आर्थिक वर्षात या उद्दिष्टाकरिता रु.१.४० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतुद करण्यात आली आहे.

२८) इस्लामिक सांस्कृतिक केंद्र :-

राज्यात हिंदु मुस्लिम, बौध्द ख्रिश्चन, शीख, पारसी अशा नानाविध धर्माच्या लोकांचे वास्तव्य आहे. लोकसंख्येनुसार हिंदु धर्मीय हे बहुसंख्येत असून उर्वरित धर्मियांचा समावेश अल्पसंख्यांकामध्ये होतो. या अल्पसंख्याकांपैकी मुस्लिम धर्मियांची लोकसंख्या लक्षणीय आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व धर्मियांमध्ये सामंजस्य आणि सौहार्दाचे प्रतिक म्हणून "इस्लामिक सांस्कृतिक केंद्र" उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेत विधानसभेत उत्तर देताना दि.२६.३.२०१३ रोजी केलेल्या भाषणात मुंब्रा येथे इस्लामिक सांस्कृतिक केंद्र सुरु करण्याची मागणी मान्य केल्याचे मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले आहे. यासाठी जागा निश्चित करण्यात आली असून या जागेशी संबंधित कायदेशीर बाबी तपासून पाहण्यात येत आहेत. प्रस्तावित ईस्लामिक सांस्कृतिक केंद्राच्या सर्व घटकांचे नकाशे व सविस्तर संकल्पचित्रे तयार करण्याचे काम मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडून सुरु असून त्यांनी नकाशे / संकल्पचित्रे तयार करुन दिल्यावर सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याविषयी कार्यवाही करण्यात येईल. सदर प्रयोजनाकरिता सन २०१५-१६ मध्ये रु.१.०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे.

********

## परिशिष्ट "ब"

**(मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून प्राप्त झालेली माहिती)**



# अल्पसंख्याक कल्याण समिती

बैठकीमध्ये उपस्थित झालेल्या मुदयांसदर्भात माहिती.

# मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ

## परिशिष्ट १

| अ. क्र. | प्रश्नावली | अभिप्राय |
|---|---|---|
| १) | मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळासाठी वर्ग-१ ते वर्ग-४ ची किती पदे मंजूर आहेत? त्यातील किती पदे भरलेली आहेत व किती पदे कधीपासून रिक्त आहेत व सदरची रिक्त पदे भरण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे? महामंडळास वाढीव पदांची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबतची संवर्गनिहाय माहिती देण्यात यावी. | शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्रमांक-मौआम-२०१२/प्र.क्र.८७/१२/का.८, दि.१२ जून, २०१३ अन्वये एकूण १५७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे यापैकी व्यवस्थापकीय संचालक व सहव्यवस्थापकीय संचालक ही पदे शासनाने अतिरिक्त कार्यभार देऊन अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त मुख्यालयात तसेच जिल्हा कार्यालयात ५० अधिकारी / कर्मचारी कंत्राटी पध्दतीने कार्यरत आहेत. शासन निर्णयाच्या दिनांकापासून उर्वरित पदे रिक्त आहेत. महामंडळात कंत्राटी असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ३० कर्मचारी यांनी नियमित करण्यासाठी उच्च न्यायालयात तसेच ०९ कर्मचारी यांनी औद्योगिक न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. सद्यःस्थितीत वाढीव पदाची आवश्यकता वाटत नाही. उच्च न्यायालयाच्या व औद्योगिक न्यायालयाच्या निकालानंतर पदभरतीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| २) | मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्यांक प्रवर्गासाठी कोणत्या योजना राबवण्यित येतात त्याबाबतची माहिती निकषांसह देण्यात यावी. | महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या व त्याबाबतचे निकष सोबत **परिशिष्ट-१** मध्ये जोडण्यात आले आहेत. |
| ३) | मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे प्राधिकृत भाग भांडवल किती कोटी रुपयांचे आहे व सदर भाग भांडवल वाढविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे किंवा कसे, असल्यास याबाबतची माहिती देण्यात यावी. | शासनाने महामंडळाचे प्राधिकृत भाग भांडवलामध्ये रु.५००.०० कोटींपर्यंत वाढ केली असून त्यापैकी आतापर्यंत रु.३००.१९ कोटी इतके भाग भांडवल महामंडळास वितरित केले आहे. मंजूर असलेल्या प्राधिकृत भाग भांडवलापैकी सन् २०१५-१६ साठी रु.७५.०० कोटी वितरित करण्याबाबत या महामंडळाचे पत्र क्र.मौआम/लेखा/२०१५/१८३१, दिनांक २७/०७/२०१५ अन्वये शासनास विनंती करण्यात आली आहे. सदरील पत्राची छायांकित प्रत सोबत **परिशिष्ट-२** मध्ये जोडण्यात आली आहे. |
| ४) | मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून गत ३ वर्षात कोणत्या योजनेखाली किती अर्ज प्राप्त झाले होते व | महामंडळामार्फत सन् २०१२-१३ व सन् २०१३-१४ या कालावधीमध्ये फक्त शैक्षणिक कर्ज योजना कार्यान्वित होती. सदर योजनेअंतर्गत मागील तीन वर्षांमध्ये वाटप करण्यात आलेल्या कर्ज रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे - |



त्यापैकी किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला? त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला? लाभापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांची योजनानिहाय संख्या व कारणे काय आहेत? निधी अउपलब्धतेमुळे किती लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत? महामंडळास जास्तीत जास्त लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी किती वाढीव निधीची आवश्यकता आहे?

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | वर्ष | योजनेचे नाव | लाभार्थ्यांची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | शैक्षणिक कर्ज योजना | ११८१ | ७.५० |
| २ | २०१३-१४ | | २०१८ | ३२.०९ |
| ३ | २०१४-१५ | | २८६१ | २०.४५ |
| ४ | २०१५-१६ (६ ऑगस्ट, २०१५ पर्यंत) | | ६५८ | ४.७२ |
| | एकूण | | ६७१८ | ६४.७६ |

**थेट कर्ज योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अर्ज व त्यांना वितरित करण्यात आलेली रक्कम - सदर योजना सन् २०१२-१३ व सन् २०१३-१४ मध्ये कार्यान्वित नव्हती.**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | वर्ष | प्राप्त अर्जांची संख्या | उद्दिष्टे | कर्ज वितरित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ६३१५२ | १६६८० | ११०३६ | ४४.१४ |
| २ | २०१५-१६ | | | २२१५ | ८.८६ |
| | एकूण | ६३१५२ | १६६८० | १३२५१ | ५३.०० |

**मुदत कर्ज योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अर्ज व त्यांना वितरित करण्यात आलेली रक्कम - सदर योजना सन् २०१४-१५ पासून सुरु करण्यात आली आहे.**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | वर्ष | प्राप्त अर्जांची संख्या | उद्दिष्टे | कर्ज वितरित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | १३६४ | ८०९ | - | - |
| २ | २०१५-१६ | | | २७० | २.८२ |
| | एकूण | १३६४ | ८०९ | २७० | २.८२ |

**सुक्ष्म पतपुरवठा योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अर्ज व त्यांना वितरित करण्यात आलेली रक्कम - सदर योजना सन् २०१४-१५ पासून सुरु करण्यात आली आहे.**

**(रुपये कोटीत)**

| अ. क्र. | वर्ष | प्राप्त अर्जांची संख्या | उद्दिष्टे | कर्ज वितरित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ७७० | ७७० | २६५ | ५.०६ |
| २ | २०१५-१६ | | | १३७ | २.५७ |
| **एकूण** | | **७७०** | **७७०** | **४०२** | **७.६२** |

मंजूर करण्यात आलेल्या कर्जापैकी जिल्हानिहाय व योजनानिहाय वितरित करण्यात आलेल्या कर्ज रक्कमेचा तपशिल सोबत **परिशिष्ट-३** मध्ये जोडण्यात आला आहे.

ज्या लाभार्थ्यांच्या कर्ज प्रस्तावामध्ये त्रुटी आढळूनआल्या आहेत अशा लाभार्थ्यांना त्रुटींची पुर्तता करण्यासाठी कळविण्यात आले होते. त्रुटींची पुर्तता केल्यानंतर सदरील लाभार्थ्यांना कर्ज मंजूर करुन वितरित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. निधी अभावी कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव प्रलंबित राहिले नाहीत. महामंडळासाठी सन् २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये भाग भांडवलातील अंशदान म्हणून शासनामार्फत रु.७५.०० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

५) मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून गत ३ वर्षात विविध योजनेखाली देण्यात आलेल्या कर्ज वाटपातील प्रकरणांमध्ये किती वसुली करण्यात आली व किती रक्कम वसूल करणे अद्याप बाकी आहे ? कर्ज वसुली वाढण्यासाठी महामंडळाकडून कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत याबाबतची माहिती देण्यात यावी.

**(रुपये लाखात)**

| अ. क्र. | योजनेचे नाव | एकूण वाटप केलेले कर्ज | झालेली वसुली |
|---|---|---|---|
| १ | थेट कर्ज योजना | ५३००.८० | १५६०.३७ |
| २ | मुदत कर्ज योजना | २८१.७३ | |
| ३ | सुक्ष्म पतपुरवठा योजना | ७६२.५० | |
| ४ | शैक्षणिक कर्ज योजना | ५५७५.७९ | |
| **एकूण** | | **११९२०.८२** | **१५६०.३७** |

महामंडळामार्फत वाटप करण्यात आलेल्या कर्जाची परतफेड पुढील ५ वर्षांच्या कालावधीमध्ये करणे अपेक्षित आहे. त्यामुळे कर्जाची वसुली पुढील ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत होणार आहे.

महामंडळामार्फत वाटप करण्यात येणाऱ्या सर्व कर्ज योजनेअंतर्गत कर्ज वसुलीबाबतचे आगाऊ दिनांकित धनादेश (PDC) घेण्यात येतात. सदरील PDC विहित दिनांकास जिल्हा स्तरावरील बँकेमध्ये जमा करण्यात येतात. ज्या लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यामुळे ज्या PDC धनादेशांचे अनादर (बाऊन्स) होतात अशा लाभार्थ्यांना



निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ (१) अंतर्गत नोटीस देण्यात येते. वसुलीसाठी कायदेशीर सल्लागारांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

जिल्हा कार्यालयामार्फत ज्या लाभार्थ्यांचे कर्ज वसुलीबाबतचे धनादेश अनादर (बाऊन्स) होतात अशा लाभार्थ्यांना व त्यांच्या जामीनदारांना दूरध्वनीवरुन तसेच पत्राद्वारे सूचना देण्यात येत आहेत व सदरील कर्जाची रक्कम भरण्याबाबत कळविण्यात येते.

६) मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास विविधयोजना राबविण्यात नेमक्या कोणत्या अडचणी येत आहेत, त्याबाबतची माहिती देण्यात यावी. तसेच लाभार्थी संख्या वाढविण्यासाठी कोणत्या योजनेतील कोणते निकष बदलणे योग्य राहील याबाबत अभिप्राय देण्यात यावेत.

१) महामंडळाची जिल्हा स्तरावर कार्यरत असलेली कार्यालये ही खाजगी मालकीच्या जागेमध्ये कार्यरत असल्याने सदरील कार्यालयासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारामध्ये बांधलेली किमान ६०० स्क्वे.फुट जागा उपलब्ध करुन दिल्यास सदरील योजना अधिकाधिक प्रभावीपणे राबविता येतील.

२) महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून महाराष्ट्रात कार्यरत आहे त्यांच्यामार्फत कर्ज घेण्यासाठी आवश्यक असलेली शासन हमी उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यामार्फत कर्ज उपलब्ध करुन घेणे शक्य होईल.

३) महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत उत्पन्न मर्यादा व कर्ज मर्यादेमध्ये वाढ करण्यात यावी.

७) मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास अल्पसंख्यांक कल्याण समितीकडून राज्य शासनास कोणत्या शिफारशी सुचविणे अपेक्षित आहे?

महामंडळास शासनाने १५७ पदांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. सदरील मंजूर पदांपैकी ७६ पदांवरील वेतन व भत्ते करिता शासन अनुदान देईल असे दिनांक १२ जून, २०१३ च्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार महामंडळात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वेतन व भत्ते करिता व प्रशासकीय खर्चासाठी अनुदान उपलब्ध करुन दिल्यास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना अधिक प्रभावीपणे राबविता येतील.

महामंडळाच्या सर्व जिल्हा कार्यालयासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारामध्ये बांधलेली शासकीय जागा उपलब्ध करुन दिल्यास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा फायदा अधिकाधिक जनतेपर्यंत पोहोचविणे शक्य होईल.

८) मौलाना आजाद शिक्षा ऋण योजनेअंतर्गत किती लाभार्थ्यांना प्रत्येकी किती रक्कमेचे कर्ज देण्यात आले त्यापैकी लाभार्थ्यांकडून कर्जाची किती

मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजना व राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना या दोन योजना राबविण्यात येतात.

शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत सन् २०१२-१३ ते ०६ ऑगस्ट, २०१५ पर्यंत मंजूर करुन वितरित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची

| | | |
|---|---|---|
| | रक्कम येणे बाकी आहे तसेच किती रक्कम बुडीत गेली आहे याची माहिती समितीला देण्यात यावी. | संख्या, मुद्दा क्रमांक-४ मधील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली आहे.<br>शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत वितरित करण्यात येणारी रक्कम दरवर्षी त्यांच्या फी स्ट्रक्चरनुसार वितरित करण्यात येते. शैक्षणिक कालावधी पूर्ण झाल्यापासून ६ महिन्यानंतर परतफेड सुरु करण्यात येते. ज्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कालावधी पूर्ण झाला आहे अशा विद्यार्थ्यांच्या कर्ज वसुलीबाबतची कार्यवाही सुरु आहे त्यामुळे सदरील कर्ज बुडीत जाण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |
| ९) | विविध योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना कर्ज देण्यात येते त्याचा सदुपयोग होतो किंवा कसे याबाबत यशदाकडे दिलेल्या कामाची सद्यःस्थितीची माहिती समितीला देण्यात यावी. | महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या मूल्यमापनावरील खर्च शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण व संशोधन या योजनेतून भागविण्यास मान्यता देण्यात यावी व त्यानुसार महामंडळाच्या सर्व योजनांचे मूल्यमापन यशदा, पुणे यांच्यामार्फत करण्यात यावे याबाबतची विनंती महामंडळाचे पत्र क्रमांक-मौआम/लेखा/ २०१५/१००९, दि.२०/०४/२०१५ अन्वये करण्यात आली. त्वरित संदर्भासाठी सदरील पत्राची छायांकित प्रत सोबत **परिशिष्ट-४** मध्ये जोडण्यात आली आहे. |
| १०) | मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळासाठी आवश्यक १५७ मंजूर पदांच्या वेतनासाठी वित्त विभागाने अनुदानास मंजूरी दिली नाही त्याची कारणे काय आहे व सदर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी शासनाने अनुदान मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ? | शासन स्तरावरुन उत्तर देणे अभिप्रेत आहे.<br>(सदर प्रश्नाचे उत्तर व अभिप्राय सोबत जोडण्यात आले आहे) |
| ११) | मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाने सन् २०१३-१४, २०१४-१५ व सन् २०१५-१६ (माहे जून, २०१५ पर्यंत) या ३ वर्षात थेट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज योजना व मुदत कर्ज योजनेअंतर्गत जिल्हानिहाय खालील मुद्यांची माहिती समितीस देण्यात यावी. | **महामंडळामार्फत सन् २०१२-१३ ते दिनांक ०६ ऑगस्ट, २०१५ या कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या विविध कर्ज योजनेअंतर्गत प्राप्त अर्जांची संख्या, उद्दिष्टे, कर्ज वितरित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या व रक्कम मुद्दा क्रमांक-४ मधील तक्त्यांमध्ये दर्शविण्यात आली आहे.**<br>महामंडळामार्फत मंजूर करण्यात आलेल्या कर्जापैकी कर्ज वितरित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या व वितरित करण्यात आलेली रक्कम, प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची संख्या व रक्कम याबाबतचा तपशिल सोबत **परिशिष्ट-५** मध्ये जोडण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांच्या प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत अशा |



| | | |
|---|---|---|
| | अ)किती अर्ज प्राप्त झाले व किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला? | लाभार्थ्यांना त्रुटींची पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले होते. ज्या लाभार्थ्यांमार्फत विहित वेळेत त्रुटींची पुर्तता करण्यात आली आहे अशा लाभार्थ्यांच्या कर्जाची रक्कम संबंधितांच्या खात्यावर NEFT द्वारे जमा करण्यात आली आहे. |
| | ब)त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला?प्रत्यक्षात त्यातील किती निधीचे वाटप करण्यात आले? | |
| | क)किती अर्जदार कर्जापासून वंचित राहिले आहेत त्यांची वर्षनिहाय संख्या व कारणे देण्यात यावीत. | |
| | ड)सद्यःस्थितीत कोणत्या योजनेअंतर्गत किती अर्ज प्रलंबित आहेत व किती कालावधीत त्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे? | |
| १२) | मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळात गत ४ वर्षापासून संचालकांची नियुक्ती का करण्यात आली नाही याची माहिती समितीस अवगत करण्यात यावी तसेच संचालकांची त्वरित नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ? | शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक-मौआम-२००७/प्र.क्र.३३२/रोस्वरो-१, दि.७ नोव्हेंबर, २००७ व दि.१५ जानेवारी, २००८ अन्वये ०६ अशासकीय संचालक व शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्रमांक-अविवि-२००८/ प्र.क्र.१७२/ ०८/ का.१, दि.०९ सप्टेंबर, २००८ अन्वये ०५ अशा एकत्रित ११ अशासकीय संचालकांची ०३ वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली होती. तद्‌नंतर शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, दि.१२ नोव्हेंबर, २०१० अन्वये ०५ अशासकीय संचालकांच्या नियुक्तीला नव्याने पुढील नेमणुका होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तद्‌नंतर शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, दि.१७ जुलै, २०१४ व दि.२२ ऑगस्ट, २०१४, दि.१० सप्टेंबर, २०१४ अन्वये ११ अशासकीय संचालकांची नियुक्ती करण्यात आली होती. सदरील नियुक्ती दि.०४ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर अद्याप नियुक्ती करण्यात आलेली नाही. शासन निर्णयाच्या प्रति **परिशिष्ट-६** मध्ये जोडण्यात आल्या आहेत. |

| प्रश्नावली | महामंडळाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|
| **मुद्दा क्रमांक-१०:-**<br>मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळासाठी आवश्यक १५७ मंजूर पदांच्या वेतनासाठी वित्त विभागाने अनुदानास मंजूरी दिली नाही त्याची कारणे काय आहे व सदर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी शासनाने अनुदान मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे. | शासन स्तरावर उत्तर देणे अभिप्रेत आहे. | मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केल्यानंतर वित्त विभागाने पुढीलप्रमाणे अभिप्राय व सूचना दिल्या आहेत :-<br>• महामंडळाचा सन् २००५-०६ पर्यंत वार्षिक लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवले आहेत. सन् २००६-०७ पासूनचे वार्षिक लेखे विधानमंडळाकडे सादर करावेत.<br>• महामंडळाने वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक २१/०६/२०१० व दिनांक २२/०२/२०१२ मधील तरतुदीनुसार शासनास अद्याप लाभांश अदा केलेला नाही. त्यामुळे महामंडळाने नफ्यात असल्यापासूनचा लाभांश महामंडळाने शासनास अदा करावा त्यानुसार महामंडळाने कार्यवाही करावी.<br>• महामंडळाने १००% कर्ज वसुली करावी या अटीच्या अधिन राहून महामंडळाच्या आस्थापनेवरील पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. सध्या होत असलेली कर्ज वसुली व टक्केवारी यांची आकडेवारी उपलब्ध करुन द्यावी तसेच कर्ज वसुलीबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजनाबाबत शासनास अवगत करावे.<br>• महामंडळामध्ये ७६ पदांपैकी ७५ पदे रिक्त असताना ७६ पदांचे वेतन व भत्ते यासाठी अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव मान्य करता येणार नाही, असे स्पष्ट अभिप्राय वित्त विभागाने दिले आहे.<br><br>वित्त विभागाच्या वरील सूचना महामंडळास दिनांक १४ जुलै, २०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहेत. महामंडळाच्या सन् २००७-०८ या वर्षापर्यंतचे लेखे महाराष्ट्र विधानमंडळास सादर करण्यात आलेले आहेत तसेच त्यापुढील ७ वर्षांच्या लेख्यांबाबतची |



| | | |
|---|---|---|
| | | महामंडळाने सादर केलेली वस्तुस्थिती यासोबत ठेवली आहे. (पताका - )<br><br>महामंडळास नफा झाला नसल्याने ही माहिती निरंक आहे.<br><br>शासन निर्णय, दिनांक १२ जून, २०१३ अन्वये महामंडळाचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. त्याप्रमाणे नियुक्त्या झाल्यानंतर कर्ज वसुलीच्या प्रमाणात निश्चितच वाढ होणार आहे. ३०% कर्ज वसुली आहे.<br><br>दिनांक १२ जून, २०१३ च्या शासन निर्णयाद्वारे एकूण १५७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला. यापैकी ७६ पदांच्या वेतनावरील खर्च शासनामार्फत देण्याचे मंजूर आहे त्यानुसार वेतन अनुदानासाठी मागणी केली असता सदर ७६ पदे भरली नसल्याने अनुदान देण्यास वित्त विभागाने नकार दिला आहे. तथापि, मंजूर पदांपैकी भरलेल्या पदांचे वेतन देणे आवश्यक असल्याने त्यानुसार आकृतीबंधानुसार भरण्यात आलेल्या पदांच्या वेतनावरील खर्चाची मागणी वित्त विभागाकडे करण्याचे प्रस्तावित आहे. |

## महामंडळ राबवित असलेल्या विविध योजना :-

**१) मौलाना आजाद थेट कर्ज योजना :-**

१) कर्ज मर्यादा रु.५ हजार ते रु.५० हजार पर्यंत   २) स्वगुंतवणूक ५%, कर्ज ९५%
३) व्याजदर (द.सा.द.शे.) ६%   ४) परतफेड - ५ वर्षाच्या कालावधीत

**२) उन्नती मुदत कर्ज योजना :-**

१) कर्ज मर्यादा रु.५ हजार ते रु.३.०० लाखापर्यंत   २) स्वगुंतवणूक ५%, कर्ज ९५%
३) व्याजदर (द.सा.द.शे.) ६%   ४) परतफेड - ५ वर्षाच्या कालावधीत

**३) राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना :-**

१) कर्ज मर्यादा - रु.५.०० लाखापर्यंत
२) व्याजदर - फक्त ३%.
३) १००% कर्ज.
४) परतफेड:शिक्षणपूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यापासून पुढील ५ वर्षे.

**४) मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजना:-**

१) कर्ज मर्यादा - रु.२.५० लाखापर्यंत
२) व्याजदर - फक्त ३%
३) १००% कर्ज
४) परतफेड:शिक्षणपूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यापासून पुढील ५ वर्षे.
५) कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापर्यंत.

**[illegible]**

१) रु.५०,०००/- प्रति लाभार्थी
२) SHG (स्वयंसहाय्यता गट)
३) व्याजदर - ६%
४) स्वयंसहायत्ता गटासाठी कर्ज दिले जाते.
५) परतफेड:३६ महिन्यात (१२ त्रैमासिक हप्ते)

**प्रोत्साहनात्मक कार्यक्रम**

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नांव | कालावधी | कार्यक्रम संख्या / लाभार्थी |
|---|---|---|---|
| १ | अल्पसंख्यांक स्वयंरोजगार जनजागृती कार्यक्रम | एक दिवस | १ |
| २ | व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम | ६ महिने | १/३० |
| ३ | उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम | १ महिना | १/३० |
| ४ | कॉम्प्युटर कोर्स इन ॲप्लिकेशन / मेंन्टेनंन्स | ६ महिने | १/३० |
| ५ | महिला समृध्दी योजना प्रशिक्षण | ६ महिने | १/३० |

**६) प्रशिक्षण योजना:**-१) व्होकेशनल ट्रेनिंग प्रोग्राम : ६ महिने कालावधी
२) प्रदर्शन - मार्केटिंग : दरवर्षी एक प्रदर्शन
३) स्कील अपग्रेडेशन / डिझाईन डेव्हलपमेंट



**७) पात्रता -**

१) अर्जदार अल्पसंख्यांक समाजातील असावा. मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, पारशी, बुद्धीष्ट व जैन समाजाचा समावेश.
२) अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
३) अर्जदार कमीत कमी साक्षर असावा.
४) वयोमर्यादा किमान १८ वर्षे.
५) शैक्षणिक योजनेसाठी वयोमर्यादा १६ ते ३२ वर्षे.
६) **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (राज्य शासन पुरस्कृत योजनेसाठी)**
अ) शहरी भागासाठी - रु.१,०३,०००/- पेक्षा कमी, ग्रामीण भागासाठी - रु.८१,०००/- पेक्षा कमी
**कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी)**
ब) शहरी भागासाठी - रु.१,०३,०००/- पेक्षा कमी, ग्रामीण भागासाठी - रु.८१,०००/- पेक्षा कमी

**८) आवश्यक कागदपत्रे :-**

**अ)शैक्षणिक कर्ज योजना -**

१)विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक साक्षांकित कागदपत्रांच्या दोन प्रती.
२)अल्पसंख्यांक असल्याचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा जात प्रमाणपत्र)
३)**महाराष्ट्र राज्याचा रहिवासी पुरावा**
(आधार कार्ड / इलेक्शन कार्ड / पारपत्रक (Passport) / बँकेचे पासबुक / ड्रायव्हिंग लायसन्स / दूरध्वनी देयक / विद्युत देयक किंवा तलाठी / तहसिलदार यांनी दिलेले रहिवासी प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक)
४)**ओळखपत्र :** अर्जदार व जामिनदार दोन्हीचे
(आधार कार्ड / इलेक्शन कार्ड / पारपत्रक (Passport) / बँकेचे पासबुक / ड्रायव्हिंग लायसन्स / पॅन कार्ड यापैकी कोणतेही एक)
५)**उत्पन्न प्रमाणपत्र :** कुटुंब प्रमुखाच्या नाव तहसिलदार / तलाठा याना निगामत कलला उत्पन्नाचा दाखला / शासकीय व खाजगी क्षेत्रातील कर्मचारी असल्यास फॉर्म नं.१६.
६) विहित नमुन्यातील अर्जदार व जामिनदाराचे हमीपत्र.
७)**बेबाकी प्रमाणपत्र :** महामंडळाने विहित केलेल्या नमुन्यात अर्जदाराचे खाते असलेल्या बँकेचे / वित्तीय संस्थेचे कोणत्याही प्रकारचे कर्ज / थकबाकी नसल्याचे बेबाकी प्रमाणपत्र व इतर कोणत्याही बँकेचे / वित्तीय संस्थेचे कर्ज नसल्याबाबतचे मुळ शपथपत्र.
८)**जामिनदार -**
सक्षम जामिनदार (सार्वजनिक उपक्रम / शासकीय / बँक किंवा खाजगी क्षेत्रातील आयकर भरणारी व्यक्ती) किंवा स्थावर (Immovable) मालमत्ता असल्यास गहाण (Mortgage) अथवा जंगम (Movable) मालमत्ता असल्यास तारणगहाण (Hypothecate) करुन घेणे. (मालमत्ता मुल्यांकन पत्र, मालमत्तेची माहिती - ७/१२ चा उतारा, ८-अ चा उतारा)
९)शैक्षणिक संस्थेचे शुल्कपत्रक (फी स्ट्रक्चर), वसतिगृह / घरमालकाचे भाडेपत्रक व खानावळ (मेस) चे दरपत्रक.

**नोट:**-दारिद्र्य रेषेखालील उमेदवारांनी दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबतचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे.

**ब)थेट कर्ज योजना -**

१)विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक साक्षांकित कागदपत्रांच्या दोन प्रती.
२)अल्पसंख्यांक असल्याचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा जात प्रमाणपत्र)

३)**महाराष्ट्र राज्याचा रहिवासी पुरावा**
(आधार कार्ड / इलेक्शन कार्ड / पारपत्रक (Passport) / बँकेचे पासबुक / वाहन चालक परवाना/ दूरध्वनी देयक / विद्युत देयक किंवा तलाठी / तहसिलदार यांनी दिलेले रहिवासी प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक)

४)**ओळखपत्र :** अर्जदार व जामिनदार दोन्हीचे
(आधार कार्ड / इलेक्शन कार्ड / पारपत्रक (Passport) / बँकेचे पासबुक / वाहन चालक परवाना/ पॅन कार्ड यापैकी कोणतेही एक)

५)**उत्पन्न प्रमाणपत्र :**
कुटुंब प्रमुखाच्या नावे तहसिलदार / तलाठी यांनी निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला / शासकीय व खाजगी क्षेत्रातील कर्मचारी असल्यास फॉर्म नं.१६ किंवा २० रुपयाच्या बाँड पेपरवर अर्जदाराने स्वतः प्रमाणित केलेल्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

६) विहित नमुन्यातील अर्जदार / जामिनदाराचे हमीपत्र.

७)**बेबाकी प्रमाणपत्र :** महामंडळाने विहित केलेल्या नमुन्यात अर्जदाराचे खाते असलेल्या बँकेचे / वित्तीय संस्थेचे कोणत्याही प्रकारचे कर्ज / थकबाकी नसल्याचे बेबाकी प्रमाणपत्र व इतर कोणत्याही बँकेचे / वित्तीय संस्थेचे कर्ज नसल्याबाबतचे मुळ प्रतीतील शपथपत्र.

८)**जामिनदार -**
अर्जदारास ओळखणाऱ्या व्यक्तीकडून कर्जासाठी हमी देत असल्याचे, जामीन राहात असल्याचे व अर्जदाराने परतफेड न केल्यास परतफेडची स्वतः जबाबदारी स्विकारत असल्याबाबत विहित नमुन्यातील रु.१००/- च्या स्टँप पेपरवरील हमीपत्र

९)विधवा महिलांसाठी पतीचा मृत्यु झाल्याबाबतचा ग्रामसेवक / नगरपालिका / महानगरपालिका यांनी प्रमाणित केलेला दाखला.

१०)घटस्फोटीत महिलांकरिता घटस्फोट झाल्याबाबतचा न्यायालयाचा दाखला किंवा रु.२०/- च्या बाँड पेपरवर अर्जदाराचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.

११)दंगलपिडीत व्यक्तीबाबत पोलीस पंचनाम्याची प्रत.

१२)नैसर्गिक आपद्ग्रस्त व्यक्तीबाबत तलाठी / तहसिलदार / जिल्हाधिकारी यांचा अहवाल.

१३)अपंग व्यक्ती ज्यांचे (अपघातामध्ये अपंगत्व आलेल्या व्यक्तींसहित) पाय व हात / अंधत्व / मुकबधिर / कर्णबधिर कमीत कमी ४०% अशा व्यक्तींना शासकीय रुग्णालयातील / जिल्हा शल्यचिकित्सक यांनी प्रमाणित केलेला दाखला सादर करणे आवश्यक राहील.

**नोटः**-दारिद्र्य रेषेखालील उमेदवारांनी दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबतचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे.

**<u>क)मुदत कर्ज योजना -</u>**

१)विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक साक्षांकित कागदपत्रांच्या दोन प्रती.

२)अल्पसंख्यांक असल्याचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा जात प्रमाणपत्र)

३)**महाराष्ट्र राज्याचा रहिवासी पुरावा :**
(आधार कार्ड / इलेक्शन कार्ड / पारपत्रक (Passport) / बँकेचे पासबुक / वाहन चालक परवाना/ दूरध्वनी देयक / विद्युत देयक किंवा तलाठी / तहसिलदार यांनी दिलेले रहिवासी प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक)

४)**ओळखपत्र :** अर्जदार व जामिनदार दोन्हीचे
(आधार कार्ड / इलेक्शन कार्ड / पारपत्रक (Passport) / बँकेचे पासबुक / वाहन चालक परवाना / पॅन कार्ड यापैकी कोणतेही एक)

५)**उत्पन्न प्रमाणपत्र :**
कुटुंब प्रमुखाच्या नावे तहसिलदार / तलाठी यांनी निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला / शासकीय व खाजगी क्षेत्रातील कर्मचारी असल्यास फॉर्म नं.१६.

६)विहित नमुन्यातील अर्जदार व जामिनदाराचे हमीपत्र.



७)**बेबाकी प्रमाणपत्र :** महामंडळाने विहित केलेल्या नमुन्यात अर्जदाराचे खाते असलेल्या बँकेचे / वित्तीय संस्थेचे कोणत्याही प्रकारचे कर्ज / थकबाकी नसल्याचे बेबाकी प्रमाणपत्र व इतर कोणत्याही बँकेचे / वित्तीय संस्थेचे कर्ज नसल्याबाबतचे मुळ प्रतीतील शपथपत्र.

८)**जामिनदार -**
ब)इतर कर्ज योजनेसाठी - १)एक सक्षम जामिनदार (सार्वजनिक उपक्रम / शासकीय / बँक किंवा खाजगी क्षेत्रातील आयकर भरणारी व्यक्ती) आणि स्थावर (Immovable) मालमत्ता असल्यास गहाण (Mortgage) अथवा जंगम (Movable) मालमत्ता असल्यास तारणगहाण (Hypothecate) करुन घेणे. (मालमत्ता मुल्यांकन पत्र, मालमत्तेची माहिती - ७/१२ चा उतारा, ८-अ चा उतारा)

९)मुदत कर्ज योजनेसाठी मालाचे दरपत्रक आवश्यक आहे.

**नोटः**-दारिद्र्य रेषेखालील उमेदवारांनी दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबतचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे.

**<u>ड)सूक्ष्म पतपुरवठा योजनाः-</u>**

१)विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक साक्षांकित कागदपत्रांच्या दोन प्रती.

२)अल्पसंख्यांक असल्याचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा जात प्रमाणपत्र)

३)प्रत्येक सभासदाचा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा पुरावा
(आधार कार्ड / इलेक्शन कार्ड / पारपत्रक (Passport) / बँकेचे पासबुक / वाहन चालक परवाना / दूरध्वनी देयक / विद्युत देयक किंवा तलाठी / तहसिलदार यांनी दिलेले रहिवासी प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक)

४)सर्व सभासदांचे ओळखपत्र : अर्जदार व जामिनदार दोन्हीचे
(आधार कार्ड / इलेक्शन कार्ड / पारपत्रक (Passport) / बँकेचे पासबुक / वाहन चालक परवाना / पॅन कार्ड यापैकी कोणतेही एक)

५)सर्व सभासदांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र :
कुटुंब प्रमुखाच्या नावे तहसिलदार / तलाठी यांनी निर्गमित केलेल्या उत्पन्नाचा दाखला

६)विहित नमुन्यातील [illegible] अध्यक्ष यांचे [illegible] उल्लेख.

७)सर्व सभासदांचे बेबाकी प्रमाणपत्र : महामंडळाने विहित केलेल्या नमुन्यात अर्जदाराचे खाते असलेल्या बँकेचे /वित्तीय संस्थेचे कोणत्याही प्रकारचे कर्ज / थकबाकी नसल्याचे बेबाकी प्रमाणपत्र व इतर कोणत्याही बँकेचे /वित्तीय संस्थेचे कर्ज नसल्याबाबतचे मुळ प्रतीतील शपथपत्र.

८)बचत गटाच्या बँकेच्या पासबुकाची झेरॉक्स

९)मागील ६ महिन्याच्या बचत गटाच्या इतिवृत्ताची छायांकित प्रत.

१०)बचत गटातील सदस्यांच्या नावाची यादी (वय, जात व करावयाचा व्यवसाय)

११)बचत गट प्रमुखाचा थोडक्यात परिचय

१२)बचत गटाच्या मागील दोन / तीन वर्षाच्या आर्थिक व्यवहाराचा जमाखर्चाचा तपशील.

१३)विविध शासकीय विभागाकडून बचत गटास मिळणाऱ्या आर्थिक मदतीची माहिती

१४)बचत गटातील कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या सभासदांच्या जातीचे, उत्पन्नाचे दाखले प्राधिकृत सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

१५)बचत गटातील सभासदांचे रंगीत फोटो.

**नोटः-दारिद्र्य रेषेखालील उमेदवारांनी दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबतचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे.**

**उपरोक्त अ, ब, क, ड योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी आवश्यकतेनुसार आगाऊ धनादेश व ईसीएस पत्र घेण्यात येते.**

# परिशिष्ट-२

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
مولانا آزاد اقلیتی مالیاتی ترقیاتی کارپوریشن لیمٹیڈ، ممبئی
MAULANA AZAD MINORITIES FINANCIAL DEVELOPMENT CORPORATION LTD., MUMBAI
MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, MANTRALAYA, MUMBAI
GOVT. OF MAHARASHTRA U/T
मुख्यालय :- २रा मजला, डी.डी. इमारत, जुने जकात घर, शहीदभगतसिंग मार्ग, मुंबई - 400023
दूरध्वनी क्र. 022-22672293 फॅक्स क्र. 22672294, email id : maulana_azad@rediffmail.com, website : www.mamfdc.org

जा.क्र.मौआम/लेखा/२०१५/ 1831 दिनांक :27/०७/२०१५.

प्रति,

**मा.प्रधान सचिव,**
अल्पसंख्यांक विकास विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय:-मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास वेतन व भत्ते याकरीता शासनाकडुन अनुदान देणे/ सन २०१५-१६ करीता अतिरिक्त रु.७५.०० कोटी भाग भांडवल वितरीत करणेबाबत...**

**संदर्भ:-** १)आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.अविवि/२०१३/१७७/का.८, दि.२४ जुलै, २०१५.

**महोदया,**

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास सादर करण्यात येते की, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित यांना वेतन व भत्ते करीता शासनाकडुन अनुदान देणे व सन २०१५-१६ करीता रु.७५.०० कोटी भाग भांडवल वितरीत करण्याबाबतच्या प्रस्तावास वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत खालील अदयावत माहिती या पत्राद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | अभिप्राय |
|---|---|---|
| १) | महामंडळाचे सन् २००६-०७ पर्यंतचेच लेखे विधान मंडळास सादर करण्यात आले आहेत. त्यापुढील लेखे अद्याप प्रलंबित आहे. | महामंडळाचे सन् २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखे पूर्ण झाले असून विधान मंडळाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत तसेच सन् २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखे विधान मंडळाच्या पटलावर ठेवण्यासाठी महामंडळाचे पत्र क्रमांक-मौआम-२०१५/९६७, दिनांक १४/०४/२०१५ अन्वये शासनास सादर करण्यात आले आहेत. सदरील अहवालाची प्रत सोबत परिशिष्ट-१ मध्ये जोडण्यात आलेली आहे.<br><br>महामंडळाच्या लेख्यांबाबतची सद्यःस्थिती सोबत परिशिष्ट-२ मध्ये जोडण्यात आलेली आहे. |

27/07/2015



| | | |
|---|---|---|
| | | १)शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक-इएसई-२००२/ प्र.क्र.१७४/ रोस्वरो-१, दि.०९ जानेवारी, २००४ अन्वये महामंडळासाठी लेखाधिकारी वर्ग-२ हे पद निर्माण केले आहे. वित्त विभागाचे दिनांक ३१ मे, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने पहिल्यांदाच लेखाधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली असून त्यांनी दि.१२/०१/२०११ ते दि.३१/०८/२०१२ या कालावधीसाठी कामकाज पाहिले. तद्नंतर वित्त विभागाच्या शासन शुध्दीपत्रक आदेश, क्रमांक-संलेको-२०१४/ प्र.क्र.१३८ अ/ कोषा-प्रशा २, दिनांक ०८ ऑगस्ट, २०१४ अन्वये लेखाधिकारी यांची नियुक्ती केली होती. त्यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ या कालावधीमध्ये कामकाज पाहिले आहे. परंतु त्या कालावधीमध्ये संबंधित अधिकारी या दिर्घकालीन रजेवर होत्या. महामंडळासाठी लेखाधिकारी या पदावर अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास वेळोवेळी विनंती करण्यात आलेली आहे परंतु लेखाधिकारी व [illegible] नियमित अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे सदरील कालावधीतील लेखे सादर करण्यास विलंब झाला आहे.<br><br>२)शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक-इएसई-२०००/ प्र.क्र.१५७/ रोस्वरो-१, दिनांक २० नोव्हेंबर, २००० अन्वये महामंडळाच्या मुख्यालयासाठी १० पदे मंजूर करण्यात आली होती. शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक-इएसई-२००२/ प्र.क्र.१७४/ रोस्वरो-१, दिनांक ०९ जानेवारी, २००४ अन्वये अतिरिक्त ०८ पदे मंजूर करण्यात आली होती. शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक-मौआम-२००७/ प्र.क्र.३३१/ रोस्वरो-१, दिनांक १० मार्च, २००८ अन्वये ८७ पदांस मंजूरी देण्यात आली आहे. अशी एकत्रित १०५ पदे मंजूर करण्यात आली होती. यापैकी व्यवस्थापकीय संचालक या पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. उर्वरित पदांपैकी सह व्यवस्थापकीय संचालक, लेखाधिकारी इ. पदे रिक्त होती तसेच उर्वरित पदांवर कार्यरत असलेले बहुतांशी अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | | / कर्मचारी हे कंत्राटी पध्दतीने कार्यरत असल्याने सदरील कर्मचाऱ्यांमार्फत लेखा विषयक कामे पूर्ण करुन घेणे शक्य होत नाही तसेच शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्रमांक-मौआम-२०१२/ प्र.क्र.८७/ १२/ का.८, दिनांक १२ जून, २०१३ अन्वये १५७ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. सदर १५७ पदांपैकी एकही पद नियमित पध्दतीने भरण्यात आलेले नाही त्यामुळे लेखाविषयक व इतर कामे पूर्ण करुन घेणे शक्य झालेले नाही. सध्या या कार्यालयांतर्गत पूर्ण महाराष्ट्रात सर्व जिल्हयामध्ये एकुण ५० कर्मचारी ते देखील कंत्राटी पध्दतीने कार्यरत असल्याने अपुऱ्या कर्मचाऱ्यांमार्फत विहित कालावधीमध्ये लेखे विधान मंडळाच्या पटलावर ठेवणे शक्य झालेले नाही.<br>३)महामंडळाचे तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक, स्व.गफ्फार शेख यांनी दिनांक २८ मार्च, २००७ ते दिनांक ०५ मार्च, २०१२ या कालावधीमध्ये व्यवस्थापकीय संचालक या पदाचा कार्यभार सांभाळला. दिनांक ०५ मार्च, २०१२ रोजी त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने महामंडळाच्या सन २००७-०८ व त्यापुढील कालावधीतील प्रलंबित असलेल्या लेख्यांविषयक कामकाजावर आवश्यक तेवढे लक्ष देणे शक्य झाले नाही त्यामुळे सदरील कालावधीतील लेखे सादर करण्यास विलंब झाला. |
| २ | महामंडळाकडे एकुण रु.११४.२२ कोटी इतक्या अतिरिक्त निधी असुन त्यापैंकी रु.१६.४२ कोटी निधी डी.सी.बी. बँकेत गुंतविण्यात आला आहे. | महामंडळाकडील उपलब्ध असलेल्या अतिरिक्त निधीपैकी रु.१६.४२ कोटी इतका निधी डी.सी.बी. बँकेत ठेवण्यात आला होता. सदरील निधी महामंडळाचे पत्र क्रमांक-मौआम/प्रशासन/ २०१४, दिनांक २३/०९/२०१४ अन्वये स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये जमा करण्यात आला होता. त्वरित संदर्भासाठी सदरील पत्राची प्रत सोबत **परिशिष्ट-३** मध्ये जोडण्यात आली आहे. |
| ३) | एक्सिस बँकेतही फार मोठया प्रमाणात निधी गुंतवण्यात आले असुन एकाच बँकेत फार मोठा निधी न ठेवता विविध राष्ट्रियकृत बँकेत गुंतविणे/Diversify करणे आवश्यक असुन, वित्त विभाग, | महामंडळाकडे दिनांक ३० जून, २०१५ अखेर रु.६७.४० कोटी इतका निधी शिल्लक होता. सदरील निधी महामंडळामार्फत वेगवेगळया बँकांमध्ये (०५) ठेवण्यात आला असून याबाबत महामंडळामार्फत प्रत्यक्ष पडताळणी बँकांकडून करण्यात आली असून |



| | | |
|---|---|---|
| | दिनांक २४ जुलै, २०१४ च्या परीपत्रकामधील दिलेल्या सुचनेप्रमाणे महामंडळाने कार्यवाही करावी. | बँकांमार्फत प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत शासनास महामंडळाचे पत्र क्रमांक-मौआम/लेखा/२०१५/ १८१३, दि.२२/०७/२०१५ नुसार सादर करण्यात आली आहे. त्वरित संदर्भासाठी सदरील पत्राची छायांकित प्रत सोबत **परिशिष्ट-४** मध्ये जोडण्यात आली आहे. |
| ४) | शासनाने महामंडळास कर्जापोटी हमी दिलेली असुन महामंडळाने हमी शुल्काचे Reconciliation त्वरीत करणे आवश्यक आहे. | महामंडळाने घेतलेल्या कर्जापैकी अदत्त असलेल्या रक्कमेवर सन २०१४-१५ पर्यंत भरणा करण्यात आलेल्या हमी शुल्क चलनाच्या छायांकित प्रति **परिशिष्ट-५** मध्ये जोडण्यात आल्या आहेत. |
| ५) | महामंडळाने दिलेल्या कर्जाची वसुली कमी प्रमाणात असुन ही वसुली वाढविण्याचे महामंडळाने कसोटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. | महामंडळामार्फत वाटप करण्यात येणाऱ्या सर्व कर्ज योजनेअंतर्गत कर्ज वसुलीबाबतचे आगाऊ दिनांकित धनादेश (PDC) घेण्यात येतात. सदरील PDC विहित दिनांकास जिल्हा स्तरावरील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये जमा करण्यात येतात. ज्या लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पुरेशी कर्जाबाबतची रक्कम शिल्लक नसल्यामुळे ज्या PDC धनादेशांचे अनादर (बाऊन्स) होतात अशा लाभार्थ्यांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत कारवाई [illegible] दिनांक ०७ जानेवारी, २०१५ रोजीच्या ८३ व्या बैठकीमध्ये कायदेशीर सल्लागार नियुक्तीबाबतची बाब मान्यतेसाठी ठेवण्यात आली होती. त्यानुसार एखाद्या कायदेशीर फर्मला किंवा सल्लागारांना जाहिरात देऊन नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार कर्ज वसुलीसाठी कायदेशीर सल्लागारांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>जिल्हा कार्यालयास ज्या लाभार्थ्यांचे कर्ज वसुलीबाबतचे धनादेश अनादर (बाऊन्स) होतात अशा लाभार्थ्यांना व त्यांच्या जामीनदारांना सूचना देण्याबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे त्यामुळे वसुलीमध्ये निश्चितच वाढ होईल.<br>शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, दिनांक १२ जून, २०१३ अन्वये १५७ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर केला आहे. सदरील शासन निर्णय ७६ पदांकरिता वेतन व भत्त्यावरील खर्च शासनामार्फत अदा करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून त्याबाबत कोणत्याही |

| | | |
|---|---|---|
| | | प्रकारचे अनुदान प्राप्त झालेले नाही. महामंडळात सध्या मंजूर पदांपैकी व्यवस्थापकीय संचालक व सह व्यवस्थापकीय संचालक ही दोन पदे अतिरिक्त कार्यभार देऊन शासनाने अधिकारी नियुक्त केलेले आहेत. या व्यतिरिक्त महामंडळाच्या मुख्यालयात २१ कर्मचारी तसेच जिल्हा कार्यालयामध्ये २९ कर्मचारी असे एकत्रित ५० कर्मचारी कंत्राटी तत्त्वावर काम करीत आहेत. मंजूर झालेल्या सर्व पदांवर अधिकारी / कर्मचारी नियुक्त केल्यानंतर वसुलीमध्ये वाढ होऊ शकेल. |

आपली,

( अैनुल अत्तार )
व्यवस्थापकीय संचालक

सोबत : वरीलप्रमाणे.



## परिशिष्ट-३

MAULANA AZAD MINIORITY FINANCIAL DEVELOPMENT CORPORATION LTD., HEAD OFFICE
DIVISIONWISE SUMMARY OF NEFT DONE IN RESPECT OF DIRECT LOAN, EDUCATION LOAN
& MICRO FINANCE LOAN SCHEME w.e.f. 01/04/2014 to 06/08/2015

| Sr. No. | Quota | Part-II RecD. | District | | Direct Loan | | Education Loan | | Term Loan | | Micro Finance | | Grand Total | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | No. Beni. | Amt. | No. Beni. | Amt. | No. Beni. | Amt. | No. Beni. | Amt. | No. Beni. | Amt. |
| | | | Konkan Division: | | | | | | | | | | | |
| 1 | 3857 | 3105 | Mumbai | | 2625 | 1050.00 | 2 | 1.88 | 8 | 6.65 | 12 | 22.45 | 2647 | 1080.98 |
| 2 | 1619 | 583 | Thane | | 593 | 237.20 | 0 | 0.00 | 6 | 10.45 | 1 | 1.90 | 600 | 249.55 |
| 3 | 289 | 6 | Raigad | | 3 | 1.20 | 2 | 1.75 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 5 | 2.95 |
| 4 | 305 | 173 | Ratnagiri | | 143 | 57.20 | 4 | 3.46 | 2 | 1.90 | 0 | 0.00 | 149 | 62.56 |
| 5 | 66 | 39 | Sindhdurg | | 38 | 15.20 | 1 | 0.60 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 39 | 15.80 |
| | 6136 | 3906 | Sub-Total | | 3402 | 1360.80 | 9 | 7.69 | 16 | 19.00 | 13 | 24.35 | 3440 | 1411.84 |
| | | | Pune Division: | | | | | | | | | | | |
| 1 | 1021 | 818 | Pune | | 673 | 269.20 | 8 | 6.30 | 1 | 0.95 | 7 | 14.00 | 689 | 290.45 |
| 2 | 272 | 232 | Satara | | 72 | 28.80 | 4 | 1.85 | 1 | 0.95 | 0 | 0.00 | 77 | 31.60 |
| 3 | 336 | 410 | Sangli | | 365 | 146.00 | 23 | 17.71 | 24 | 22.80 | 9 | 13.30 | 421 | 199.81 |
| 4 | 458 | 355 | Solapur | | 318 | 127.20 | 6 | 4.37 | 13 | 9.70 | 0 | 0.00 | 337 | 141.27 |
| 5 | 442 | 479 | Kolhapur | | 342 | 136.80 | 70 | 48.73 | 13 | 10.78 | 171 | 324.90 | 596 | 521.21 |
| | 2529 | 2294 | Sub-Total | | 1770 | 708.00 | 111 | 78.96 | 52 | 45.18 | 187 | 352.20 | 2120 | 1184.34 |
| | | | Nashik Division: | | | | | | | | | | | |
| 1 | 679 | 533 | Nashik | | 536 | 214.40 | 2 | 1.99 | 13 | 12.35 | 0 | 0.00 | 551 | 228.74 |
| 2 | 101 | 101 | Nandurbar | | 109 | 43.60 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 109 | 43.60 |
| 3 | 184 | 374 | Dhule | | 413 | 165.20 | 5 | 3.45 | 8 | 7.60 | 14 | 25.65 | 440 | 201.90 |
| 4 | 372 | 362 | Ahmednagar | | 369 | 147.60 | 11 | 6.63 | 37 | 35.15 | 10 | 20.90 | 427 | 210.28 |
| 5 | 619 | 782 | Jalgaon | | 700 | 280.00 | 10 | 5.57 | 68 | 90.25 | 95 | 180.50 | 873 | 556.32 |
| | 1955 | 2152 | Sub-Total | | 2127 | 850.80 | 28 | 17.64 | 126 | 145.35 | 119 | 227.05 | 2400 | 1240.84 |
| | | | Amravati Division: | | | | | | | | | | | |
| 1 | 722 | 625 | Amravati | | 520 | 208.00 | 2 | 1.90 | 8 | 7.60 | 0 | 0.00 | 530 | 217.50 |
| 2 | 607 | 494 | Akola | | 228 | 91.20 | 12 | 9.40 | 12 | 11.40 | 0 | 0.00 | 252 | 112.00 |
| 3 | 274 | 289 | Washim | | 293 | 117.20 | 2 | 1.64 | 0 | 0.00 | 3 | 5.70 | 298 | 124.54 |
| 4 | 437 | 408 | Yeotmal | | 362 | 144.80 | 6 | 4.92 | 2 | 1.90 | 0 | 0.00 | 370 | 151.62 |
| 5 | 610 | 550 | Buldhana | | 472 | 188.80 | 10 | 6.74 | 4 | 3.80 | 0 | 0.00 | 486 | 199.34 |
| | 2650 | 2366 | Sub-Total | | 1875 | 750.00 | 32 | 24.60 | 26 | 24.70 | 3 | 5.70 | 1936 | 805.00 |
| | | | Nagpur Division: | | | | | | | | | | | |
| 1 | 963 | 750 | Nagpur | | 681 | 272.40 | 8 | 7.42 | 6 | 5.70 | 0 | 0.00 | 695 | 285.52 |
| 2 | 228 | 192 | Wardha | | 159 | 63.60 | 1 | 0.82 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 160 | 64.42 |
| [illegible] | 172 | 87 | [illegible] | | [illegible] | [illegible] | [illegible] | 0.45 | 0 | 0.00 | [illegible] | 0.00 | 77 | [illegible] |
| 4 | 147 | 32 | Gondia | | 32 | 12.80 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 32 | 12.80 |
| 5 | 372 | 309 | Chandrapur | | 214 | 85.60 | 1 | 0.55 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 215 | 86.15 |
| 6 | 100 | 10 | Gadchiroli | | 10 | 4.00 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 10 | 4.00 |
| | 1982 | 1380 | Sub-Total | | 1172 | 468.80 | 11 | 9.24 | 6 | 5.70 | 0 | 0.00 | 1189 | 483.74 |
| | | | Aurangabad Division: | | | | | | | | | | | |
| 1 | 867 | 1449 | Aurangabad | | 763 | 305.60 | 37 | 25.88 | 0 | 0.00 | 31 | 59.20 | 831 | 390.68 |
| 2 | 357 | 652 | Jalna | | 176 | 70.40 | 3 | 2.02 | 0 | 0.00 | 11 | 20.90 | 190 | 93.32 |
| 3 | 406 | 421 | Parbhani | | 357 | 142.80 | 20 | 15.69 | 14 | 13.30 | 23 | 43.70 | 414 | 215.49 |
| 4 | 258 | 258 | Hingoli | | 160 | 64.00 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 160 | 64.00 |
| 5 | 334 | 642 | Beed | | 488 | 195.20 | 10 | 6.00 | 30 | 28.50 | 9 | 18.00 | 537 | 247.70 |
| 6 | 378 | 360 | Latur | | 408 | 163.20 | 22 | 15.08 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 430 | 178.28 |
| 7 | 711 | 610 | Nanded | | 368 | 147.20 | 6 | 7.59 | 0 | 0.00 | 6 | 11.40 | 380 | 166.19 |
| 8 | 187 | 190 | Usmanabad | | 185 | 74.00 | 2 | 1.65 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 187 | 75.65 |
| | 3498 | 4582 | Sub-Total | | 2905 | 1162.40 | 100 | 73.91 | 44 | 41.80 | 80 | 153.20 | 3129 | 1431.31 |
| | 18750 | 16680 | Total of Direct Loan Scheme............ | | 13251 | 5300.80 | 291 | 212.04 | 270 | 281.73 | 402 | 762.50 | 14214 | 6557.07 |
| | All District Education Loan | | | All Dist. | 0 | 0.00 | 3228 | 2304.51 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 3228 | 2304.51 |
| | Grand Total | | | | 13251 | 5300.80 | 3519 | 2516.55 | 270 | 281.73 | 402 | 762.50 | 17442 | 8861.58 |

## परिशिष्ट-४

**मौलाना आज़ाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ**
**مولانا آزاد اقلیتی مالیاتی ترقیاتی کارپوریشن، ممبئی**
**MAULANA AZAD MINORITIES FINANCIAL DEVELOPMENT CORPORATION**
MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, MANTRALAYA, MUMBAI
GOVT. OF MAHARASHTRA UT

मुख्यालय : ... मुंबई - ४०००२३, दूरध्वनी क्र. 022-22672293, फॅक्स क्र. 22672294, email id : maulana_azad@rediffmail.com, www.mamfdc.org

जा.क्र.मौआम/लेखा/२०१५/७००९ दिनांक २७/०४/२०१५.

प्रति,

**मा.प्रधान सचिव,**
अल्पसंख्यांक विकास विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय:-मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडील योजनांचे मूल्यमापनाबाबत....**
**संदर्भ:-**आपले पत्र क्रमांक-मौआम-२०१५/प्र.क्र.३१/का.८, दिनांक २४ मार्च, २०१५.

**महोदया,**

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित ला शासनामार्फत भाग भांडवला व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय अनुदान शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत नाही. महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मूल्यमापनावरील खर्च आपल्या स्तरावरुन राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण, संशोधन व योजना यामधून भागविण्यास मान्यता देण्यात यावी व त्यानुसार महामंडळाच्या सर्व योजनांचे मूल्यमापन यशदा, पुणे यांच्यामार्फत करण्यात यावे त्यासाठी यशदा, पुणे यांना आपल्यामार्फत विनंती करण्यात यावी.

आपली,

**( अैनुल अत्तार )**
व्यवस्थापकीय संचालक



## परिशिष्ट-५

### मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

**महामंडळामार्फत सन् २०१४-१५ ते दि.०६ ऑगस्ट, २०१५ पर्यंत**
**मंजूर व वितरित करण्यात आलेल्या कर्ज रक्कमेचा तपशिल**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजनेचे नाव | मंजूर करण्यात आलेल्या अर्जांची संख्या | अपेक्षित रक्कम | कर्ज वितरित करण्यात आलेल्या अर्जांची संख्या | वितरित करण्यात आलेली रक्कम | रद्द / अपूर्ण / त्रुटी अर्जांची संख्या | प्रलंबित अर्जांसाठी अपेक्षित असलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | थेट कर्ज योजना | १६६८० | ६६.७२ | १३२५१ | ५३.०१ | ३४२९ | १३.७१ |
| २ | मुदत कर्ज योजना | ८०९ | ८.०९ | २७० | २.८२ | ५३९ | ५.२७ |
| ३ | सुक्ष्म पतपुरवठा योजना | ७७० | १४.६३ | ४०२ | ७.६३ | ३६८ | ७.०० |
| ४ | शैक्षणिक कर्ज योजना | १५०० | २६.६९ | ३५१९ | २५.१७ | | |
| | **एकूण** | **१९७५९** | **११६.१३** | **१७४४२** | **८८.६३** | | |

**टीप:**शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेली रक्कम पुढील प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या कालावधीमध्ये वितरित करणे अपेक्षित असल्याने सदरील योजनेअंतर्गत प्रलंबित अर्जांची संख्या व रक्कम दर्शविण्यात आलेली नाही तसच प्रथम वर्षी कर्ज मंजूर करण्यात आल्यानंतर पुढील ३ त ५ वर्षांपर्यंत फीची रक्कम अदा करण्यात येत असल्याने कर्ज वितरित केलेल्या अर्जांची संख्या जास्त दिसून येते.

## परिशिष्ट-६

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक
विकास महामंडळाच्या संचालक
मंडळावरील नियुक्ती

महाराष्ट्र शासन
रोजगार व स्वयंरोजगार विभाग,
**शासन निर्णय** :-क्रमांक मौआमं-२००७/प्र.क्र.३३२/रोस्वरो-१,
नवीन प्रशासकीय भवन, १४वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०७ नोव्हेंबर, २००७.

शासन निर्णय :

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम ८१ अन्वये खालीलप्रमाणे अशासकीय सदस्यांच्या हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन वर्षासाठी नियुक्त्या करण्यात येत आहेत :-

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अमीन पटेल, मुंबई. | - अध्यक्ष |
| २. | श्री. मौलाना झहीर, मुंबई. | - संचालक |
| ३. | श्रीमती हुस्नाबानू खलिफे, रत्नागिरी | - संचालक |
| ४. | श्री. इब्राहीम पठाण, औरंगाबाद | - संचालक |
| ५. | श्री. शेख हुसेन, नागपूर | - संचालक |

२. सदर नियुक्तीचा कालावधी कमी / अधिक करण्याचा अधिकार शासनास राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि. रा. शिरसाट)
शासनाचे उप सचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा मंत्री, रोजगार व स्वयंरोजगार यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, रोजगार व स्वयंरोजगार यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ(NMDFC),नवी दिल्ली,
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व संचालक, मौलाना आझाद अ. आ. वि. महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.
श्री. सा. जा. कादरी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
सर्व सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे.
निवड नस्ती (रोस्वरो-१)



मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक
विकास महामंडळाच्या संचालक
मंडळावरील नियुक्ती

महाराष्ट्र शासन
रोजगार व स्वयंरोजगार विभाग,
**शासन निर्णय** :-क्रमांक मौआमं-२००७/प्र.क्र.३३२/रोस्वरो-१,
नवीन प्रशासकीय भवन, १४वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ जानेवारी, २००८.

**शासन निर्णय :**

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम ८१ अन्वये खालीलप्रमाणे अशासकीय सदस्याची हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात येत आहे :-

**श्रीमती जेनेट डिसोझा, मुंबई** संचालक

२. सदर नियुक्तीचा कालावधी कमी / अधिक करण्याचा अधिकार शासनास राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००८०११५१५२८५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि. रा. शिरसाट)
शासनाचे उप सचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा मंत्री, रोजगार व स्वयंरोजगार यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, रोजगार व स्वयंरोजगार यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ(NMDFC),नवी दिल्ली,
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व संचालक, मौलाना आझाद अ. आ. वि. महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.
श्री. सा. जा. कादरी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
सर्व सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे.
निवड नस्ती (रोस्वरो-१)

[illegible] (३००-१-०८)

**मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास**
**<u>महामंडळाच्या संचालक मंडळावरील नियुक्त्या.</u>**

**महाराष्ट्र शासन**
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय, क्रमांकःअविवि-२००८/प्र.क्र.१७२/०८/का.१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ९ सप्टेंबर, २००८.

वाचा :- रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय, क्र.मौआमं-२०००/प्र.क्र.२१६/रोस्वरो-१, दि.२०.१०.२०००, दि.८.०३.२००१, दि.१३.०३.२००१, दि.२२.०६.२००१, दि.१९.०९.२००१, दि.२०.०९.२००१, दि.३.११.२००१ व दि.१५.११.२००६.

**<u>शासन निर्णय</u> :-**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर महामंडळाच्या संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम ८१ अन्वये खालील अशासकीय सदस्यांच्या या आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षासाठी नियुक्त्या करण्यात येत आहेत :-

| | | |
|---|---|---|
| १) श्री. मुनाफ हकीम, मुंबई | - | संचालक |
| २) श्री. अबू सईद, उस्मानाबाद | - | संचालक |
| ३) श्री. ख्वाजा बेग, यवतमाळ | - | संचालक |
| ४) श्री. नविज झुमा, बीड | - | संचालक |
| ५) श्री. शब्बीर विद्रोही, नागपूर | - | संचालक |

२. सदर नियुक्तीचा कालावधी कमी / अधिक करण्याचा अधिकार शासनास राहील.

३. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०९०९१७१६०९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( एस. एस. काद्री )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.मुख्य सचिव
व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ (NMDFC), नवी दिल्ली,
प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग / सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग,
अध्यक्ष, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई,
सर्व संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई, (या महामंडळाच्या कार्यालयामार्फत टपालाने)
निवड नस्ती (अल्पसंख्याक विकास विभाग)



मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक
विकास महामंडळाच्या संचालक मंडळावरील
<u>अशासकीय संचालकांना मुदतवाढ देणेबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
अल्पसंख्याक विकास विभाग,
**शासन निर्णय** :-क्रमांक मौआमं-२०१०/प्र.क्र.१०६/का.८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ नोव्हेंबर, २०१०.

वाचा : शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र. मौआमं-२००७/प्र.क्र.३३२/रोस्वरो-१, दि. ७.११.२००७.

**शासन निर्णय :**

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम ८१ अन्वये खालील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तींना पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अमीन पटेल, मुंबई. | - | अध्यक्ष |
| २. | श्री. मौलाना झहीर, मुंबई. | - | संचालक |
| ३. | श्रीमती हुस्नाबानू खलिफे, रत्नागिरी | - | संचालक |
| ४. | श्री. इब्राहीम पठाण, औरंगाबाद | - | संचालक |
| ५. | श्री. शेख हुसेन, नागपूर | - | संचालक |

२. सदर नियुक्तीचा कालावधी कमी / अधिक करण्याचा अधिकार शासनास राहील. महामंडळाच्या संचालक मंडळावर नव्याने नियमित स्वरूपातील नेमणूका शासनाकडून करण्यात आल्यानंतर या नेमणुका आपोआप संपुष्टात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(उ. सं. दांडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा मंत्री, अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ(NMDFC),नवी दिल्ली,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व संचालक, मौलाना आझाद अ. आ. वि. महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.
निवड नस्ती (का.८)

मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. मंत्री, अल्पसंख्यांक विकास यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, अल्पसंख्यांक विकास यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ (NMDFC), नवी दिल्ली
सर्व मंत्रालयीन विभाग
श्री. एजाज राऊत, मुंबई श्री. नाझेर काझी, बुलढाणा,श्रीम. शे. मेहराज ईसाक पटेल, औरंगाबाद,श्री. चंगेजखान पठाण, कोल्हापूर,श्री. अब्दुल गफ्फार अब्दुल रज्जाक मलिक, जळगाव, श्री. रणजित लक्ष्मणराव मकरंद, परभणी,श्री. अमन हनीफ निर्बान, यवतमाळ,श्री. तौफिक अहमद अकबर मुल्लाणी, कोल्हापूर. सर्व संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई
निवड नस्ती (का.८)



मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबईच्या संचालक मंडळावरील अध्यक्ष पदावरील नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मौआम-२०१४/प्र.क्र.८८/का-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई
तारीख: १७ जुलै, २०१४

वाचा -
१) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वंयरोजगार विभाग, क्र. मौआमं-२००७/प्र.क्र.३३२/रोस्वरो-१, दि. ०७.११.२००७
२) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. मौआमं-२०१०/प्र.क्र.१०६/का-८, दि. १२.११.२०१०

शासन निर्णय :-

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम ८१ अन्वये अध्यक्षपदी खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| श्री. जावेद श्रॉफ, मुंबई | अध्यक्ष |

सदर नियुक्ती हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन वर्षासाठी करण्यात येत आहे.

सदर नियुक्तीचा कालावधी कमी / अधिक करण्याचा अधिकार शासनास राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०७१५१५४९०६६९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(समीर साळुंखे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

अल्पसंख्याक विकास विभाग
निर्गमित
सही
दि. १५/०७/२०१४

३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
४. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव,
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ (NMDFC), नवी दिल्ली
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. श्री. जावेद श्रॉफ, मुंबई
१०. सर्व संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
११. व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
१२. निवडनस्ती (कार्यासन-८).



मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळावरील अशासकीय संचालक पदावर नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विभाग
शासन निर्णय क्रमांकः मौआम-२०१०/प्र.क्र.१०६/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २२ ऑगस्ट, २०१४.

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मौआमं-२००७/प्र.क्र.३३२/रोस्वरो-१, दि.०७ नोव्हेंबर, २००७
२) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मौआमं-२००७/प्र.क्र.३३२/रोस्वरो-१, दि.१५ जानेवारी, २००८
३) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग, अविवि-२००८/प्र.क्र.१७२/०८/का.१, दि.०९ सप्टेंबर, २००८
४) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग, मौआम-२०१०/प्र.क्र.१०६/का.८, दि.१२ नोव्हेंबर, २०१०
५) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग, मौआम-२०१०/प्र.क्र.१०६/का.८, दि.१८ जानेवारी, २०११
६) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग, मौआम-२०१४/प्र.क्र.८८/का.८, दि.१७ जुलै, २०१४

प्रस्तावना :-

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर संदर्भ क्र.१, २ व ३ येथील शासन निर्णयान्वये एकूण ११ अशासकीय संचालकांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर संचालकांचा तीन वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्याने त्या जागी नवीन अशासकीय सदस्यांची संचालक पदावर नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये श्री. जावेद श्रॉफ, मुंबई यांची सदर महामंडळावर अध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. महामंडळाच्या संचालक मंडळावर उर्वरित १० नवीन संचालकांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

य क्रमांकः शासन निर्णय क्रमांक लिहा

सन निर्णय :-

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित या महामंडळावर संदर्भ क्र.१, २, ३,४ व ५ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या अशासकीय संचालकांच्या नियुक्त्या व मुदतवाढी या आदेशाव्दारे संपुष्टात आणण्यात येत आहेत.

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम ८१ अन्वये खालीलप्रमाणे ८ अशासकीय सदस्यांच्या हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन वर्षासाठी नियुक्त्या करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एजाज राऊत, मुंबई | - | संचालक |
| २. | श्री. नाझेर काझी, बुलढाणा | - | संचालक |
| ३. | श्रीम. शे. मेहराज ईसाक पटेल, औरंगाबाद | - | संचालक |
| ४. | श्री. चंगेजखान पठाण, कोल्हापूर | - | संचालक |
| ५. | श्री. अब्दुल गफ्फार अब्दुल रज्जाक मलिक, जळगाव | - | संचालक |
| ६. | श्री. रणजित लक्ष्मणराव मकरंद, परभणी | - | संचालक |
| ७. | श्री. अमन हनीफ निर्बान, यवतमाळ | - | संचालक |
| ८. | श्री. तौफिक अहमद अकबर मुल्लाणी, कोल्हापूर | - | संचालक |

२.सदर नियुक्तीचा कालावधी कमी / अधिक करण्याचा अधिकार शासनाचा राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८२०१८४९२२२११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( वि. र. परमार )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव



मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळावरील अध्यक्ष व अशासकीय संचालक यांच्या नियुक्त्या रद्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मौआम-२०१४/प्र.क्र.१४३/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ४ डिसेंबर, २०१४.

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग, मौआम-२०१४/प्र.क्र.८८/का.८, दि.१७ जुलै, २०१४.
२) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग, मौआम-२०१०/प्र.क्र.१०६/का.८, दि.२२ ऑगस्ट, २०१४.
३) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग, मौआम-२०१०/प्र.क्र.१०६/का.८, दि.१० सप्टेंबर, २०१४.

शासन निर्णय :-

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई या महामंडळावर संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम ८१ मधील तरतूदीनुसार,

संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये श्री. जावेद श्रॉफ, मुंबई यांची अध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली होती.

संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये खालील अशासकीय संचालकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

१) श्री. एजाज राऊत, मुंबई
२) श्री. नाझेर काझी, बुलढाणा
३) श्रीम. शे.मेहराज ईसाक पटेल, औरंगाबाद
४) श्री. चंगेजखान पठाण, कोल्हापूर
५) श्री. अब्दुल गफ्फार अब्दुल रज्जाक मलिक, जळगाव

६) श्री. रणजित लक्ष्मणराव मकरंद, परभणी

७) श्री. अमन हनीफ निर्बान, यवतमाळ

८) श्री. तौफिक अहमद अकबर मुल्लाणी, कोल्हापूर

तसेच संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये खालील अशासकीय संचालकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

१) श्री. निजामुद्दीन राईन, मुंबई

२) श्रीमती निगार सूलताना बारसकर, पुणे

उपरोक्त नियुक्ती आदेशामध्ये नियुक्तीचा कालावधी कमी/अधिक करण्याचा अधिकार शासनास राहील असे नमूद करण्यात आले होते. संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम ८१ मधील तरतूदीनुसार वरील अध्यक्ष व सर्व अशासकीय संचालकांच्या नियुक्त्या या आदेशाव्दारे रद्द करण्यात येत आहेत.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१२०४१५०८२६६११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul Chand Attar

Digitally signed by Ainul Chand Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MDD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul Chand Attar
Date: 2014.12.04 16:36:59 +05'30'

(अैनुल अत्तार)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. राज्यपालांचे सचिव,

मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव

मा. मंत्री, अल्पसंख्यांक विकास यांचे खाजगी सचिव

मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव

अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

अवर सचिव, वित्त विभाग, सा.उ. , मंत्रालय, मुंबई-३२.





व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ (NMDFC), नवी दिल्ली

व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई

व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई यांचेमार्फत,

| | |
|---|---|
| श्री. जावेद श्रॉफ, मुंबई | श्री. एजाज राऊत, मुंबई |
| श्री. नाझेर काझी, बुलढाणा | श्रीम. शे.मेहराज ईसाक पटेल, औरंगाबाद |
| श्री. चंगेजखान पठाण, कोल्हापूर | श्री. अब्दुल गफ्फार अब्दुल रज्जाक मलिक, जळगाव |
| श्री. रणजित लक्ष्मणराव मकरंद, परभणी | श्री. अमन हनीफ निर्बान, यवतमाळ |
| श्री. तौफिक अहमद अकबर मुल्लाणी, कोल्हापूर | श्री. निजामुद्दीन राईन, मुंबई |
| श्रीमती निगार सूलताना बारसकर, पुणे | |

निवड नस्ती (का.८)

# परिशिष्ट "क"

**(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)**



## पहिली बैठक

**दिनांक ४ जून २०१५**

अल्पसंख्याक कल्याण समितीची बैठक दिनांक ४ जून २०१५ रोजी विधानभवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सरदार तारासिंह, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) कॅ. आर. तमिल सेल्वन, वि.स.स.

(३) श्री. द्वारम मल्लिकार्जून रेड्डी, वि.स.स.

(४) श्री. सुनिल शिंदे, वि.स.स.

(५) श्रीमती ज्योती कलानी, वि.स.स.

(६) श्री. गुरुमुख जगवानी, वि.प.स.

(७) श्रीमती हुस्नबानु खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधाधमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(२) श्री. जयवंत राणे, अवर सचिव (समिती).

**अल्पसंख्याक विकास विभाग :**

(१) श्रीमती जयश्री मुखर्जी, प्रधान सचिव

(२) श्रीमती ऐनुल अत्तार, सह सचिव

(३ श्री. अनिस शेख, अवर सचिव

(४) श्री.अशोक गायकवाड, अवर सचिव

सदरहू बैठकीत समितीने अंतर्गत विचारविनिमय केला.

## दुसरी बैठक

**दिनांक १३ ऑगस्ट २०१५**

अल्पसंख्याक कल्याण समितीची बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१५ रोजी विधानभवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. सरदार तारासिंह, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. उदेसिंग पाडवी, वि.स.स.

(३) श्री. अनिल कदम, वि.स.स.

(४) श्री. गुरुमुख जगवानी, वि.प.स.

(५) श्री. अब्दुल्ला खान दुर्रानी, वि.प.स.

(६) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. जयवंत राणे, अवर सचिव (समिती)

**अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्रीमती जयश्री मुखर्जी, प्रधान सचिव

(२) श्रीमती अैनुल अत्तार, सहसचिव

(३) श्री.समीर साळुंखे, अवर सचिव

उक्त बैठकीत विभागीय सचिवांची व मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची साक्ष घेण्यात आली.



## तिसरी बैठक

**दिनांक २७ ऑगस्ट २०१५**

अल्पसंख्याक कल्याण समितीची बैठक दिनांक २७ ऑगस्ट २०१५ रोजी विधानभवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. सरदार तारासिंह, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) कॅ. आर. तमिल सेल्वन, वि.स.स.

(३) श्री. उदेसिंग पाडवी, वि.स.स.

(४) श्री. मल्लिकार्जुन रेड्डी, वि.स.स.

(५) श्रीमती ज्योती कालानी, वि.स.स.

(६) श्री. अबू आजमी, वि.स.स.

(७) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. जयवंत राणे, अवर सचिव (समिती)

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ :**

(१) श्रीमती जयश्री मुखर्जी, प्रधान सचिव

(२) श्री. समीर साळुंखे, अवर सचिव

उक्त बैठकीत विभागीय सचिवांची व मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची साक्ष घेण्यात आली.

## चौथी बैठक

### दिनांक ७ एप्रिल २०१६

अल्पसंख्याक कल्याण समितीची बैठक दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी विधानभवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री सरदार तारासिंह, वि.स.स. तथा समिति प्रमुख

(२) श्री. उदेसिंग पाडवी, वि.स.स.

(३) श्री. सुनिल शिंदे, वि.स.स.

(४) श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान, वि.स.स.

(५) श्रीमती ज्योती कालानी, वि.स.स.

(६) श्री. गुरुमुख जगवानी, वि.प.स.

(७) श्री. अब्दुला खान दुर्रानी, वि.प.स.

(८) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. जयवंत राणे, अवर सचिव (स)

सदरहू बैठकीत समितीने प्रारुप अहवालावर विचार केला व किरकोळ दुरुस्त्यांसह तो संमत केला.

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**